CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ६ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ६१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन



गुरू गोविंदसिंग यांची आज जयंती

पत्रकार दिन



आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचा आज जयंती दिन. त्यानिमित्त पत्रकार दिनाच्या सर्व पत्रकारांना हार्दिक शुभेच्छा!

# भाजपाची मालकी जनतेकडे

## देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

### भाजपा सदस्य नोंदणी महाअभियानाला सुरुवात

**नागपूर, ५ जानेवारी**

भारतात भारतीय जनता पार्टी आणि भारतीय कम्युनिस्ट पार्टी वगळता इतर सर्व राजकीय पक्ष खाजगी मालकीचे आहेत. भाजपाची मालकी केवळ जनतेकडे आहे. हा लोकतांत्रिक पद्धतीने चालणारा पक्ष आहे. पक्षाने ही उंची गाठली, कारण हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. ११ कोटी सदस्य असणारा जगातील सगळ्यात मोठा हा पक्ष असून, हा आकडा सत्यापित असल्याचे फडणवीस म्हणाले.



### ...तर मला फोन करा

सत्ता मिळाली की संघटन आणि जनतेच्या अपेक्षा वाढतात. ती आपली जबाबदारी आहे. आज नागपुरात एका लाखाचे लक्ष्य ठेवले आहे. ते पूर्ण झाले तर मला फोन करा. नाही झाले तर का नाही झाले, यासाठीही फोन करा. तुम्ही लक्ष्य पूर्ण कराल, यावर माझा विश्वास आहे. शिवाय, २० तारखेनंतर लक्ष्य पूर्ण करणाऱ्यांचा सत्कार करून मी थकून गेलो पाहिजे, एवढे काम करा, असेही फडणवीस म्हणाले.

नागपुरात देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी रेशीमबागेतील महात्मा फुले सभागृहात सदस्यता नोंदणी अभियानाची सुरुवात झाली. यावेळी नागपूर महानगरातील कार्यकर्त्यांचीही सदस्य नोंदणी सुरू झाली आणि पहिल्या दोन तासांत २५ हजार सदस्य नोंदले गेल्याचे फडणवीस यांनी सांगितले. भाजपाच्या सदस्य अभियानात मीदेखील हातभार लावला आहे. मी २५ सदस्य केले आहेत. महाराष्ट्रात दीड कोटी सदस्य करण्याचे आमचे लक्ष्य आहे. पक्ष म्हणून व सत्ता म्हणून लोकाभिमुखता टिकवून ठेवायची आहे, असे सांगत फडणवीसांनी भाजपाच्या सदस्य नोंदणी महाअभियान कार्यक्रमात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

हे सदस्य नोंदणी अभियान राज्यभरात प्रत्येक बूथ पातळीवर राबवण्यात येत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर या अभियानाला महत्त्व आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या मुद्यावर फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, या प्रकरणी सरकार आणि पोलिस पूर्ण शक्तीने कारवाई करीत असून, कुणाचाही बचाव केला जाणार नाही. आरोपींना मदत करणाऱ्यांना सोडणार नाही. या प्रकरणाचा राजकारणासाठी वापर होऊ नये. *(तभा वृत्तसेवा)*



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नमो भारत ट्रेनचे लोकार्पण केले. यावेळी त्यांनी या गाडीतून दिल्ली-मेरठ रिजनल रॅपिड ट्रान्झिट सिस्टिम हा १३ किमी अंतराचा प्रवास करीत प्रवाशांसोबत संवादही साधला

## महत्त्वाचे...

### उत्तर भारतात थंडीमुळे १० जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली** : जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात झालेल्या हिमवृष्टीमुळे संपूर्ण उत्तर भारतात थंडीचा प्रभाव वाढला आहे. गेल्या २४ तासांत उत्तरप्रदेशात ८ आणि बिहारमध्ये २ जणांना थंडीमुळे जीव गमवावा लागला आहे. लखनौ आणि लगतच्या शहरात उघड्यावर झोपणारे बेघर ८ नागरिकांचे मृतदेह आढळून आले. पाटणा शहरात दोन मृतदेह मिळाले. तपासणीत त्यांचा मृत्यू थंडीमुळे झाल्याचे सम ोर आले. देशातील १४ राज्यांमध्ये दाट धुके पाहायला मिळत आहे. राजधानी दिल्लीत रविवारी सतत ९ तास शून्य दृश्यमानतेची नोंद झाली. यामुळे गेल्या दोन दिवसांत ८०० हून अधिक उड्डाणांना उशीर झाला. रविवारी १६० विमानांचे उड्डाण वेळापत्रकानुसार होऊ शकले नाही. ३ दिवसांत ९०० हून अधिक उड्डाणे प्रभावित झाली.

### तामिळनाडूत सात बांगलादेशी ताब्यात

**एरोड** : पासपोर्ट-व्हिसासारखी कोणतेही वैध दस्तावेज नसताना विविध कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या सात बांगलादेशींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. हे कामगार त्यांच्या कुटुंबीयांसह पेरुंडुराई येथील कारखान्यांमध्ये काम करीत होते. मध्यवर्ती यंत्रणांच्या गुप्तचरांसह पोलिसांनी शनिवारी रात्री वेप्पमपालयम्, वल्लीपुरथनपलायम्, पेरुंडुराई तालुक्यात अचानक छापेमारी केली. तिथे त्यांना पासपोर्ट किंवा व्हिसा नसतानाही सात बांगलादेशी नागरिक कारखान्यांत काम करीत असल्याचे आढळले. ताब्यात घेण्यात आलेल्या बांगलादेशींना पेरुंडराई पोलिसांच्या हवाली करण्यात आले.

### अविवाहित जोडप्यांना ओयोमध्ये 'नो एन्ट्री'

**नवी दिल्ली** : गेल्या काही वर्षांत भारताच्या कुठल्याही शहरात स्वस्तात हॉटेल शोधणे ओयोच्या मदतीने सोपे झाले आहे. अल्पावधीतच ओयो कंपनी नावारूपाला आली. कंपनीने नवीन वर्षापासून त्यांच्या नियमांत मोठे बदल केले आहेत. त्यात अविवाहित जोडप्यांना प्रवेश न देण्याचा निर्णय घेण्यात आला. आतापर्यंत कुठल्याही जोडप्याला ओयो हॉटेलमध्ये सहजपणे खोली उपलब्ध व्हायची; परंतु कंपनीने त्यावर निर्बंध आणले आहेत. उत्तरप्रदेशच्या मेरठ येथून हा नवीन नियम लागू होणार आहे. अहवालानुसार, ओयो सलग्न हॉटेलमध्ये यापुढे अविवाहित जोडप्यांच्या प्रवेशावर बंदी लावण्याचा निर्णय घेण्यात आला. जे जोडपे ओयो हॉटेलमध्ये खोली बुक करतील, त्यांना विवाहित असल्याचा पुरावा द्यावा लागेल. उर्वरित सर्व शहरांत लवकरच हा नियम लागू होणार असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले. जोडप्यांना लग्नाचा पुरावा द्यावा लागेल.

# राज्यात किमान तापमान आणखी घसरणार

## उत्तरेकडील वाऱ्यांची तीव्रता

## सोलापुरातही पारा घसरला

**मुंबई, ५ जानेवारी**

उत्तर भारतातून दक्षिण भारताकडे वाहणाऱ्या थंड वाऱ्याची तीव्रता वाढली आहे. याचा परिणाम म्हणून विदर्भासह संपूर्ण राज्यात किमान तापमानाचा पारा आणखी खाली येणार असल्याचे हवामान अभ्यासकांनी सांगितले.

सध्या राज्यातील अनेक शहरांचे किमान तापमान ११ अंशापेक्षाही खाली आहे. डिसेंबर महिन्यात हवामानात बदल झाले होते. त्यामुळे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या वाऱ्याला अडथळा निर्माण झाला होता. परिणामी, थंडी कमी झाली होती. आता वातावरण निवळले असून, थंडीचा कडाका वाढणार आहे. अनेक भागांत किमान तापमान ६ अंशाखाली जाण्याची शक्यता आहे. सोलापुरातही गेल्या दोन दिवसांपासून थंडीचा पार घसरला आहे.



### किमान तापमानात घसरण

३ जानेवारीपासून पहाटेच्या किमान तापमानात घसरण होत आहे. शनिवारी राज्यात पहाटेचे किमान तापमान सरासरीइतके, तर बऱ्याच ठिकाणी ते ०.५ अंशापासून ३.५ अंशापर्यंत खाली आले. त्यामुळे विदर्भासह उर्वरित महाराष्ट्रात थंडीत वाढ होत आहे. दुपारच्या वेळेला कमाल तापमान ७ अंशापर्यंत वाढले. त्यामुळे दिवसा ऊबदारपणा तर रात्री अधिक थंडी अशी स्थिती असून, येणारे तीन दिवस कडाक्याची थंडी राहणार आहे.

**- माणिकराव खुळे,**
हवामान अभ्यासक, मुंबई

# छत्तीसगडमध्ये चार नक्षलवाद्यांचा खात्मा

## पोलिस जवान हुतात्मा

**दंतेवाडा, ५ जानेवारी**

छत्तीसगडच्या बस्तर परिसरात झालेल्या चकमकीत चार नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने रविवारी दिली. या चकमकीत जिल्हा राखीव दलाचा हेड कॉन्स्टेबल हुतात्मा झाला.

जिल्हा राखीव रक्षक आणि विशेष कृती दलाचे संयुक्त पथक नक्षलविरोधी अभियान राबवत असताना नारायणपूर-दंतेवाडाच्या सीमेवरील अबुझमाडच्या दक्षिणेला शनिवारी सायंकाळी ही चकमक झडली. शनिवारी रात्री चकमक थंडावल्यानंतर घटनास्थळावर नक्षलवाद्यांचे चार मृतदेह, एके-४७ रायफल आणि सेल्फ लोडिंग रायफल आढळले. या चकमकीत डीआरजीचे हेड कॉन्स्टेबल सन्नू करम हुतात्मा झाले. या नक्षलविरोधी अभियानातील डीआरजीच्या पथकात नारायणपूर, दंतेवाडा, कोंडागाव आणि बस्तर जिल्ह्यातील जवानांचा समावेश होता. नक्षलवादाचा बीमोड होईपर्यंत त्यांच्याविरोधात लढा सुरूच राहील, अशी प्रतिक्रिया छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णु देव साय यांनी दिली.

# तुम्ही मला मते दिली म्हणजे सालगडी केलंय का?

## उपमुख्यमंत्री अजित पवार कार्यकर्त्यांवर भडकले

**बारामती, ५ जानेवारी,**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार कार्यकर्त्यावर भडकल्याचे पाहायला मिळाले. बारामतीमध्ये एका कार्यक्रमानंतर कार्यकर्त्यांनी अजित पवारांची भेट घेत, त्यांना मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी कार्यकर्त्यांनी अनेक कामे झाले नसल्याचे म्हटल्यानंतर अजित पवार त्यांच्यावर चांगलेच संतापले. तुम्ही म ला मते दिली म्हणजे माझे मालक नाही झालात, अशा शब्दांत अजित पवारांनी सुनावले. दरम्यान, या प्रकारानंतर मंत्री संजय शिरसाट यांनी अजित पवारांची पाठराखण केली आहे.

हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर अजित पवार परदेश दौऱ्यावर गेले होते, असे म्हटले जात आहे. परदेश दौऱ्यावरून परतल्यानंतर अजित पवार विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यासाठी बारामतीला गेले होते. यावेळी बारामतीमधील मेडद येथील तालुका खरेदी विक्री संघाच्या परिसरात एका नवीन पेट्रोल पंपाचे उद्घाटन अजित पवारांच्या हस्ते पार पडले. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधत असताना अजित पवार भडकल्याचे पाहायला मिळाले.



बारामती तालुका संघाच्या परिसरातील एका पेट्रोल पंपाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात अजित पवार बोलत होते. यावेळी नागरिक त्यांना कामाच्या संदर्भातील निवेदन देत होते. अजित पवारही ती निवेदने घेत कामे मार्गी लावण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देत होते. मात्र, याचवेळी एका कार्यकर्त्याने अनेक कामे झाले नसल्याचे म्हटले. त्या कार्यकर्त्याच्या वक्तव्यानंतर इतर काही नागरिकांनीही तीच री ओढली. यानंतर मात्र, अजित पवार यांनी 'अरे तुम्ही मला मते दिली म्हणजे माझे मालक नाही झालात. मला सालगडी केलंय का?', असा सवाल करत त्या कार्यकर्त्यावर संताप व्यक्त केला.अजित पवारांच्या या संतापावर मंत्री संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली आहे. काही वेळेला असे होते की, लोकप्रतिनिधी काम करत असताना काही मतदार देखील तारतम्य न ठेवता थेट हे काम झालेच पाहिजे, असा आग्रह करतात. त्यावेळेला एखाद्यावर रागावणे हे सहाजिक आहे, असे म्हणत संजय शिरसाट यांनी अजित पवारांची पाठराखण केली. एखादा लोकप्रतिनिधी उलट बोलला तर त्याची बातमी होते. पण एखादा नागरिक बोलला तर त्याची बातमी होत नाही. कदाचित अजित पवार यांनी रागाच्या भरात ते वक्तव्य केले असावे, असेही शिरसाट म्हणाले.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटलांचा सत्कार

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे रविवारी सोलापूर दौऱ्यावर आले असता त्यांचे स्वागत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव, सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, प्रांतिक सदस्य महेश निकंबे, शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, किरण शिंदे, राष्ट्रवादी शहर सरचिटणीस निलेश कांबळे,विनायक लिगरकर, शहर सचिव अमोल जगताप, शहर संघटक माणिक कांबळे, ऋषी येवले, वसंत कांबळे, दीपक आर्गील,महादेव राठोड आदींच्या प्रमुख उपस्थिती होते. याप्रसंगी इच्छा भगवंताची मित्र परिवाराचे सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती



### खा. प्रणिती शिंदे, आ. सिद्धाराम म्हेत्रे यांच्या उपस्थितीत नंदीध्वजांची पूजा

**सोलापूर, दि.५ जानेवारी**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची गड्डा यात्रा दृष्टीक्षेपात आली आहे. गड्डा यात्रेतील श्रीसिद्धेश्वर महाराजांचे योगदंडाचे प्रतीक असलेले नंदीध्वजांचे पूजन भाविकांच्या घरोघरी मोठा उत्साहपूर्ण वातावरणात होत आहे. यात्रा काळात मानाचे नंदीध्वजांचे पूजन शुभ मानले जाते. त्या अनुषंगाने भक्तगण आपल्या घरी नंदीध्वजांचे पूजन करून श्रीचरणी प्रार्थना करत आहेत. दरम्यान, त्याचं अनुषंगाने जोडभावी पेठ येथे मल्लिनाथ सोलापूरे परिवाराच्या वतीने सिद्धेश्वर यात्रेतील मानाच्या नंदीध्वजाच्या पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे आदींची उपस्थिती होती. यावेळी खासदार प्रणिती शिंदे आणि माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या हस्ते मानाच्या नंदीध्वजाचे मोठ्या धार्मिक वातावरणात पूजन करण्यात आले. यावेळी भावीक भक्त उपस्थित होते.

## निधन वार्ता

### भागवत शिंदे



**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगाव येथील व्यापारी भागवत उर्फ दिलीप नारायण शिंदे (वय ५६) यांचे अल्पशा आजाराने शनिवार, दि. ४ जानेवारी रोजी सोलापूर येथील खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे.


### लक्ष्मी वासम



**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

लक्ष्मी नरसय्या वासम यांचे रविवार दि.५ जानेवारी रोजी सकाळी सात वाजता नवले नगर, नेताजी शाळा शेजारी येथे त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळ निधन झाले आहे. मृत्य समयी त्यांचे वय १०२ वर्ष होते. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, जावई नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते ॲड. अनिल वासम व राजेश गाजुल बॉण्ड रायटर यांच्या आजी होत.

### भिमराव गवळी



**मंगळवेढा, दि. ५ जानेवारी-**

तालुक्यातील गोणेवाडी येथील भिमराव शंकर गवळी यांचे शनिवार दि. ४ जानेवारी रोजी दुपारी ३.३० वा. वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या कार्यालयातील स्विय सहाय्यक नंदकुमार गवळी यांचे ते वडील होत.

### वसंत शिर्के



**मंगळवेढा, दि. ५ जानेवारी-**

येथील माजी सैनिक वसंत गोविंद शिर्के यांचे शनिवार दि. ४ जानेवारी रोजी रात्री १०.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिर्के मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ.शरद शिर्के व इंजीनिअर भारत शिर्के यांचे ते वडील होत.

### राजश्री सूर्यवंशी



**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

राजश्री चतुरराव सूर्यवंशी (वय ८२) रा.उमरगा यांचे दीर्घ आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. महेंद्र लक्ष्मणराव चव्हाण (पुणे) यांच्या त्या आत्या होत.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य अन् निवासस्थानाचे प्रश्न सोडवा

### डॉ.पी. पी. वावा यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.५ जानेवारी-**

सफाई कर्मचाऱ्यांचे सर्वात महत्वाचे प्रश्न हे आरोग्य व निवासस्थानाचे असतात. त्यामुळे जिल्ह्याच्या नागरी व ग्रामीण भागातील सर्व सफाई कर्मचारी यांची नियमित आरोग्य तपासणी तसेच त्यांच्या निवासस्थानाची दुरुस्ती कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, असे निर्देश राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांनी दिले.



राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य वावा यांनी आज सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, श्री वीरेंद्र नाथ सामाजिक सल्लागार, संदीप चव्हाण, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, सहायक आयुक्त जिल्हा नगर प्रशासन अधिकारी विणा पवार, सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे, महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार , उपायुक्त आशिष लोकरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, समाज कल्याण अधिकारी सचिन कवले, पोलीस विभागाचे राजन माने, तसेच जिल्ह्यातील सर्व नगर परिषदांचे मुख्याधिकारी तसेच सफाई कामगार तक्रार निवारण समितीचे सदस्य खज्जप्पा दादनवस, वाळुंजकर, सायमन गड्डू, श्रीनिवास रामगल, बाली मंडेपु आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. वावा यांनी केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मिळेल यासाठी संबंधित प्रमुखांनी दक्षता घ्यावी. एक ही सफाई कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय शासकीय योजनेपासून वंचित राहणार नाहीत यासाठी प्रयत्न करावेत. सफाई कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. तसेच मेडिक्लेम योजनेचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मिळावा यासाठी जिल्ह्यातील बँकामार्फत प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचित केले. सफाई कामगारांना देण्यात येणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या घरांच्या योजनेबाबत आढावा घेण्यात आला. तसेच सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबत, सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य शिबिराचे आयोजन तसेच त्यांना हॅपिटायटीस बी इंजेक्शन याबाबत माहिती देण्यात आली. तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या किमान वेतन व सेवा पुस्तके अद्यावत करण्याबाबत आढावा घेण्यात आला.

सफाई कर्मचाऱ्यांना रमाई आवास योजना तसेच पंतप्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत घरांचे अनुदान वाटप मंजूर करण्याबाबत आढावा घेण्यात आला. सफाई कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर आर्थिक लाभाबाबत आढावा घेतला.

# स्थानिक केबल नेटवर्कद्वारे अक्षता सोहळ्याचे थेट प्रक्षेपण

### श्री सिद्धेश्वर महायात्रेचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

श्री सिद्धेश्वर महायात्रा दिनांक १२ ते १६ जानेवारी या कालावधीत आहे. सिद्धेश्वर अक्षता सोहळ्याचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल नेटवर्कद्वारे दाखवण्यात येणार आहे. सर्व संबंधित शासकीय विभाग तसेच देवस्थान पंच कमिटी यांना कृती आराखड्या प्रमाणे सोपवलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेऊन यात्रा कालावधीत भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा सहज व सुलभ रीतीने उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील व्हीआयपी सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ अंतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलिस उपआयुक्त दीपाली काळे, महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सोलापूर महानगरपालिकेच्या अभियंता श्रीमती अकुलवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्ती सागर ढोले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता विशाल लेंगरे, महानगरपालिकेचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच देवस्थान पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ च्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील नियमावलीप्रमाणे सर्व संबंधित विभागाच्या जबाबदारी प्रमाणे कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्यानुसार सर्व संबंधित विभागानी त्यांची जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. यात्रा कालावधीत येणाऱ्या हजारो भाविकांना कोणत्याही प्रकारच्या अडथळ्याशिवाय सहज दर्शन व्हावे तसेच मनोरंजन नगरीमध्ये त्यांना सहभाग घेता येईल याबाबत काळजी घ्यावी. मनोरंजन नगरीमध्ये नागरिकांना धुळीचा त्रास होणार नाही या अनुषंगानेही महानगरपालिका व देवस्थान कमिटी यांनी योग्य उपाय योजना कराव्यात असेही त्यांनी सूचित केले. निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी श्री सिद्धेश्वर महायात्रा यशस्वी होण्यासाठी प्रत्येक विभागावर सोपविण्यात आलेली जबाबदारी तसेच त्यांनी आत्तापर्यंत केलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत सादर केली. श्री सिद्धेश्वर महायात्रा दिनांक १२ ते १६ जानेवारी या कालावधीत होत असून दिनांक १२ जानेवारी रोजी ६८ लिंग प्रदर्शन, १३ जानेवारी रोजी अक्षता कार्यक्रम, १४ जानेवारी होम हवन असे कार्यक्रम होणार असल्याची माहिती मंदीर समिती यांनी दिली. मंदिर समितीच्या वतीने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली तसेच समितीच्या वतीने जवळपास १५० स्वयंसेवक पोलिसांच्या मदतीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. अक्षता सोहळा कार्यक्रम जास्तीत जास्त भाविकांना पाहता यावा यासाठी समितीच्या वतीने एलईडी स्क्रीन जागोजागी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.




### नीलकंठ सहकारी बँकेच्या वतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सत्कार

**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

नीलकंठ सहकारी बँकेच्या वतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सोलापुरात सत्कार करण्यात आला. सहकार मंत्री पाटील यांनी बँकेच्या कामाचे कौतुक केले. नीलकंठ सहकारी बँकेच्या वतीने व्हाईस चेअरमन सीए धनराज नोगजा यांच्या हस्ते फेटा बांधून शाल व सोलापुरी टेक्स्टाईल पुष्पगुच्छ देऊन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेची आर्थिक प्रगती, सामाजिक बांधिलकीतून राबवित असलेल्या उपक्रमाची माहिती सीए धनराज नोगजा यांनी मंत्र्यांना दिली.

यावेळी चेअरमन विजयकुमार उपाध्ये, संचालक कौस्तुभ करवा, जमनादास भुतडा, चंद्रकांत तापडिया, आनंद झंवर, बँकेचे शाखाधिकारी आनंद बलदवा आदी मान्यवर उपस्थित होते.




सोलापूर : समता मराठी विद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा सोहळा उत्साहात पार पडला.



सोलापूर : जय भारत शाळेत सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरी झाली.



व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

### सोरेगाव येथे साहाय्य व्यसनमुक्ती, पुनर्वसन केंद्राचे उद्घाटन

**सोलापूर, दि.५ जानेवारी-**

सोरेगाव येथे साहाय्य व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्राचे उद्घाटन उद्योगपती दत्ता सुरवसे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, प्रिसीजन उद्योग समूहाचे प्रमुख यतीन शहा, प्रिसीजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा उपस्थित होते. संस्थेच्या सर्वेसर्वा सुभदा देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी उद्योजक दत्ता सुरवसे यांच्यासह सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, यतीन शहा, डॉ. सुहासिनी शहा यांनीही देशपांडे तसंच जोशी यांच्या सामाजिक कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. या व्यसनमुक्ती केंद्रात रुग्णांना सर्व प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. शिवाय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे अनेकजण व्यसनमुक्त झाले आहेत, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रसाद जोशी यांनी दिली. याप्रसंगी माजी नगरसेविका रोहिणी तडवळकर, डॉ. अनिकेत देशपांडे, डॉ. प्रमोद कुलकणी, ऋचा आणि डॉ. वरुण देशपांडे, डॉ. अजित गांधी, असावरी सराफ, रोटरी क्लबच्या जान्हवी माखीजा, डॉ.श्रीकांत येळेगावकर उपस्थित होते. सांगता संस्थेचे प्रमुख अनिरुध्द देशपांडे यांनी केले. सूत्रसंचालन अनिरुध्द आणि शुभदा देशपांड यांनी केले.

### आ. राणा जगजितसिंह पाटील यांचे सोलापुरात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आ. राणा जगजितसिंह पाटील हे सोलापूर दौऱ्यावर आले असता भाजपाचे सोलापूर शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी त्यांचे स्वागत केले. संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी मोहिमेचा आढावा घेण्याच्या दृष्टीने भाजपा शहर पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली.



भाजपा महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी अभियान सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राष्ट्रहिताच्या कार्यात सहभागी होण्यासाठी सुरू असलेल्या सदस्यता नोंदणी अभियानात जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे आणि त्यासाठी सर्व पदाधिकारी यांनी प्रयत्न करावे, असे आवाहन या वेळी करण्यात आले. बैठकीला शहर उपाध्यक्ष अनंत जाधव, जय साळुंखे, श्रीनिवास करली, प्रशांत फत्तेपुरकर, प्रविण दर्गोपाटील, अश्विनी चव्हाण, सरचिटणीस रोहिणी तडवळकर, डॉ. नारायण बनसोडे, विशाल गायकवाड, चिटणीस सुनील गोडगाव, सिद्धलिंग मसूती, सुधाकर नराल, नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, संपदा जोशी, कार्यालय प्रभारी अनिल कंदलगी, शहर उत्तर पूर्व मंडल अध्यक्ष प्रथमेश आनंदकर, उत्तर पश्चिम मंडल अध्यक्ष देविदास बनसोडे, मध्य पूर्व मंडल अध्यक्ष गिरीश बत्तुल, मध्य पश्चिम मंडल अध्यक्ष संतोष कदम, दक्षिण पूर्व मंडल अध्यक्ष अर्जुन जाधव, दक्षिण पश्चिम मंडल अध्यक्ष आनंद बिराजदार उपस्थित होते.

# दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर

**६ जानेवारी हा दिवस राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सन १८३२ मध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले. दर्पण'च्या पहिल्या अंकात इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये माहिती दिली जात असे. यामुळे इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी व भावना समजून घेता आल्या. 'दर्पण'ने समाजातील अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यांविरुद्ध आवाज उठवला आणि लोकांना जागरूक केले. या वृत्तपत्राने साडे आठ वर्षे कार्य केले आणि १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. त्याच वर्षी त्यांनी दिग्दर्शन हे वृत्तपत्रही सुरू केले होते. मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू करून त्या माध्यमातून एतद्देशिय समाजाला प्रबोधित करण्याच्या केलेल्या कार्यामुळे त्यांना दर्पणकार म्हणून संबोधले जाते.**

बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ रोजी पोंभुर्ले, जि. सिंधुदुर्ग येथे झाला. तर १८ मे १८४६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी आपल्या शिक्षणाची सुरुवात घरच्या वातावरणात केली आणि नंतर मुंबईत येऊन इंग्रजी व संस्कृत भाषेचा अभ्यास केला. त्यांनी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून काम केले आणि विविध विषयांमध्ये प्रावीण्य मिळवले. त्यांना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या दहा भाषांचे ज्ञान होते.

**पत्रकारिता: एक सामाजिक बदल**

आचार्य जांभेकर यांचा विश्वास होता की पत्रकारिता समाजात एक महत्त्वाची भूमिका बजावते. त्यांनी पत्रकारितेसाठी एक नैतिक आधार तयार केला, ज्यामुळे लेखनात सत्यता, प्रामाणिकपणा आणि सामाजिक दायित्व यांचा समावेश झाला. त्यांच्या लेखनात त्यांनी समाजातील अन्याय, असमानता आणि अज्ञानावर प्रहार केला. यामुळेच पत्रकारिता या माध्यमाने लोकांची जागरूकता वाढवली. दर्पण'च्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेचा पाया घातला. त्यांनी समाजातील समस्यांवर प्रकाश टाकला आणि लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले. त्यांनी दर्पणच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले.

**शिक्षण आणि जागरूकता**

आचार्य जांभेकर यांना शिक्षणाचे महत्त्व समजले होते. त्यांनी शैक्षणिक विषयांवर लिहिताना शिक्षणाच्या प्रसारासाठी आणि सुधारण्यासाठी विविध उपाययोजना सुचवल्या. त्यांच्या विचारधारेत शिक्षणाने समाजात परिवर्तन घडवण्याची शक्ती आहे, हे स्पष्टपणे



दिसते. त्यांनी पत्रकारितेचा उपयोग करून शिक्षणाच्या समस्यांवर प्रकाश टाकला.

त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून 'बॉंबे नेटिव्ह जनरल लायब्ररी'ची स्थापना केली. त्यांनी अनेक विषयांवरील पाठ्यपुस्तके तयार केली, ज्यामुळे शिक्षणाच्या प्रसारात मोठा हातभार लागला. त्यांच्या कार्यामुळे मराठी भाषेत इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदशास्त्र, नीतिशास्त्र यांसारख्या विषयांवरील पहिली पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली. बाळशास्त्री जांभेकर यांचे कार्य मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरले. त्यांनी ज्ञानेश्वरीची पहिली मुद्रित आवृत्ती काढली आणि अनेक शोधनिबंध लिहिले

**सामाजिक न्याय**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा पत्रकारितेत सामाजिक न्यायाचा विचार महत्त्वाचा होता. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे जातीय भेदभाव, स्त्री-पुरुष समानता आणि शोषणाच्या विरोधात आवाज उठवला. त्यांच्या कार्याने समाजातील असमानतेवर प्रहार केला, ज्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली. तसेच समाजातील रूढी, चालीरीती, अज्ञान यांविरुद्ध आवाज उठवला आणि समाज प्रबोधनासाठी त्यांनी 'दर्पण'चा उपयोग केला. जांभेकरांनी सत्य, न्याय, आणि समाजाच्या भल्यासाठी पत्रकारिता करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या या आदर्शावरच पत्रकारिता करण्याचा निर्धार आजच्या पत्रकार दिनी सर्व पत्रकारांनी केला तरच आपण त्यांच्या विचारांचे खरे पाईक ठरू असे वाटते.

**- सुनील सोनटक्के,**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बांगलादेशी न्यायाधीशांची भारतातील प्रशिक्षण योजना रद्द

## अंतरिम सरकारचा निर्णय

**ढाका, ५ जानेवारी**

बांगलादेशने ५० न्यायाधीश आणि न्यायिक अधिकाऱ्यांना भारतातील प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी करण्याची योजना रद्द केली आहे. हा निर्णय बांगलादेशातील अंतरिम सरकारने घेतला आहे.

याबाबतची अधिसूचना रद्द करण्यात आली आहे, असे विधि मंत्रालयाच्या प्रवक्त्याने त्रोटकपणे सांगितले. बांगलादेशातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करीत हा निर्णय घेण्यात आला, असे वृत्त 'द डेली स्टार'ने दिले आहे.

बांगलादेश संवाद संस्थेने ५० कनिष्ठ न्यायपालिकेचे न्यायाधीश १० फेब्रुवारीपासून राष्ट्रीय न्यायिक अकादमी आणि मध्यप्रदेशातील राज्य न्यायिक अकादमीत प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतील, असे यात म्हटले होते.

या कार्यक्रमांतर्गत निवडण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थी न्यायाधीशांमध्ये जिल्हा व सत्र न्यायाधीश किंवा त्याच्या समकक्ष अधिकारी, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, संयुक्त जिल्हा न्यायाधीश, वरिष्ठ सहाय्यक न्यायाधीश आणि सहाय्यक न्यायाधीशांचा समावेश होता.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा सर्व खर्च भारत सरकार उचलणार होता. मागील वर्षी ५ ऑगस्ट रोजी पदच्युत पंतप्रधान शेख हसीना भारतात आल्यानंतर भारत आणि बांगलादेशात तणाव वाढला आहे. ८ ऑगस्ट रोजी मोहम्मद युनुस यांच्या नेतृत्वातील अंतरिम सरकार सत्तेत आल्यानंतर हिंदू समुदायाच्या सदस्यांवर आणि त्यांच्या प्रार्थनास्थळांवर अनेक हल्ले झाले आहेत. (वृत्तसंस्था)



भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि मार्गदर्शक डॉ. मुरलीमनोहर जोशी यांनी रविवारी वयाच्या ९१ व्या वर्षात पदार्पण केले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन डॉ. जोशी यांना शुभेच्छा दिल्या

# पाणीपुरीवाल्याची कमाई पाहून जीएसटी विभागाला थंडीत दरदरून घाम!

**चेन्नई, ५ जानेवारी**

'पानीपुरीवाले भय्या' वर्षभरात किती कमाई करेल, याचा तुम्ही कधी विचार केला आहे का, त्यांच्या लाखोंच्या उत्पन्नाचा अंदाज लोकांना येत नाही. तामिळनाडूतील एका पाणीपुरीवाल्याने आपल्या कमाईने इंटरनेटवर खळबळ उडवून दिली आहे.

तामिळनाडूतील पाणीपुरीवाल्या भय्याने ऑनलाईन पेमेंट (फोन-पे, रॉजर-पे) द्वारे एका वर्षात ४० लाख रुपये कमावले. त्यानंतर त्याला जीएसटी विभागाची नोटीस मिळाली. ही नोटीस सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे आणि कॉर्पोरेट नोकऱ्यांमधील लोक त्यांच्या गरिबीबद्दल रडत आहेत!

### थेट नोटीस धाडली

नोटीसचे हे छायाचित्र सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केले जात आहे. नोटीस ट्विटर हँडलने शेअर केली आहे. कॅप्शनमध्ये लिहिले की, तामिळनाडू जीएसटी विभागाने एका पाणीपुरी विक्रेत्याला नोटीस पाठवली, कारण भाऊ, तुमच्या फोन-पे आणि गुगल-पेमध्ये १ वर्षात ४० लाखांची विक्री दिसत आहे, ती रोखीत असती तर वेगळे असते. बरे, या बातमीने देशाला आश्चर्य कमी आणि मी चुकीच्या पंक्तीत आलो, याची जास्त नाराजी आहे, मला पाणीपुरी विकता आली असती.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या नोटीसमध्ये १७ डिसेंबर ही तारीख लिहिली आहे. ही नोटीस तामिळनाडू वस्तू आणि सेवा कर कायदा आणि केंद्रीय जीएसटी कायद्याच्या कलम ७० अंतर्गत जारी करण्यात आली. यात विक्रेत्याकडून गेल्या तीन वर्षांतील व्यवहारांचा तपशील मागविण्यात आला. विशेषत: २०२३-२४ या आर्थिक वर्षात कमावलेल्या मोठ्या रकमेवर प्रश्न उपस्थित केले गेले आहेत, ही माहिती डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्मवरून गोळा केली गेली आहे. (वृत्तसंस्था)

# हिलरी क्लिंटन, जॉर्ज सोरोस यांना अमेरिकेचा सर्वोच्च पुरस्कार

## ज्यो बायडेन यांच्या हस्ते १९ जणांचा सन्मान

**वाशिंग्टन, ५ जानेवारी**

मावळते राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी शनिवारी व्हाईट हाऊसमध्ये १९ जणांना अमेरिकेचा सर्वोच्च सन्मान अर्थात स्वातंत्र्याचे राष्ट्राध्यक्ष पदक प्रदान केले. यात माजी परराष्ट्रमंत्री हिलरी क्लिंटन आणि अब्जाधीश तसेच डावे विचारवंत जॉर्ज सोरोस यांचा समावेश आहे. सोरोस यांच्या मुलाने हा सन्मान स्वीकारला.





सोरोस यांनी लोकशाही, मानवाधिकार, शिक्षण आणि सामाजिक न्याय बळकट करणाऱ्या जगभरातील संस्थांना पाठिंबा दिल्याने त्यांचा सन्मान करण्यात येत आल्याचे सांगण्यात आले. सन्मान करण्यात आलेल्यांमध्ये फुटबॉल सुपरस्टार लिओनेल मेस्सी, फॅशन डिझायनर राल्फ लॉरेन, अभिनेता डेन्झेल वॉशिंग्टन यासारख्या दिग्गजांच्या नावांचाही समावेश आहे. राजकारण, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना हा सन्मान देण्यात येतो.

समारंभाला संबोधन करताना बायडेन म्हणाले, राष्ट्राध्यक्ष म्हणून विविध क्षेत्रात अतुलनीय काम करणाऱ्या असाधारण नागरिकांचा सन्मान करण्याचा मान मिळाला याचा मला आनंद होत आहे. अमेरिकेच्या संस्कृतीला आणि कारणाला आकार देण्यासाठी पुरस्कार प्राप्त नागरिकांनी केलेले प्रयत्न सर्वांसाठी कौतुकाची बाब आहे.

चार पुरस्कार मरणोत्तर देण्यात आले. यात मिशिगनचे माजी गव्हर्नर जॉर्ज डब्ल्यू. रोमनी, माजी अॅटर्नी जनरल आणि सिनेटर रॉबर्ट एफ. केनेडी, माजी संरक्षण सचिव अॅश कार्टर आणि मिसिसिपी फ्रीडम डेमोक्रॅटिक पार्टीचे संस्थापक फॅनी लू हॅमर यांचा समावेश आहे. मेस्सी हा पुरस्कार घेण्यासाठी उपस्थित नव्हता. (वृत्तसंस्था)

# साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारास स्वातंत्र्यवीरांचे नाव

## महामंडळाच्या बैठकीत निर्णय

**मुंबई, ५ जानेवारी**

नवी दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनात एका प्रवेशद्वारास स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव देण्यात येणार आहे. आयोजकांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब केले.

फेब्रुवारीमध्ये दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ, प्रवेशद्वार किंवा व्यासपीठाला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव द्यावे, अशी मागणी अनेक सावरकरप्रेमींनी साहित्य महामंडळ व आयोजकांकडे केली होती. या मागणीची अखेर दखल घेण्यात आली असून, संमेलनाच्या एका प्रवेशद्वाराला सावरकरांचे नाव देण्याचा निर्णय मुंबईत झालेल्या बैठकीत एकमताने घेण्यात आला.

२१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्लीत होणाऱ्या या संमेलनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी साहित्य महामंडळ, घटक संस्था व सरहद या आयोजक संस्थेची संयुक्त बैठक मुंबईत आयोजित करण्यात आली होती. यावेळी संमेलनात सावरकर यांचे नाव देण्याबाबत सावरकरप्रेमींनी विविध माध्यमातून आयोजक महामंडळाकडे केलेल्या मागणीवर सर्वंकष चर्चा झाली. चर्चेअंती असे ठरले की, तालकटोरा मैदानावरील जे मुख्य प्रवेशद्वार असेल, त्याला लोकमान्य टिळकांचे नाव व मैदानाच्या आत 'व्हीआयपी' प्रवेशद्वाराला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव देण्यात येईल.

### यापूर्वी भुजबळांकडून प्रस्ताव नामंजूर

नाशिक येथे पार पडलेल्या ९४ व्या साहित्य संमेलनात सावरकर यांचे चरित्र आणि कथांचा समावेश करावा व प्रवेशद्वार अथवा व्यासपीठाला त्यांचे नाव द्यावे, अशी मागणी करण्यात आली होती. परंतु, संमेलनाचे स्वागताध्यक्ष छगन भुजबळ यांनी या संदर्भातील प्रस्ताव फेटाळून लावला होता.

# जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पुरस्कारांचे आज वितरण


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार दैनिक 'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने, पत्रकार विनोद कामतकर, आफताब शेख यांना जाहीर झाला आहे. गौरव पत्र, पाच हजार रुपये रोख, शाल श्रीफळ, पुस्तके असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्कारांचे वितरण सोमवार, ६ जानेवारी रोजी दु. १२.३० वा. विजापूर रोडवरील पत्रकार भवन येथे होणार आहे. आ. देवेंद्र कोठे, पोलिस आयुक्त एम. राजकुमार आणि जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक मठपती यांच्या उपस्थितीत पुरस्कारांचे वितरण होणार आहे. कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्याध्यक्ष अय्युब नल्लामंदू व सचिव प्रा. पी.पी. कुलकर्णी यांनी केले आहे.

# जागतिक बँकेकडून पाकिस्तानला २० अब्ज डॉलर्सचे कर्ज

**इस्लामाबाद, ५ जानेवारी**

जागतिक बँकेने पाकिस्तानला २० अब्ज डॉलर्सचे कर्ज मंजूर केले आहे. पाकिस्तान कंट्री पार्टनरशिप फ्रेमवर्क २०२५-३५ कार्यक्रमांतर्गत निर्धारित करण्यात आलेल्या सात उद्देशासाठी कर्जाची रक्कम खर्च करण्यास परवानगी राहणार आहे. दहा वर्षे विविध उपक्रम राबविण्यासाठी कर्ज मंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले.




जागतिक बँकेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, गरिबांचा आर्थिक स्तर सुधारणे, जलवायू परिवर्तन, पर्यावरण, शिक्षण, उत्पादकता सुधारण्यासह खाजगी गुंतवणूक वाढविण्यासारख्या योजनांवर कर्जाची रक्कम खर्च करता येणार आहे. पाकिस्तान या उद्दिष्टांची पूर्तता करेल, अशी अपेक्षा जागतिक बँकेने व्यक्त केली. २०२५ ते २०३५ या काळात पाकिस्तानात तीन सार्वत्रिक निवडणुका होण्याची शक्यता आहे. देशात लोकशाही मजबूत करण्यासाठी हा निधी वापरता येणार आहे.

१४ जानेवारीला जागतिक बँकेची बैठक होणार असून, त्यानंतर दक्षिण आशिया क्षेत्राचे बँकेचे अध्यक्ष मार्टिन रायसर पाकिस्तानचा दौरा करणार आहे. उपक्रमाचा एक भाग असलेल्या पाकिस्तानच्या अधिकाऱ्याने सांगितले की, पाकिस्तान हा पहिला देश आहे, ज्याची जागतिक बँकेने पार्टनरशिप फ्रेमवर्क २०२५-३५ कार्यक्रमांतर्गत १० वर्षांच्या भागीदारीसाठी निवड केली आहे. (वृत्तसंस्था)






## अग्रलेख...

# बिघडलेली 'इंडिया' आघाडी

विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीमध्ये काही दिवसांपासून गोंधळ सुरू आहे. हा गोंधळ काँग्रेसला सर्वाधिक अस्वस्थ करीत आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व करण्यास तयार असल्याचे सांगितले तेव्हा 'इंडिया' आघाडीमध्ये सर्व काही ठीक नाही, याचे संकेत मिळाले. उद्योजक गौतम अदानी प्रकरणावरून काँग्रेस संसदेत गोंधळ घालत असताना ममता यांचे हे वक्तव्य आल्यानंतर 'इंडिया' आघाडीमधील इतर सर्व पक्ष अदानी मुद्याला महत्त्व देण्यास फारसे तयार नसल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेसला अदानी मुद्यावर प्रादेशिक पक्षांपुढे झुकावे लागले, हे विचित्र आहे. ममता या 'इंडिया' आघाडीच्या योग्य नेत्या असल्याच्या विधानांना इतर काही नेत्यांनी आणि विशेषतः लालूप्रसाद यादव यांनीही पाठिंबा दिला होता. समाजवादी पक्षाचे सरचिटणीस रामगोपाल यादव यांनी 'इंडिया'चे नेते राहुल नसून मल्लिकार्जुन खडगे असल्याचे सांगितल्यावर काँग्रेसच्या मित्रपक्षांना राहुल यांचे नेतृत्व आवडत नसल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेस राहुल गांधी यांच्याकडे 'इंडिया' आघाडीचे केवळ नेतेच नाही, तर भावी पंतप्रधान म्हणूनही पाहात आहे. अलिकडेच आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी दिल्लीतील काही काँग्रेस नेत्यांवर दिल्ली लोकसभा निवडणुकीत 'आप'चा पराभव करून भाजपाच्या विजयाला हातभार लावल्याचा आरोप केला. त्यामुळे 'आप' आणि काँग्रेसमधील दरी वाढत चालली आहे. हरयाणा विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने युती न करता स्वबळावर निवडणूक लढवल्यापासून या दोन पक्षांत कमालीचे अंतर वाढले आहे. भाजपापेक्षा आता तेच परस्परांचे शत्रू असल्यासारखे वागायला लागले आहेत. दरम्यान, आम आदमी पक्षाचे नेते काँग्रेसवर संतप्त झाले आहेत. अजय माकन यांनी तर केजरीवाल यांच्यावर फसवणुकीचा आरोप केला आहे. ज्या केजरीवाल यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचा पराभव केला, त्यांचे चिरंजीव माजी खासदार संदीप दीक्षित हेच आता केजरीवाल यांच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढवणार आहेत. 'आप'ने खाजगी संस्थांमार्फत सुरू केलेल्या सर्वेक्षणाविरोधात दीक्षित यांनी आता उपराज्यपालांकडे तक्रार केली आहे. 'आप'ची महत्त्वाकांक्षी 'महिला सन्मान योजना' आता चौकशीच्या फेऱ्यात अडकली आहे. २०१३ मध्ये आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन सरकार स्थापन करणे ही काँग्रेसची चूक होती, हे आता माकन यांनी मान्य केले. गेल्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आम आदमी पक्षाशी झालेली आघाडीही त्यांनी अयोग्य ठरवली आहे. माकन यांनी तर केजरीवाल यांना देशद्रोही म्हटले. त्यांच्या वक्तव्यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी आणि राज्यसभा सदस्य संजय सिंह यांनी इशारा दिला की, काँग्रेसने माकन यांच्यावर कारवाई न केल्यास आम आदमी पक्ष 'इंडिया'मधून काँग्रेसला हटवण्याची मागणी करेल. वास्तविक पाहता, 'इंडिया' आघाडीतून काँग्रेसची हकालपट्टी करण्याची मागणी हास्यास्पद आहे. 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांमधील तणाव वाढत असल्याचे यावरून दिसून येते. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली 'इंडिया'ची स्थापना झाली, तेव्हा ही आघाडी केवळ भाजपाला पर्यायी धोरणे आणि विचारांद्वारे विरोध करणार नाही, तर देशाला राजकीय दिशा देण्याचे काम करेल, असे मानले जात होते; परंतु ती पर्यायी विचार देऊ शकली नाही. 'इंडिया' आघाडी देशासमोर कोणताही प्रभावी दृष्टिकोन किंवा किमान समान कार्यक्रम मांडू शकली नाही. भाजपाला राज्यघटना बदलायची आहे, असे वातावरण काँग्रेसच्या नेतृत्वाखालीच निर्माण झाले. अशा वातावरणामुळे लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ९९ जागा मिळाल्या आणि भाजपाच्या जागा २४० वर आल्या, तेव्हा विरोधी 'इंडिया' आघाडीचा विजय झाल्यासारखे वातावरण तयार करण्यात आले. हा प्रचार काँग्रेसने सर्वाधिक केला; पण हरयाणा आणि नंतर महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या निकालांनी लोकसभेच्या निवडणुकीतील 'इंडिया' आघाडीने मिळविलेला विजय हा अपघात होता, हे सिद्ध झाले. कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल आणि काही प्रमाणात हरयाणा-पंजाबमध्ये काँग्रेसचे प्रभावी अस्तित्व आहे. इतर राज्यांमध्ये ती एकतर खूपच कमकुवत आहे किंवा प्रादेशिक पक्षांच्या दयेवर आहे. लोकसभेमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून तो नक्कीच उदयास येतो; पण त्यात मित्रपक्षांचे योगदान आहे. दिल्लीमध्येही काँग्रेसची पीछेहाट झाली आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये केजरीवाल काँग्रेससोबत समन्वय साधणार नसल्याचे आधीच स्पष्ट झाले होते. दिल्लीमध्ये आम आदमी पक्ष, भाजपा आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होऊ शकते. गेल्या १० वर्षांच्या सत्ताविरोधी समस्येवर मात करण्यासाठी आम आदमी पक्ष जोरदार प्रयत्न करत आहे. तिरंगी लढत झाल्यास भाजपाकडून 'आप'चा पराभव होईल. भाजपासाठी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. काँग्रेसने दिल्लीमध्ये जोर लावून निवडणूक लढवू नये, असे 'आप'ला वाटते, तर दिल्लीत काँग्रेसची ताकद वाढली, तरच 'आप'चा पराभव करता येईल, असे भाजपाचे गणित आहे. दिल्लीत जोरदार मुकाबला करायचा असेल, तर भाजपासह काँग्रेसला 'आप'वर हल्लाबोल करावा लागणार आहे. दिल्लीनंतर बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. तिथे झारखंडमधील झारखंड मुक्ती मोर्चाप्रमाणेच काँग्रेस राष्ट्रीय जनता दलावर अवलंबून असेल. काँग्रेसला स्वतःचे भले करायचे असेल तर प्रादेशिक पक्षांसारखे राजकारण करणे टाळावे लागेल. काँग्रेसने जातनिहाय जनगणना, दलित आणि मागासवर्गीयांचे एकत्रीकरण, अल्पसंख्यकांचे तुष्टीकरण, डॉ. आंबेडकरांचा वारसा आदींच्या आधारे राजकारण केले तर प्रादेशिक पक्षांना अडचणी येतील, असा अंदाज आहे. प्रादेशिक पक्षांच्या मुद्यांवर काँग्रेसने राजकारण करणे टाळले, म्हणून 'इंडिया' आघाडीच्या नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला, यात आश्चर्य नाही. काँग्रेसला राष्ट्रीय पक्ष म्हणून आपली प्रतिमा मजबूत करायची असेल आणि भाजपाचा मुकाबला करायचा असेल तर मूळ विचारसरणीच्या आधारे राजकारण करावे लागेल. मित्रपक्षांनी स्वबळावर राजकारण करायला सुरुवात केली आणि काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली तर लोकसभेतील संख्याबळाचा आलेख खाली जाईल, हे काँग्रेसला माहीत नाही असे नाही; परंतु तिला उमगत नाही. काँग्रेस बळकट झाली तर ती आपल्यासाठी धोक्याचे ठरेल, हे भाजपालाही ठावूक आहे. त्यामुळे काँग्रेसला लक्ष्य करण्याबरोबरच तो मित्रपक्षांनाही इशारा देत आहे. प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देणे भाजपाच्या पथ्यावर पडणार आहे. आपली स्थिती सुधारण्यासाठी काँग्रेसला भाजपाशी एकहाती लढा द्यावा लागेल. सध्या काँग्रेसची केवळ काही राज्यांमध्ये भाजपाला स्वबळावर तोंड देण्याची क्षमता आहे. गेल्या महिनाभरात अनेक प्रमुख मुद्यांवर 'इंडिया' आघाडीतील सहा पक्षांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यामुळे 'इंडिया' आघाडी पुन्हा संयुक्त पुरोगामी आघडीत बदलत असल्याची चर्चा आहे. २०२३ मध्ये, विरोधी पक्षांनी संयुक्त पुरोगामी आघाडी संपवून 'इंडिया' आघाडीची स्थापना केली. नितीशकुमार यांनी २०२२ मध्ये 'यूपीए'च्या विस्ताराची कल्पना मांडली. यासाठी त्यांनी केजरीवालांपासून ममता बॅनर्जींपर्यंत आणि अखिलेश यादवांपासून माकपच्या सीताराम येचुरींपर्यंत सर्वांशी संपर्क साधून रणनीती आखली. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये २६ पक्षांसोबत 'इंडिया' आघाडी तयार झाली. त्यात द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस, झारखंड मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय जनता दल या पक्षांचा आघाडीमध्ये समावेश होता. समाजवादी पक्ष, आप, तृणमूल काँग्रेस, बीएपी आणि आरएलपीए यासारखे नवीन पक्षही आघाडीत सामील झाले. तथापि, जानेवारी २०२४ मध्ये नितीशकुमार यांनी आघाडी सोडत 'एनडीए'मध्ये सामील झाले होते. समाजवादी पक्ष हा लोकसभेतील तिसरा सर्वांत मोठा पक्ष इंडिया आघाडीमध्ये असला, तरी अनेक प्रसंगी या पक्षाने समाजवादी पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या संभल दौऱ्यावरून दोन्ही पक्षांमध्ये मतभेद झाले होते. आता अखिलेश यांनी दिल्ली निवडणुकीत आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन आपले इरादे व्यक्त केले आहेत. एकंदरीत, इंडिया आघाडीतील दरी चांगलीच रुंदावली आहे.

## दिल्ली दिनांक

### रवींद्र दाणी

# नव्या वर्षाची नवी आव्हाने!

सन २०२५! नवे वर्ष सुरू होऊन जेमतेम आठवडा होत असताना, देशाला एका आव्हानाचा मुकाबला करावा लागणार आहे आणि हे आव्हान आहे ढासळणारा रुपया सावरण्याचे! आणखी २५ दिवसांनी लोकसभेत सादर केल्या जाणाऱ्या वार्षिक अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांना ढासळणाऱ्या रुपयाकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. विशेष म्हणजे जगात भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने एक मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत असताना रुपया घसरत आहे.

**डॉलर मजबूत** : जगातील १२ प्रमुख देशांचे चलन अमेरिकेच्या डॉलरच्या तुलनेत कमजोर झाले आहे. म्हणजेच डॉलर मजबूत झाला आहे. काही महिन्यांपूर्वीपर्यंत एका डॉलरसाठी ८४ रुपये मोजावे लागत होते. आता डॉलर रुपया विनिमय दर ८६ रुपयांच्या घरात पोहोचला आहे. काही महिन्यांपूर्वी सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे रुपयाला बळकटी मिळत होती. यातून रुपयाला एक प्रकारची स्थिरता आली होती. डॉलरच्या तुलनेत रुपया कधी कधी वधारतही होता. मात्र, रुपयाची घसरण होत असताना ती फार मामुली होत होती. देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया किती मजबूत आहे, याचे ते एक निदर्शक होते. मात्र, मागील महिन्यात अचानक रुपया वेगाने घसरू लागला व त्याने देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर एक नवे आव्हान निर्माण केले.

**अमेरिकन निवडणूक?** : अमेरिकन निवडणूक निकालांचा हा परिणाम असल्याचे मानले जाते. नवनिर्वाचित राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांची धोरणे डॉलर मजबूत करणारी राहतील, असे मानले गेले. त्याचा स्वाभाविक परिणामही झाला. मागील काही काळात डॉलर मजबूत झाला तर रुपयाची घसरण वेगात झाली.

**केवळ दोन महिन्यांत** : एका डॉलरसाठी ८४ ऐवजी ८५ रुपये मोजावे लागण्याची प्रक्रिया केवळ दोन महिन्यांत पूर्ण झाली म्हणजे दोन महिन्यांत डॉलर एका रुपयाने वधारला. तर, हाच डॉलर ८३ रुपयांवरून ८४ वर जाण्यासाठी तब्बल १४ महिने लागले होते. याचा दुसरा अर्थ म्हणजे या काळात रुपयाची स्थिती चांगली होती तसेच डॉलरला ८२ वरून ८३ रुपयांपर्यंत जाण्यासाठी १० महिने लागले होते. म्हणजे या काळातही रुपया ठीकठाक होता. मात्र, मागील दोन महिन्यांत रुपया कमालीचा कमजोर झाला असून या काळात डॉलर एक रुपयाने महागला.

**आता ८६ कडे वाटचाल?** : रुपया एका डॉलरसाठी ८५ रुपयांवर जाऊन थांबलेला नाही. तो वेगाने ८६ च्या आकड्याकडे जात आहे. रिझर्व्ह बँकेने हस्तक्षेप करून रुपया घसरण्याची प्रक्रिया रोखण्याचा प्रयत्न केला. त्यात काही प्रमाणात यश आले. पण, नंतर रुपया पुन्हा घसरू लागला. गेल्या काही दिवसांत तो ८६ चा आकडा पार करील, अशी लक्षणे आहेत.

**तोटा आणि फायदाही** : रुपया घसरण्याचा, फायदा व तोटा असे दोन्ही परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार असल्याचे मानले जाते. सर्वांत मोठा तोटा म्हणजे कच्च्या तेलाची आयात महाग होणार आहे. याचा फटका काही काळाने सामान्य ग्राहकालाही बसण्याची चिन्हे आहेत. कारण भारतातील पेट्रोलियम कंपन्या फार काळ रुपया कमजोर होण्याचा ताण सहन करू शकणार नाहीत. त्यांना पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ करावीच लागेल. राजधानीत वाहनांना गॅस पुरविणाऱ्या सीएनजीच्या दरात एका महिन्यात दुसऱ्यांदा दरवाढ करावी लागली आहे. दुसरीकडे रुपया घसरल्याचा फायदा आयटी क्षेत्राला मिळणार आहे. रुपया घसरल्याने आयटी क्षेत्राची निर्यात वाढेल असे मानले जाते. मात्र, हा अपवाद वगळता रुपया घसरणे देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी चांगले लक्षण मानले जात नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारामन् लोकसभेत १ फेब्रुवारी रोजी आपल्या भाषणात यासंदर्भात कोणती उपपायोजना करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**दोन निवडणुका** : २०२५ मध्ये दिल्ली व बिहार या दोन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. दिल्लीची निवडणूक तर जवळ आली असून, येत्या काही दिवसांत निवडणूक आयोग दिल्ली निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची शक्यता आहे. दिल्ली विधानसभा जिंकण्याची किमया भाजपाला करावी लागणार आहे. दिल्ली राज्य ३२ वर्षांपूर्वी अस्तित्वात आले. पण १९९३ ची पहिली निवडणूक वगळता भाजपाला हे राज्य कधीही जिंकता आलेले नाही. मात्र, लोकसभेच्या जागा भाजपा जिंकत आला आहे. प्रथम काँग्रेसच्या शीला दीक्षित व आता आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभा निवडणूक जिंकण्याची जादू केली आहे. भाजपाने यावेळी विधानसभा निवडणूक जिंकण्याचा चंग बांधला असून तशी मोर्चेबांधणी चालविली आहे. काँग्रेस व आम आदमी पक्षात कोणताही निवडणूक समझोता होणार नसल्याने ही निवडणूक तिरंगी होणार हे ठरलेले आहे. याचा फायदा उठविण्याचा प्रयत्न भाजपा करणार आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे आम आदमी पक्षाची प्रतिमा डागाळली आहे. पक्ष नेत्यांचे मनोधैर्य खचलेले आहे. याचा फायदा भाजपाला मिळू शकतो, असे राजकीय निरीक्षकांना वाटत आहे तर दुसरीकडे आम आदमी पक्ष केजरीवाल-सिसोदिया यांच्या अटकेचा मुद्दा उपस्थित करून सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे असे दिसते.

**माजी खासदार मैदानात** : लोकसभा निवडणुकीत भाजपाने परवेश वर्मा, रमेश विधुरी व डॉ. हर्षवर्धन यांना उमेदवारी नाकारली होती. हे तिन्ही नेते दिग्गज मानले जातात. परवेश वर्मा हे माजी मुख्यमंत्री स्व. साहिबसिंग वर्मा यांचे सुपुत्र असून जाट समाजाचे नेते आहेत. त्यांना माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. रमेश विधुरी हे गुजर समाजाचे आहेत. दक्षिण दिल्लीतून लोकसभेवर निवडून जाणाऱ्या विधुरी यांना महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघातून उभे करण्यात आले आहे. माजी मंत्री मीनाक्षी लेखी यांनाही विधानसभा निवडणुकीत उभे केले जाण्याची शक्यता आहे. माजी आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन यांचाही उपयोग भाजपाला होऊ शकला असता; पण त्यांना निवडणुकीत उभे केले जाण्याची शक्यता नसल्याचे समजते. भाजपासाठी येणारी निवडणूक अटीतटीची असल्याने पक्ष पूर्ण ताकदीने निवडणुकीच्या मैदानात उतरेल, अशी चिन्हे आहेत.

**आणि बिहार** : २०२५ च्या अखेरीस बिहार विधानसभा निवडणूक होत आहे. तेथे नितीशकुमार यांचा जनता दल युनायटेड व भाजपा यांची युती विजयी होईल, असा आजचा अंदाज आहे. पण, बिहारचे जातीय समीकरण नेहमी धक्कादायक निकाल देत आले आहे. नितीशकुमार यांची मानसिक स्थिती हा एक चर्चेचा विषय झाला आहे. त्यांची मानसिक अवस्था एकदम ठीकठाक नसल्याचे समजते. सार्वजनिक कार्यक्रमात ते जे बोलतात, जसे वागतात याने त्यांच्या मानसिक स्थितीबाबत संभ्रम तयार केला आहे. दुर्दैवाने राज्यात भाजपाजवळही राज्याला सक्षम नेतृत्व देऊ शकणारा नेता नाही. माजी उपमुख्यमंत्री सुशीलकुमार मोदी यांची ती प्रतिमा तयार होत होती. मात्र, त्यांचे कर्करोगाने काहीसे अकस्मात निधन झाल्याने भाजपा नेतृत्वात एक प्रकारची पोकळी तयार झाली आहे.

**पुन्हा अनिश्चितता?** : बिहारमधील मागील काही दिवसातील घटनाक्रम पुन्हा अनिश्चिततेचा संकेत करणारा आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार असे विरोधाभासी संकेत का देत आहेत, हे त्यांनाच ठावूक असावे. यात त्यांची प्रतिमा व विश्वसनीयता कमजोर होत आहे. याची बहुधा त्यांना कल्पना नसावी. पण, या घटनाक्रमात फार तथ्य नसावे असे दिसते. त्याचा बिहार निवडणुकीवर परिणाम होण्याची शक्यताही नाही. आजच्या स्थितीत तरी बिहारची निवडणूक जनता दल युनायटेड-भाजपा युती निश्चितपणे जिंकेल, असे म्हणता येईल. अर्थात ही निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होणार आहे.

**अर्थसंकल्पाची तयारी** : राजधानी दिल्लीला कडाक्याच्या थंडीने गारठले असताना नॉर्थ ब्लॉकमध्ये नव्या अर्थसंकल्पाची तयारी सुरू झाली आहे. अर्थसंकल्पावर शेवटचा हात फिरविला जात आहे. बाजारात काही प्रमाणात मंदीचे सावट आहे. हे दूर करण्यासाठी सामान्य ग्राहकांची क्रयशक्ती वाढविण्याची उपाययोजना सरकारकडून केली जाण्याची शक्यता आहे. त्याचाच एक भाग म्हणजे सामान्य नागरिकाला आयकरात सूट दिली जाण्याची चर्चा केली जात आहे. सामान्य नागरिकास आयकरात सूट दिल्यास यामुळे त्याच्या खिशात जो पैसा वाचेल त्याचा वापर तो बाजारात जाऊन खरेदीसाठी करील. स्वाभाविकच बाजारातील मागणी वाढेल. मागणी वाढल्याने उत्पादन वाढेल. हे चक्र वेगात फिरल्यास मंदीचे सावट काही प्रमाणात दूर होण्यास मदत होईल, असे अर्थतज्ज्ञांना वाटते. पंतप्रधान व अर्थमंत्री अर्थव्यवस्थेवर तसेच ढासळत्या रुपयावर कोणती उपाययोजना करतात याचे काही संकेत १ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पात मिळतील.

## वेध

### अनिरुद्ध पांडे

# योद्धा संत गुरू गोविंदसिंह...

हिंदू धर्मरक्षक म्हणून इतिहासात नोंद असलेले शिखांचे दहावे गुरू गोविंदसिंह यांचा आजचा पौष शुक्ल सप्तमी हा ३५८ वा जयंती दिन. १६६६ मध्ये जन्मलेले योद्धा संत गुरू गोविंदसिंहांचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी अंकित आहे. न्याय आणि धर्मरक्षणार्थ शीख संप्रदायात त्यांनी १६९९ मध्ये खालसा पंथाची स्थापना केली. शीख गुरू परंपरेतील गोविंदसिंह हे दहावे आणि शेवटचे गुरू. शीख संप्रदायाचे पहिले गुरू नानक यांना सारे जाणतात. त्यानंतर गुरू अंगद, गुरू अमर, गुरू रामदास, गुरू अर्जुन, गुरू हरगोविंद, गुरू हरराय, गुरू हरकृष्ण, गुरू तेगबहादूर आणि गुरू गोविंदसिंह असे शिखांचे दहा गुरू आहेत. ही गुरू परंपरा दहावे गुरू गोविंदसिंह यांनी समाप्त केली. त्यांनी यानंतर ग्रंथ साहिबांनाच गुरू मानण्याचा आदेश शिखांना दिला. त्यानंतर 'गुरू ग्रंथसाहिब' ही ओळख निर्माण झाली. गुरू गोविंदसिंह यांनी आपले सर्वस्व अन्याय, अत्याचाराशी संघर्ष करून लोककल्याणासाठी खर्च केले. आपले वडील शिखांचे नववे गुरू तेगबहादूर यांचा बलिदान वारसा पुढे चालवून आपल्या चारही पुत्रांचे धर्मरक्षणासाठी बलिदान दिले. गुरू गोविंदसिंहांच्या अंतिमसमयी त्यांच्या अनुयायांनी आपल्यानंतर आमचे गुरू कोण? असे विचारले असता ते म्हणाले,

*आज्ञा हुई अकाल की, तबही चलाई यो पंथ*
*सब सिख्खन को हकूम है, गुरू मानियो ग्रंथ..*

यानुसार गुरू गोविंदसिंहांनी पवित्र अशा गुरू ग्रंथसाहिब या ग्रंथालाच यानंतर गुरू मानण्याचा आदेश दिला. त्यानुसार शिखांमधील गुरू परंपरा त्यावेळी गुरू गोविंदसिंह या दहाव्या गुरूंनी संपुष्टात आणली. तेव्हापासून गुरू ग्रंथसाहिबास आदर्श मानून खालसा पंथ आजही देश व धर्माचे रक्षण करीत आहे. वडिलांचे बलिदान, चार मुलांचे बलिदान, खालसा पंथाची स्थापना, शिखांमधील गुरू परंपरेऐवजी गुरू ग्रंथसाहिबाची योजना या साऱ्यांमुळे भारतीय इतिहासात गुरू गोविंदसिंहांचे नाव सुवर्णाक्षरांनी अंकित झाले आहे. शिखांमधील लढवय्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खालसा पंथाची स्थापना याच गुरू गोविंदसिंहांनी केली आहे. त्यांच्या काळातही सांप्रदायिक उन्माद जोरात होता. मोगलांचा राजाश्रय कट्टरपंथी मुसलमानांना मिळत असे. त्यांच्या वाढत्या अन्याय-अत्याचारांचा प्रतिकार करण्यासाठी १६९९ मध्ये बैसाखीच्या दिवशी गुरू गोविंदसिंहांनी खालसा पंथाची स्थापना केली. हा खालसा पंथ म्हणजे हिंदुत्वाचे रक्षण करण्यासाठी लढवय्या व शिस्तबद्ध सैनिकांची आघाडीच होती. खालसा पंथाच्या स्थापनेच्या घोषणा केल्यानंतर गुरू गोविंदसिंहांनी आता तुमच्यापैकी कोण बलिदानासाठी सज्ज आहे, अशी विचारणा केली. त्यावर एक युवक पुढे आला. तो होता दयासिंह. त्याला घेऊन गुरू बाजूच्याच राहुटीत गेले आणि थोड्या वेळाने रक्ताने माखलेली तलवार घेऊन बाहेर आले. पुन्हा प्रश्न विचारला, आता कोण येणार बलिदानासाठी...?

यानंतर आणखी एक शीख युवक पुढे आला. त्यालाही आत नेऊन गुरू रक्ताळलेली तलवार घेऊन बाहेर आले. बलिदानासाठी स्वयंस्फूर्तीने पुढे आलेल्या आणखी तिघांना अशाच पद्धतीने त्यांनी आत नेले. समोरचा जमाव या साऱ्या प्रकाराने अतिशय हादरलेला आणि स्तब्ध झाला होता. अखेर गुरू गोविंदसिंहांनी या साऱ्या शांततेवर पडदा टाकला आणि त्या पाचही युवकांना बाहेर आणले. दयासिंहांनंतर बलिदानासाठी तयार झालेल्या धर्मसिंह, हिंमतसिंह, मोहकसिंह आणि साहबसिंह या पाचही युवकांना त्यांनी 'पंचप्यारे' म्हणून घोषित केले. हे पंचप्यारे शीख संप्रदायातील खालसा पंथाचे अविभाज्य घटक असून त्यांना शीख बांधव खूप मानतात. गुरू गोविंदसिंहांनी स्थापन केलेल्या खालसांना गणवेश किंवा नियम म्हणून पाच 'ककार' दिले. त्यात केस कधीच कापायचे नाहीत, लोखंडी कडे नेहमी परिधान करायचे, कंगवा लाकडी वापरायचा, कच्छा वापरायचा आणि कृपाण म्हणजे कट्यार परिधान करायची, हे त्यांच्यासाठी निर्देश होते. तेव्हापासून पंजाबमध्ये बैसाखीचा सण उत्साहाने साजरा होतो. गोविंदसिंहाचे वडील आणि शिखांचे नववे गुरू तेगबहादूर यांचा त्यावेळी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिला म्हणून मोगल बादशाह औरंगजेबाने शिरच्छेद केला होता. तर चार मुलांपैकी पहिला अजितसिंह व दुसरा झुंझारसिंह हे औरंगजेबाचा सेनापती वजीरखानसोबत लढताना हुतात्मा झाले होते. तर, याच वजीरखानने दोन्ही लहान मुले जोरावरसिंह व फतेहसिंह यांना भिंतीत गाडून टाकले होते. अशा चारही मुलांच्या बलिदानानंतरही गुरू गोविंदसिंह विचलित झाले नाहीत. चमकौरच्या लढाईत १० लाखांच्या मोगल सैन्यास फक्त ४२ खालसा वीरांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पिटाळून लावले होते. गुरू गोविंदसिंह म्हणत,

*चिडियों से मैं बाज लढाऊं*
*गिदडों को मैं शेर बनाऊं*
*सवा लाख से एक लडाऊं*
*तब गुरू गोविंदसिंह नाम कहाऊं...*

९८८१७१७८२९

## कानोसा

### अमोल पुसदकर

# हेची फळ काय मम तपाला!

इंजिनीअरिंगला सतत नापास होणाऱ्या एका मुलाने आपल्या आई-वडिलांची हत्या केल्याची अत्यंत सुन्न करणारी बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली. हा मुलगा सातत्याने जवळपास सहा वर्षांपासून नापास होत होता. त्यामुळे त्याचे वडील त्याला सातत्याने 'तू इंजिनीअरिंग सोडून दे व दुसरा कोणता तरी अभ्यासक्रम कर' असे सांगत होते. आईसुद्धा त्याला 'काहीतरी कामधंदा कर' असे सांगत होती. परंतु मुलगा तो अभ्यासक्रम सोडायला तयार नव्हता. यावरून त्यांच्यामध्ये अनेक वेळा वादविवाद व्हायचे. शेवटी ते वादविवाद इतके वाढत गेले की, एक दिवस त्याने आपल्या आई-वडिलांना संपविण्याचा निर्णय घेतला. अपत्यप्राप्ती हा आई-वडिलांच्या जीवनातील कितीतरी मोठा आनंदाचा क्षण असतो. त्याचे लाड-कौतुक, त्याचे बालपण यामध्ये ते रमलेले असतात. ज्यांनी जन्म दिला, राहायला घर दिले, सर्व सोयी-सुविधा दिल्या, त्यांना संपवण्याचा निर्णय करणारा कपाळकरंटा ही याच सभ्य समाजाची निर्मिती आहे, हे स्वीकारायला मन तयार होत नाही.

बरेचदा आई-वडील मुलांवर आपल्या अपेक्षांचे ओझे लादतात, असे म्हटले जाते. आई-वडिलांना वाटते की, आमच्या जीवनात आम्ही चांगले शिक्षण घेतले नाही तर आमच्या मुलांनी तरी घेतले पाहिजे किंवा आम्ही चांगले शिक्षण घेतलेले आहे, आमची मुलंही चांगले उच्चशिक्षित झाले पाहिजे. या दोन्ही कारणांसाठी ते मुलांना चांगला अभ्यासक्रम निवडण्याचा आग्रह धरतात. त्यासाठी त्यांना महागडे शिकवणी वर्ग लावून देतात. लाखो रुपये शुल्क भरून चालणारे हे अभ्यासक्रम आणि त्यांचे दिवसभर चालणारे शिकवणी वर्ग त्यामुळे अनेक वेळा मुलांचा कोंडमारा होतो. मुलांना एक तर त्या विषयात रुची नसते किंवा जे शिकवलं जात आहे ते त्यांना कठीण वाटते किंवा सकाळी गेल्यापासून तर संध्याकाळपर्यंत चालणारे वर्ग हे चार-दोन दिवस त्यांना ठीक वाटतात, सुसह्य वाटतात; पण त्यानंतर त्यांना ते नकोसे होतात. एखादी गोष्ट नकोशी झाली की, मग काहीही झाले तरी ही गोष्ट मी करणार नाही, या निष्कर्षाप्रत ते येऊन पोहोचतात. त्यामुळे त्यांचे त्यांच्या पालकांनी ठेवलेल्या ध्येयावरून लक्ष दूर होऊन जाते. पैसे खर्च करून पालक त्यांचे काम करतात. ज्यांच्याकडे शिकवणी लावली जाते ते शिक्षक शिकवून त्यांचे काम करतात. परंतु ज्याला काही बनायचे आहे, ज्याने अभ्यास करायचा आहे त्याच्या मनात मात्र पूर्णतः नकार असतो. हा नकार पालकांच्या कधी लक्षातच येत नाही तर कधी थोडाबहुत लक्षात येतो, परंतु सर्वार्थाने तो निकाल लागल्यावरच लक्षात येतो. परंतु तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. मुलगा नापास झाला किंवा त्याला कमी गुण मिळाले यामध्ये पालकांमध्ये पराभवाची भावना निर्माण होते. त्यामुळे ते मुलावर आगपाखड करतात. माणसाचे मन हे प्रशंसेचे, कौतुकाचे पुरस्काराचे भुकेले असते. त्या मनाला अपमान नको असतो.


मुला-मुलींचे संगोपन आता हा कठीण मुद्दा झालेला आहे. पूर्वी समाजातील वातावरण असे होते की, आई-वडिलांच्या व्यतिरिक्त इतर नातेवाईकांचा, शेजाऱ्यांचा मुलांना धाक असायचा. परंतु संपूर्ण समाजाची अवस्था अशा पद्धतीची झाली आहे की, मुला-मुलींना कोणाचाही धाक राहिलेला नाही. 'खा, प्या आणि मजा करा' अशा पद्धतीचे वातावरण सर्वत्र निर्माण होताना दिसत आहे. त्यांना सुखसोयी पाहिजे आहेत, परंतु जबाबदारी व कर्तव्य नको. मुलांची परीक्षा आल्यावर त्यांच्या आई-वडिलांना त्या परीक्षेचा ताण असतो; परंतु ज्याची परीक्षा आहे तो मात्र आरामात असतो. त्यामुळे आई-वडिलांना त्याचे पुढे कसे होणार अशा पद्धतीची चिंता लागून राहिलेली असते. यातूनच मुलांच्या मागे लागणे हे घडत असते. परंतु आई-वडिलांनी वारंवार सांगूनही मुलामध्ये परिवर्तन होत नसेल तर आई-वडिलांनी समुपदेशकांची मदत घेणे आवश्यक आहे. अनेक वेळा आई-वडिलांच्या सूचना या कर्तव्यपूर्तीसाठी केलेल्या असतात. परंतु त्या सूचनांमुळे त्याच्यामध्ये बदल होत आहे की नाही, हे पाहिले जात नाही.

आई-वडिलांचा प्रचंड तिरस्कार करणारा मुलगा, त्यांना संपविण्याचा विचार करणारा मुलगा त्याची ही मानसिकता एका दिवसात निश्चितच निर्माण झाली नसेल. अनेक वर्षांपासून त्याच्या मनात याबद्दल राग निर्माण झाला असेल. त्या रागातून सातत्याने त्याच्या मनात आई-वडिलांबद्दल नकारात्मक विचार सुरू झाले असतील. अतिरेकी रागातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलले असेल. परंतु ही घटना दुर्मिळातील दुर्मिळ आहे. सर्वच मुले अशी नाहीत. अशा पद्धतीचा विचार कुठलाही मुलगा किंवा मुलगी करत नाही. परंतु तो मुलगा या थराला जातपर्यंत त्याच्या आई-वडिलांना कुठलीच शंका कशी आली नसेल हा एक मोठा प्रश्न आहे. आपली गोष्ट समोरच्याला आवडली नाही हे त्याच्या चेहऱ्यावरूनसुद्धा वाचता येते. अनेक वेळा पालक मुलाला अभ्यासक्रम पूर्ण कर, असे सांगत असतात. परंतु इथे तर त्याचे आई-वडील त्याला तुला जमत नसेल तर अभ्यासक्रम सोड असे सांगत होते; परंतु ही गोष्टही त्याला सहन होत नव्हती. त्यामुळे वाढत्या वयातील मुलांसोबत सकारात्मक संवाद गरजेचा आहे. छोट्या छोट्या अगदी सहज करण्याजोग्या गोष्टी सांगून आपलं म्हणणं तो ऐकतो आहे की नाही हे तपासणे गरजेचे आहे. मुलांच्या मित्राकडून तो आई-वडिलांबद्दल कसा विचार करतो, शिक्षकांबद्दल कसा विचार करतो हे माहीत करून घेणे गरजेचे आहे. एखाद्याचे विचार परिवर्तन करणे ही एक प्रक्रिया आहे. ती कधी एका दिवसात होऊ शकेल, कधी तिला अनेक दिवस लागू शकतील. ज्यांना परिवर्तन घडवून आणायचे आहे त्यांच्यामध्ये तेवढा संयम असणे गरजेचे आहे. ज्यांनी जन्म दिला, सर्व सुखसोयी दिल्या, शिक्षणासाठी पैसा खर्च केला; एवढे करूनही जर मुलांच्या मनात आत्मीयता निर्माण होत नसेल तर कुठे चुकते आहे याचा शोध घेणे गरजेचे आहे. जर हे लक्षात आले तर कुठे थांबावे हे सुज्ञ पालकांनी ठरविले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## नागपूर परिसरात निसर्गरम्य सहलीची संधी



नागपूरकरांना एक दिवसाची सहल करण्यासाठी मोहगाव झिल्पी येथील सिद्धिविनायक गणेश मंदिर, बोर धरण, केळझरचा गणपती व खिडकीचे हनुमान मंदिर व वर्धा रोडने नागपूरला परत येणे अशी छान, छोटी व पूर्णपणे समाधान देणारी सहल शक्य आहे. साधारणतः ९ वाजता नागपूरहून हिंगणा मार्गाने निघणे. १० वाजेपर्यंत आपण मोहगाव झिल्पी येथील सिद्धिविनायक गणेश मंदिरला सहज पोहचू शकतो. मंदिर हे झिल्पी तलावाच्या वरच्या भागात आहे. गणेश मंदिर, तलावातील पाणी व आजूबाजूला असलेल्या टेकड्या, भागवतांची झाडे पाहून मन प्रसन्न होते. सिद्धिविनायक गणेश मंदिर ट्रस्टने मंदिर परिसरात उत्तम स्वच्छता ठेवलेली आहे. याचे संपूर्ण श्रेय मनपाचे माजी महापौर संदीप जोशी यांना आहे. येथील सिद्धिविनायक गणेश मंदिरातील गणपतीचे दर्शन घेतले असता मन प्रसन्न होते. नंतर येथील उपाहारगृहात छान नाश्ता उपलब्ध आहे. तो घेऊन येथील फार्महाऊसमध्ये थोडा वेळ विश्रांती घेऊन मग आपण बोर धरणाला भेट देण्यासाठी निघू शकतो. बोर धरणाला साधारणतः बारा वाजता आपण पोहोचतो. १२ ते १ पर्यंत बोर धरण, धरणाच्या मागील पाणीसाठा, आजूबाजूची झाडे, पहाड सर्व दृश्य सुंदर दिसते. येथे महाराष्ट्र पर्यटनचे विश्रामगृह आहे. येथे छान जेवण आपणास मिळेल. यासाठी अगोदर आरक्षण करून घ्यावे लागेल. जेवण व थोडा आराम केल्यावर चहा घेऊन साधारणतः ३ वाजता केळझर येथील गणपतीच्या दर्शनाला आपण निघू शकतो. येथील आजूबाजूचा परिसर छान आहे. गणपतीच्या दर्शनानंतर वर्धा मार्गे नागपूरकडे प्रस्थान करावयाचे आहे. नागपूरला पोहोचण्यापूर्वी रस्तात खडकी येथील हनुमान मंदिर लागते. हनुमानाचे दर्शन घेऊन आपण नागपूरला संध्याकाळी ६ वाजेपर्यंत पोहचू शकतो. अशाप्रकारे नागपूरकरांसाठी एक दिवसाची सहल करणे शक्य आहे. या सहलीमुळे फार थकवा न येता, देवांचे दर्शन घडते व मनाला आनंद मिळतो.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

### दादागिरीविरहित राजकारण हे आता स्वप्नवतच

बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर महाराष्ट्रात सध्या या एकाच मुद्यावर समाजमाध्यमे, वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रांमार्फत जोरकसपणे चर्चा सुरू आहे. अर्थात त्या निमित्ताने देशातील अलिकडच्या काळातील राजकारणाचा स्तर किती खालावला आहे हे देखील जनतेला समजत आहे. राजकारणात निवडणूक जिंकण्यासाठी आणि आपापल्या कार्यक्षेत्रात दबदबा निर्माण करण्यासाठी आपले विश्वासू 'डॉन' पोसणे हे राजकीय पुढाऱ्यांना अपरिहार्यच आहे असे दिसते. त्यामुळेच वाल्मीक कराडसारखे डॉन निर्माण होतात आणि पोसले जातात. बरे हे वर्षानुवर्षे असूनही कुठलीच कारवाई होत नाही. असे कोण कोण अवांछित लोक आहेत हे सगळ्या शासकीय यंत्रणेला माहीत असते परंतु ते आमदार, मंत्री या लोकांच्या अरेरावी आणि यथोचित धमक्यांमुळे गप्प राहणेच पसंत करतात. वाल्मीक कराड जर वर्षानुवर्षे आपली दहशत निर्माण करून वावरतो तर आजपर्यंत त्याच्या काळ्या कृत्यांची चौकशी होऊन कारवाई का केली गेली नाही.

आता या प्रकरणात भविष्यात कुठलेही दडपण न येता यंत्रणा कारवाई करेल आणि जनताही वरील हत्या प्रकरण विसरेल हे निश्चितच. परंतु भविष्यातही राजकारणात असे गुंडपुंड राजकीय पुढाऱ्यांच्या पंखाखाली राहणारच हेही सत्य.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### नागपुरात धुळीचे साम्राज्य

सध्या नागपुरात फार मोठ्या प्रमाणात सिमेंट रस्ते आणि उड्डाणपुलांची कामे सुरू आहेत. त्यामुळे जिकडे बघावे तिकडे माती आणि धुळीचे साम्राज्य दिसून येते. याचा त्रास मुख्यत्वे दुचाकीचालकांना मोठ्या प्रमाणात होतो. जोपर्यंत ही सगळी कामे पूर्ण होत नाहीत तोपर्यंत हा त्रास सर्वांना सहन करावाच लागेल. परंतु जे सिमेंट रस्ते पूर्ण होतात आणि वाहतुकीसाठी



खुले केले जातात कमीतकमी ते तरी कंत्राटदारांनी स्वच्छ करून खुले केले पाहिजेत. परंतु कंत्राटदारांकडून हे होताना दिसत नाही. सिमेंट रस्ते तयार झाल्यावर त्यावरून वाहतूक सुरू होते तेव्हा सिमेंटची धूळ मोठ्या प्रमाणात उडते आणि दुचाकी चालक आणि पादचाऱ्यांना त्याचा खूप त्रास सहन करावा लागतो. काम पूर्ण न करणाऱ्या बेजबाबदार कंत्राटदारांवर कारवाई केली पाहिजे. या समस्येकडे कोण लक्ष देणार?

**संजीव हेडाऊ**/९३७०१६९५८२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सोलापूरसह मराठवाड्यात 'ज्वारी पीक' जोमदार

## आभाळी वातावरणामुळे 'ज्वारीच्या राशी' भरणार

## शेतकऱ्यांना आता रब्बी पिकांची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

सोलापूरसह मराठवाड्यात डिसेंबरमध्ये अवकाळीचा पाऊस जोरात झाल्याने आणि यंदा सर्वच नक्षत्रात दमदार पाऊस पडल्याने ज्वारी पीक जोमदार आले आहे. दरम्यान, रब्बी हंगामातील ज्वारी पिकाच्या पेरणीला जमीन वापसाअभावी उशीर झाल्याने यंदा ज्वारी पेरणी कमीच झाली असली, तरीही जोमदार पीक आल्याने शेतकऱ्यांचा आनंद सध्यातरी द्विगुणीत होत आहे.



रब्बी पिकाचा जिल्हा म्हणून सोलापूरची ओळख आहे. त्यात रब्बीची सोलापूरची ज्वारी महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. भूम तालुक्यातील माणकेश्वर परिसरातील ज्वारीही देशासह विदेशाच्या बाजारात चांगलीच भाव खाते. रब्बी काळात ज्वारीबरोबरच गहू, हरभरा, करडई, जवस, सूर्यफूल आदी पिकांची पेरणी होते. उजनीचे सिंचन व सोलापूर जिल्ह्यात साखर कारखानदारी मोठ्या प्रमाणात सुरू झाल्यावर जिल्ह्यातील रब्बीचे क्षेत्र कमी होत गेले आहे. तरीही पेरणी केलेले ज्वारी पीक सध्यातरी जोमदार दिसून येत आहे. सध्याही आभाळी वातावरण असल्याने ज्वारी पीक भराभर वाढत जावून दाणेही टपोरी भरू लागल्याचे शेतकरी बांधवांनी सांगितले. इतकेच नाही तर यामुळे यंदा ज्वारीचा उतारही चांगला पडण्याचे संकेत त्यांनी दिले.

यंदा मुबलक पाणीसाठा असल्याने उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. गेल्या २-३ वर्षांपासून वातावरणातील बदलामुळे सोलापूर जिल्ह्यातील पीक लागवडीचे तंत्रच बदलल्याचे दिसून येत आहे. यंदा खरिपात जून पासूनच पावसाने चांगली हजेरी लावल्यामुळे पेरणी वाढली आहे. डाळीचे भाव वाढल्याने तूर आणि हरभरा लागवडीकडे शेतकऱ्यांचा ओढा दिसून येत आहे. खरिपात सोयाबीन करण्याकडेही लोकांचा कल वाढला आहे. तुरीला चांगला भाव येत असल्याने यावर्षी तुरीचे क्षेत्र वाढल्याचे दिसून आले. अति पावसामुळे गव्हाची पेरणी अजून सुरूच आहे. त्याचबरोबर हरभऱ्याची पेरणीही मोठ्या प्रमाणावर दिसत आहे. त्यामुळे ज्वारीची पेरणी कमी झाली आहे. करमाळा, माढा, मंगळवेढा, मोहोळ, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर तालुक्यात ज्वारीचे क्षेत्र मोठे आहे. पण तुरीचे क्षेत्र वाढल्यामुळे ज्वारीची पेरणी कमी दिसत आहे. जानेवारीपासून सोलापूर जिल्ह्यात हुरडा पार्ट्या सुरू होतात. पण ज्वारीचे क्षेत्र घटल्यामुळे हुरडा शोधण्याची वेळ आली आहे. खास ज्वारीसाठी पेरणी केलेले कणसे गतवर्षी शंभर रुपये किलोने विकली जात होती ती यंदा दोनशे रुपये किलोवर गेली आहेत. याशिवाय मागणीप्रमाणे हुरड्याच्या कणसाचा पुरवठा दिसून येत नाही. सध्यातरी सर्वत्र ज्वारी पिके भडकली असून, आता याचे पीक शेतकऱ्यांच्या पदरात किती पडणार आणि त्या ज्वारीला किती भाव येणार? हे येणारा काळच सांगणार आहे.

# दै. 'तरुण भारत'चे दक्षिण तालुका प्रतिनिधी मुंजे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

## श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्था मंद्रूप व दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनकडून घोषित

**तभा वृत्तसेवा**
**मंद्रुप ५ जानेवारी-**

श्री सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्था मंद्रूप व दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनच्या वतीने दिले जाणारे आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाले असून दै. 'तरुण भारत'चे दक्षिण तालुका प्रतिनिधी अमोगसिध्द मुंजे यांना यंदाचा आदर्श पत्रकार पुरस्कार घोषित झाला आहे.



अमोगसिध्द मुंजे



श्रीकांत कांबळे

दोन ज्येष्ठ आदर्श पत्रकार पुरस्कार व पाच आदर्श पत्रकार पुरस्कारांची निवड करण्यात आली. पत्रकार दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार देण्यात येणार आहे. पुरस्कार प्राप्त पत्रकारांचे गौरव व सन्मान, मान्यवरांच्याहस्ते करण्यात येणार आहे, अशी माहिती दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष रेवणसिद्ध मेंडगुदले यांनी दिली. ज्येष्ठ आदर्श पत्रकार पुरस्कार राजकुमार सारोळे व ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत कांबळे यांना जाहीर झाला असून पत्रकार प्रमिला चोरगी. दै. 'तरुण भारत'चे पत्रकार अमोगसिद्ध मुंजे, शिवानंद फुलारी, नारायण घंटे, श्रीकांत हाले यांची निवड आदर्श पत्रकार म्हणून करण्यात आली आहे. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ही निवड सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्था मंद्रूपच्या कार्यकारणीच्या बैठकीत करण्यात आली. सिद्धेश्वर बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष रेवणसिद्ध मेंडगुदले यांनी ही निवड जाहीर केली

# बाहुबलींचे बीड: अराजकाचे वर्तुळ

'कोंबडा करा ना दादा तेवढा'. आवाजातील जरब कायम ठेवत कोणत्याही साहेबांस दादा वगैरे म्हटलं की जरा जवळीक दाखवल्यासारखे वाटते. म्हणून दादा - ताई अशी शब्दरचना. 'अण्णा'चा कार्यकर्ता समोर थांबलेला. इथे साहेबांच्या दालनात कर्मचारी नस्ती घेऊन जात नाही. कार्यकर्तेच बगलेत फाइल मारतात. तेव्हा ४३ कोटींचा निधी आला होता. तो मंजूर करण्यासाठी अधिकाऱ्याला फोनवरून सूचनावजा नेत्यांचा निरोप होता तो करा ना कोंबडा! - अधिकाऱ्याने स्वत:ची नोकरी कुठे धोक्यात येणार नाही, याची काळजी घेणाऱ्या चार - पाच अटी लिहिल्या आणि सही केली. ही सही म्हणजे बीडच्या भाषेत कोंबडा. मंत्रालयातून निधी आला की त्याच्या वितरणाचा बीडमधील कालावधी फार तर तास - दोन तासांचा. 'बाहुबलींच्या बीडचे प्रशासन हे असे चालते. निधी वितरण किमान नियमात बसेल की नाही, एवढे तरी पाहू द्या असे अधिकाऱ्यांना काकुळतीला येऊन म्हणावे लागते. ज्यांना अगदीच पटत नाही ते अधिकारी सतत बदल्यांच्या प्रयत्नात असतात. कोणी रुजू व्हायलाही तयार नसते. बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्याचं पद रिक्त आहे. कृषी अधीक्षक हे पद रिकामंच. अन्न आणि औषधी प्रशासनात फक्त एक कर्मचारी काम करतो. महिला बालकल्याण विभागातील ११ अंगणवाडी पर्यवेक्षिकांपैकी केवळ एक पद भरलेले. जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंत्यांकडे उपअभियंता पदभार. बीडला बदली म्हणजे गडचिरोलीला जाण्याइतके भय. कधी कोणत्या अधिकाऱ्याला मारहाण होईल हे सांगता येत नाही. खिशातील बंदूक दिसेल अशा पद्धतीने ठेवणारे कार्यकर्ते समोर खुर्चीवर बसतात. मग निधी मंजूर होतो आणि बीडचा विकासवेग वाढता राहतो म्हणे काही वर्षांपूर्वी या जिल्ह्यातील विहिरी हरवल्या होत्या.

अराजक एका दिवसात माजत नसतं. त्याला राजाश्रय लागतो. त्यासाठी भय निर्माण केलं जातं. त्यात अर्थकारण दडलेलं असतं. परळी ते मस्साजोग हा हमरस्ता हे त्याचे अलीकडचे उदाहरण. पूर्वी आडवळणी, अंधारात खून व्हायचे. खून करणारा लपून बसायचा. संतोष देशमुख यांची हत्या ही हमरस्त्यावरची. दिवसाउजेडी सहा तास मारहाण करणारे आरोपी आणि प्रति पालकमंत्री अशी प्रतिमा असणाऱ्या वाल्मिक कराड यांच्या जवळचे. जवळचा हा शब्द पोलीस दप्तरी आलेला. - घटनाक्रम बरेच काही सांगून जातो.

लोकसभा निवडणूक संपली आणि विधानसभेचे वेध लागले होते. याच काळात आवादा या पवन ऊर्जा क्षेत्रातील कंपनीचे काम मस्साजोग या भागात सुरू झालेले. मस्साजोग हे २,४५० मतदारांचे गाव. लातूरला जाणारी प्रत्येक गाडी पोहे खायला येथे थांबतेच थांबते. या गावचे सरपंच म्हणून निवडून आलेले संतोष देशमुख तीन वेळा निवडून आलेले. कार्यकर्ता शब्दाला जागणारा माणूस. आपल्या नेत्या पंकजा मुंडे यांचा सत्कार आपल्या गावात झाला पाहिजे, असा आग्रह करणारा. या सरपंचाच्या गावातील आवादा कंपनीच्या सुनील केदू शिंदे नावाच्या मूळ नाशिकमध्ये राहणाऱ्या ४२ वर्षांच्या कर्मचाऱ्याच्या मोबाइलवर विष्णू चाटे यांचा दूरध्वनी आला. विष्णू चाटे म्हणाले. 'वाल्मिक अण्णा बोलणार आहेत' तेव्हा वाल्मिक कराड म्हणाले, 'ते काम बंद करा अन्यथा त्याचे गंभीर परिणाम होतील.' तत्पूर्वी २८ मे २०२४ रोजी याच सुनील शिंदे यांचे अपहरण करण्यात आले होते. तेव्हा मागितलेली खंडणी होती दोन कोटी रुपये. खंडणी मागितल्याची तक्रार केली गेली. ज्या विष्णू चाटे यांच्या दूरध्वनीवरून कराड यांनी खंडणी मागितल्याचा आरोप आहे तोच विष्णू चाटे पुढे संतोष देशमुख यांच्या हत्येमधील आरोपी असल्याच्या नोंदी पोलीस ठाण्यात आहेत. पुढे संतोष देशमुख यांच्या हत्येची माहिती राज्यभर झाली आणि कराड आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या संबंधाचे सुरस किस्से व आर्थिक व्यवहाराच्या चर्चाही सुरू झाल्या. खंडणीचा गुन्हा असणारे वाल्मिक कराड शरणागती पत्करेपर्यंत विविध राज्यांत देवदर्शन घेत होते. सीआयडीने केलेल्या शिफारशीनंतर त्यांची संपत्ती जप्त करण्याचे आदेश निघाले. त्यानंतर पोलिसांकडे वाल्मिक कराड स्वत:हून आला. हा घटनाक्रम आता बीड, परळीसह महाराष्ट्रात बहुतेकांना माहीत आहे. या कथानकातील अनेक तपासकड्या उलगडणे बाकी आहे. पण यातील प्रश्न आहे तो मंत्र्यांच्या जवळचा व्यक्ती खंडणी मागतो, ती दिली नाही तर काम बंद पाडण्यासाठी प्रयत्न करतो. त्याचे राजकीय कार्यकर्ते पवन ऊर्जा प्रकल्पातील सुरक्षा रक्षकाला मारहाण करतात आणि केवळ हे भांडण सोडविण्यास गेलेले संतोष देशमुख जिवानिशी जातात हे बीडच्या अराजकाचे एक टोक.

अराजक काही एका दिवसात जन्माला येत नसते. त्याची एक साखळी असते. त्याला राजाश्रयही लागतो. कोणी काहीही केले तरी काही होणार नाही अशी मानसिकता विकसित करावी लागते. ती नेत्याला लागू पडत असेल तर तीच कार्यकर्त्याला लागू असते, हा समज बळावतो. एखादा नेता अडचणीत असेल तर तो अधिक भपका करतो. धनंजय मुंडे संयुक्त राष्ट्रवादीमध्ये असताना त्यांनी आपल्यावर अत्याचार केले अशी तक्रार एका महिलेने केली. तेव्हा त्या महिलेशी अनैतिक संबंध नाहीत, असे म्हणत तिच्यापासून झालेल्या दोन अपत्यांची नावे पुढे मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीच्या शपथपत्रातही दिली. पण या आरोपानंतर ते जेव्हा संभाजीनगर आणि परळीमध्ये आले तेव्हा त्यांचे स्वागत उत्खनक अर्थात जेसीबीला हार बांधून करण्यात आले. यातील विरोधाभास असा की तेव्हा महिलांच्या सुरक्षेबाबतचे शक्ती विधेयक आणण्याची तयारी सुरू होती. पण या घटनेनंतर यंत्राला मोठा हार बांधून त्यातून नेत्याची प्रतिमा असणारे चलत्चित्रण वृत्तवाहिन्यांमध्ये दिसू लागले. अडचणीतील भपका रुजतो तो काळ अराजकाकडे नेत असतो. याचे हे उदाहरण. आता जेसीबी हे वजनदार राजकीय नेत्याचे बोधचिन्ह बनावे अशी परिस्थिती आता मराठवाडाभर आहे.

मराठा नेत्यांचा पक्ष अशी प्रतिमा असणाऱ्या राष्ट्रवादीला ही न परवडणारी प्रतिमा पुसण्यासाठी धनंजय मुंडे यांचे ओबीसी नेतृत्व राजकीय पटलावर बहरत ठेवण्यात आले. गोपीनाथ मुंडे यांच्या काळात भाजयुमोमध्ये काम करणाऱ्या धनंजय मुंडे यांची मैत्री पुढे भाजप आणि अजित पवार यांना एका व्यासपीठावर आणण्यास उपयोगी ठरल्याने धनंजय मुंडे यांचे महाराष्ट्रातील राजकीय वजन वाढले. याच काळात पालकमंत्री म्हणून काम करणाऱ्या धनंजय मुंडे यांचा जिल्ह्यातील कारभार वाल्मिक कराड पाहत होते. प्रशासकीय अधिकाऱ्यांना येणारा अण्णांचा फोन हे सांगायला पुरेसे आहे. मुंडे यांच्या अर्थकारणावर सुरेश धस यांनी केलेला हल्ला सध्या राजकीय पटलावर चर्चेत आहे.

विधानसभा निवडणूक संपल्यानंतर पंकजा मुंडे यांच्यावर टीका करणारे सुरेश धस पुढे धनंजय मुंडे यांच्या विरोधात आक्रमक होत गेले. पूर्वी कोविडकाळातही पंकजा मुंडे यांच्याऐवजी उसतोडणी मजुरांचे नेतृत्वही धस यांनी करावे यासाठी भाजप नेत्यांनी त्यांना बळ दिले होते. त्यामुळे धस यांच्या आरोपाचा आवाज भाजप नेत्यांनी ठरवून दिला आहे, अशी नव्या समीकरणाची चर्चा बीडमध्ये आता दबक्या आवाजात ऐकू येते. या राजकीय पार्श्वभूमीवर अडचणीत आलेले धनंजय मुंडे आता एकाकी पडल्यासारखी स्थिती आहे. त्यांच्या समर्थनार्थ अजून तरी अजित पवार किंवा प्रफुल पटेल उतरले नाहीत. आता जनसामान्यांचा आणि माध्यमंचा रेटा एवढा की, संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला फाशीची शिक्षा द्या, हे वाक्य उच्चारावे लागत आहे. पण खरे आव्हान आहे खंडणीतील गुन्हा सिद्ध करण्याचे आणि या गुन्ह्यातील धागेदोरे हत्येशी जोडले गेल्याचे पुरावे मिळविण्याचे. मिळालेले पुरावे न्यायालयात टिकवून ठेवणे हेही आव्हान असेल. हे सर्व घडवून आणायचे असेल तर प्रशासन अधिक मजबूत करावे लागणार आहे. आता प्रशासनाची भूमिका - कसे करायचे म्हणता? - तुम्ही जसे म्हणता तसे, अशी राहिली आहे. प्रचंड बहुमत असलेल्या सरकारमधील मंत्री धनंजय मुंडे यांनी गावातील मंडळींचा सत्कार घेण्याआधी त्यांचा जिल्हा कसा अराजकाच्या केंद्रस्थानी आला आहे, याचे चित्र परळी औष्णिक वीज केंद्राच्या ओल्या राखेत दडले आहे. त्यांच्या राजकीय प्रतिमेचा भपका त्यांनाच अडचणीचा ठरू लागलेला आहे हे खरे बीडचे चित्र.

एका जिल्ह्यातून ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये सहा लाख लोक बैलगाड्या, ट्रॅक्टरमध्ये आपला संसार भरून ऊसतोडणीला जातात. पहाटे पाच वाजता तापमान दहा अंशावर असते तेव्हापासून हिरव्यागार उसाच्या फडात गारठलेले असतात. ते हात काबाडकष्ट करतात तेव्हा त्यांच्या आयुष्यात काही एक सकारात्मक घडवू शकलो नाही याचे वैषम्य वाटण्याऐवजी ती संख्या मतपेढी म्हणून वापरण्यात धन्यता मानणाऱ्या राजकीय व्यक्तींकडून उभी केलेली समांतर राजकीय व्यवस्था अधिक जातकेंद्रित ठेवण्यात सर्वपक्षीय हितसंबंध दडले आहेत. ते तातडीने तोडण्याऐवजी त्याला फुंकर घातल्याने प्रशासन कसे चालते ? त्याचे उत्तर अराजक या शब्दातच सामावू शकते, ही भावना खासगीत व्यक्त करणारे बीड जिल्ह्यात सापडतात. राजकारणात कोणी धुतल्या तांदळासारखा नसतोच, हे आता मतदारांनीही मान्य केले आहे. पण नेत्यांचा तारतम्यभाव सुटतो तेव्हा 'असं करू नका, हे चांगले नाही' हे सांगणारी मंडळी गुपचूप बसतात. बोलेनाशी होतात. परळीत सध्या तसे वातावरण आहे. एखादी गोष्ट आपण सांगितली आहे, असे त्यांना कळले तर या भीतीने माणसं बोलतच नाहीत. बहाणे करतात किंवा मुद्दा सोडून बडबड करत राहतात. त्यामुळे परळीतील टॉवर चौकातील जोर वाढतो. मग भपका निर्माण करणारे कार्यकर्ते मोठे होतात. नियम धाब्यावर बसणे या वृत्तपत्रातील शब्दांचा हा अर्थ असतो.

राजकीय वर्चस्व असणाऱ्या व्यक्तींकडून भाजपच्या एका कार्यकर्त्याचा खून होतो, याची चर्चा होण्याऐवजी पालकमंत्री कोण व्हावा याची चर्चा राजकीय पटलावर जोरदार होते. मला कोणतेही बिनमहत्त्वाचे खाते द्या पण पालकमंत्री करा, असा आग्रह गेल्या दहा वर्षांत सर्वत्र बळावला आहे. याचा अर्थ राज्य मंत्रिमंडळातील कोणत्याही खात्यापेक्षा पालकमंत्रीपदाचा प्रभाव अधिक विस्तारला आहे का, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. स्थानिक पातळीवर काही तरतूद असावी म्हणून जिल्हा नियोजन समितीकडे काही निधी दिला जात असे. आता हा निधी राज्याच्या अर्थसंकल्पात प्रमाणाबाहेर वाढू लागला आहे. ४०० कोटी ते ८०० कोटी रुपयांपर्यंतचा हा निधी पालकमंत्र्यांच्या शिफारशीने खर्च होतो तेव्हा कार्यकर्ते पोसण्याची एक नवी साखळी निर्माण होते. ही सर्व जिल्ह्यांमध्ये आहे. पण बीडमध्ये त्याला जातीचा रंग आहे. प्रशासकीय यंत्रणा पूर्णत: सत्ताशरण आहे. एका हत्येच्या निमित्ताने बीडची मानसिकता बदलणार नाही. याच जिल्ह्यात सुदाम मुंडे आणि सरस्वती मुंडे यांनी भ्रूण हत्येचा खेळ रचला होता. शेतात गांजा लावला तरी काही बिघडत नाही, ही मानसिकता आपले कोणी काही करू शकत नाही, या भावनेतून निर्माण होते. आपण विरोध करून फारसा उपयोग नाही ही सर्वसामान्यांमध्ये हतबला वाढीला लागते. या सर्वांवर उपाय करू शकतील किमान सरकारला काही सुचवू शकतील या श्रेणीतील एक वरिष्ठ अधिकारी म्हणाले, 'त्यांचे ऐकावेच लागेल ना' त्यांच्या बोलण्यात आता हतबलता नव्हती. त्यांनाही या खेळात मजा येत होती. अराजक हे असेच निर्माण होते.

**- सुहास सरदेशमुख**

# पी.एन.जी. आणि सन्स चित्रकला स्पर्धेस उत्तम प्रतिसाद

## आर्यन मगई व अनुज होटकर प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

चन्द्र, सूर्यमाला, मंगल ग्रह, तारे व तसेच अंतराल वीर असे अनेक चित्रे बाल चित्रकारानी आपल्या कुंचाल्यातुन साकारल्या. निम्मित होते पी.एन.जी. आणि सन्स आणि झपुर्जा कला व संस्कृति संग्रहालयाच्या विविध वयोगटातील विध्यार्थ्यासाठी आयोजित चित्रकला स्पर्धेत मुलानी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यात आर्यन मगई व अनुज होटकर यांनी आपापल्या गटातून प्रथम क्रमांक पटकाविला.




मुलांमधील कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यात कलेची आवड निर्माण व्हावी या हेतूने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात १६० विद्यार्थानी सहभाग घेतला. पु. ना. गाडगीळ आणि संन्सचे व्यवस्थापक हेमंतकुमार साईं, कुलदीपसिंह राजपूत, पालक आदी उपस्थित होते. दोन वयोगटातील स्पर्धेतून विजेते घोषित करण्यात अले. त्याना अस्थापनेचे विक्री प्रमुख जीतेन्द्र जोशी यांच्या हस्ते बक्षिसे आणि प्रशस्तिपत्र देण्यात आले. सर्व कर्मचाऱ्यांकडून सर्व गोष्टींचे उत्तम प्रकारे नियोजन करण्यात आले होते.

**अंतिम निकाल (प्रथम तीन) :** इयत्ता ५ वी ते ७ वी: आर्यन मगई, ऐश्वर्या माचल, अनन्या गंगावने. इयत्ता ८ वी ते १० वी: अनुज होटकर, राधारानी रापेल्ली, अथर्व सरवदे.

# देवमाणूससाठी अभिनेता सुबोध भावे ऑनबोर्ड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी -**

तेजस देऊस्कर दिग्दर्शित देवमाणूस या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या एक से एक कलाकारांच्या टीम मध्ये आता आदरणीय अभिनेते सुबोध भावे सामील झाले आहेत.अभिनेता सुबोध भावे, महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे या दिग्गज कलाकारांसोबत यंदा स्क्रीन शेअर करणार आहेत, त्यामुळे हा चित्रपट एक मल्टिस्टारर चित्रपट असणार आहे ज्यात आकर्षक आणि उच्च दर्जाचे नाटक संपूर्ण महाराष्ट्र आणि बाहेरील प्रेक्षकांना आकर्षित करेल आणि अनुभवायला मिळेल. देवमाणूसच्या कलाकारांसोबत सामील होण्याबद्दल अभिनेता सुबोध भावे म्हणाले,मला यापूर्वी दिग्गज अभिनेता महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे या दोघांसोबत स्वतंत्रपणे चित्रपटात काम करण्याचा बहुमान मिळाला आहे.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
आयोजित
२१ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा २०२४-२५
प्राथमिक फेरी
: केंद्र : सोलापूर
स्थळ : हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| सोम. ६ जाने. स. ९ वा. **असा मी काय केला गुन्हा?** लेखक : स्वप्निल बावळे दिग्दर्शक : सपना बावळे, स्वप्निल सपना लोककला विकास मंडळ, मानेगाव | सोम. ६ जाने. स. १० वा. **गिफ्ट** लेखक : श्रुती वडगबाळकर दिग्दर्शक : शशिकांत उपाध्ये, श्री सिद्धिविनायक विद्यामंदिर, गुंजेगाव | सोम. ६ जाने. स. ११ वा. **दुष्काळ** लेखक व दिग्दर्शक : शशिकांत कोकाटे, शिवछत्रपती बहु. सामाजिक आदिवासी विकास संस्था, रुई, ढोकी |
| सोम. ६ जाने. दु. १२ वा. **बालवाडी** लेखक : शशिकांत कोकाटे दिग्दर्शक : अमरजा कोकाटे, विद्यानिकेतन स्कूल ऑफ स्कॉलर्स, कसबे | सोम. ६ जाने. दु. १:३० वा. **भोंदूगिरी** लेखक : शशिकांत कोकाटे दिग्दर्शक : संध्या टोने, तुळशी महिला मंडळ, धाराशिव | सोम. ६ जाने. दु. २:३० वा. **सुंदर गाव** लेखक : शशिकांत कोकाटे दिग्दर्शक : रोहिणी जोशी, सांस्कृतिक मंडळ चोराखळी, ता. कळंब, जि. धाराशिव |
| सोम. ६ जाने. दु. ३:३० वा. **मोबाईल** लेखक : अमरजा कोकाटे दिग्दर्शक : सोनम डिकरे, धनेश्वर सांस्कृतिक मंडळ, बोरगाव, ता. कळंब, जि. धाराशिव | सोम. ६ जाने. दु. ४:३० वा. **स्वच्छता करूया दारुदारी** लेखक व दिग्दर्शक : उज्ज्वला गायकवाड, नटरंग बालनाट्य ग्रुप, बोरी, ता. उमरगा, जि. धाराशिव | मंगळ. ७ जाने. स. ९ वा. **अभियान राबवूया** लेखक : एस. एस. चव्हाण दिग्दर्शक : दिपाली पाटील, शिवछत्रपती प्रतिष्ठान, बोरी, ता. उमरगा, जि. धाराशिव |
| मंगळ. ७ जाने. स. १० वा. **वृद्धाश्रम** लेखक व दिग्दर्शक : ज्योती भोरे, युवा बालनाट्य ग्रुप, बोरी, ता. उमरगा, जि. धाराशिव | मंगळ. ७ जाने. स. ११ वा. **तू पोलीस होणार** लेखक : सोनी गायकवाड दिग्दर्शक : अभय राठोड, रंगभूमी बालनाट्य ग्रुप, बोरी, ता. उमरगा, जि. धाराशिव | मंगळ. ७ जाने. दु. १२ वा. **सदा फुले रंगीत झाले** लेखक व दिग्दर्शक : दैवशाला मसेकर, वसंतराव नाईक विद्या विकास शिक्षण संस्था. गंधोरा, धाराशिव |
| मंगळ. ७ जाने. दु. १:३० वा. **स्वप्न एका कळीचे** लेखक : पूजा राठोड दिग्दर्शक : ममता पांगळ, कलागुण बालनाट्य ग्रुप, पारधीवाडी, ता. उदगीर, जि. लातूर | मंगळ. ७ जाने. दु. २:३० वा. **अति तिथे माती** लेखक : एम.जी. राठोड दिग्दर्शक : भाग्यश्री वाकसे, धर्मवीर राजे प्रतिष्ठान, उदगीर, जि. लातूर | मंगळ. ७ जाने. दु. ३:३० वा. **जागर शेतकऱ्यांचा** लेखक : तुषार राठोड दिग्दर्शक : रुपाली वाकसे, विद्या देवता सरस्वती बालनाट्य ग्रुप, उदगीर, जि. लातूर |
| मंगळ. ७ जाने. दु. ४:३० वा. **अ ब क ड इ** लेखक : अभय राठोड दिग्दर्शक : रेखा हेवारे, संत गोरोबाकाका बालनाट्य ग्रुप, करजगाव, ता. उदगीर, जि. लातूर | बुध. ८ जाने. स. ९ वा. **निबंध** लेखक : जगदीश पवार दिग्दर्शक : फुलावती आगाशे, साकव फाऊंडेशन, सोलापूर | बुध. ८ जाने. स. १० वा. **ह्युमनॉईड** लेखक : जयप्रकाश कुलकर्णी दिग्दर्शक : नीता येरमाळकर, श्री सरस्वती मंदिर संस्था, सोलापूर |
| बुध. ८ जाने. स. ११ वा. **चांगभलं** लेखक : डॉ. मीरा शेंडगे दिग्दर्शक : अर्चना यलगुलवार, नॅब संचालित चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला, सोलापूर | बुध. ८ जाने. दु. १२ वा. **चिंदी** लेखक : किरण लोंढे दिग्दर्शक : धनराज मडगोंड, संकल्प युथ फाऊंडेशन, सोलापूर | बुध. ८ जाने. दु. १:३० वा. **बघा हो बघा** लेखक व दिग्दर्शक : अमोल राठोड, जय शिवराय बालनाट्य ग्रुप, करजगाव |
| बुध. ८ जाने. दु. २:३० वा. **बेला** लेखक : गणेशसिंग मरोड दिग्दर्शक : तुकाराम चव्हाण, आकार सोशल फाऊंडेशन, सोलापूर | बुध. ८ जाने. दु. ३:३० वा. **चम चम चमको** लेखक : धनंजय सरदेशपांडे दिग्दर्शक : श्रुती मोहोळकर, एस.आर. गर्ल्स हायस्कूल, सेवासदन, सोलापूर | गुरु. ९ जाने. स. १० वा. **जत्रा** लेखक : जयप्रकाश कुलकर्णी दिग्दर्शक : विकास सुरवसे, ओमकार बहु. समाजसेवी संस्था, सोलापूर |
| गुरु. ९ जाने. स. ११ वा. **गाण्याचा देव मनाचा देव** लेखक : प्रथमेश पाटील दिग्दर्शक : गणपती कोळी, एन.ए.बी. संचालित स्वामी विवेकानंद प्रशाला, सोलापूर | गुरु. ९ जाने. दु. १२ वा. **जीर्णोद्धार** लेखक : संध्या कुलकर्णी दिग्दर्शक : रत्नमाला जोशी, ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशाला, सोलापूर | गुरु. ९ जाने. दु. २:३० वा. **देव तारी त्याला कोण मारी** लेखक : शारदा चव्हाण दिग्दर्शक : रेखा जेवळीकर, जय तुळजाभवानी महिला मंडळ, धाराशिव |
| गुरु. ९ जाने. दु. ३:३० वा. **दुष्काळावर करूया मात** लेखक व दिग्दर्शक : मारुती खारवे, संत गोरोबाकाका बालनाट्य ग्रुप, बोरी, धाराशिव | गुरु. ९ जाने. दु. ४:३० वा. **अभागी तारा** लेखक : डॉ. मीरा शेंडगे दिग्दर्शक : मिहिका शेंडगे, रंगसंवाद प्रतिष्ठान, जुळे सोलापूर | गुरु. ९ जाने. सायं. ५:३० वा. **बीज अंकुरले** लेखक : डॉ. सतीश साळुंखे दिग्दर्शक : संदीप जाधव, सिंहगड पब्लिक स्कूल, केगाव, सोलापूर |
| गुरु. ९ जाने. सायं. सायं. ६:३० वा. **लाईट** लेखक व दिग्दर्शक : किरण लोंढे, अस्तित्व मेकर्स फाऊंडेशन, सोलापूर | शुक्र. १० जाने. स. ९ वा. **जोकर** लेखक : गोविंद गोडबोले दिग्दर्शक : सुमती सोमवंशी, कालरंग, लातूर | शुक्र. १० जाने. स. १० वा. **लास्ट बेंच** लेखक : नाथा चितळे दिग्दर्शक : सुवर्णा बुरांडे, उन्नती फाऊंडेशन, लातूर |
| शुक्र. १० जाने. स. ११ वा. **व्हीसीआर** लेखक : स्वानंदी भरताल दिग्दर्शक : कल्याण वाघमारे, नवभारत सेवा प्रतिष्ठान, लातूर | शुक्र. १० जाने. दु. १२ वा. **कर्तव्य** लेखक : अनिरुद्ध जंगापल्ले दिग्दर्शक : भीमराव दुनगावे, श्री पुराण मला लाहोटी पाठशाळा, लातूर | शुक्र. १० जाने. दु. १:३० वा. **येडी बाभळ** लेखक व दिग्दर्शक : प्रदीप भोकरे, कै. ज्ञानोबा शिवराम कोतांबे बहु. संस्था |
| प्रवेश विनामूल्य \| सस्नेह निमंत्रण | शुक्र. १० जाने. दु. २:३० वा. **झाले मोकळे आभाळ** लेखक : डॉ. सतीश साळुंखे दिग्दर्शक : अश्विनी अमीर तडवळकर, समर्पित फाऊंडेशन | शुभेच्छुक : ॲड. आशिष शेलार, मंत्री, सांस्कृतिक कार्य |

विनीत
विकास खारगे (भा.प्र.से.), मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग
विभीषण चवरे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### आर्यना सबालेन्काला ब्रिस्बेन टेनिसचे विजेतेपद

**ब्रिस्बेन** : प्रथम विश्वमानांकित बेलारूसची आर्यना सबालेन्का हिने रविवारी आपल्या २०२५ डब्ल्यूटीए टूर हंगामाची उत्तम सुरुवात करताना ब्रिस्बेन आंतरराष्ट्रीय विजेतेपद जिंकले. २६ वर्षीय सबालेन्काने दुसऱ्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले असून २०२३ नंतरचे हे तिचे चौथी विजेपद आहे. अंतिम सामन्यात सबालेन्काने एक सेट पिछाडीवर राहिल्यानंतर जोरदार मुसंडी मारत पात्रताधारी २१ वर्षीय पोलिना कुदेरमेटोव्हा हिचा ४-६, ६-२ असा पराभव करत आपले महिला एकेरीचे १८ वे विजेतेपद निश्चित केले. २०२३ मध्ये ॲडिलेडमध्ये झालेल्या स्पर्धेत सबालेन्काने आपले पहिले ब्रिस्बेन विजेतेपद जिंकले. त्या अंतिम सामन्यात तिने लिंडा नोस्कोव्हाचा पराभव केला होता. क्वीन्सलॅण्ड टेनिस सेंटरमध्ये कुदेरमेटोव्हाने यापूर्वी लिउडमिला सॅमसोनोव्हा व डारिया कासात्किनाचा पराभव केला होता, ती आपल्या सलग आठव्या विजयाचा पाठलाग करत होती, परंतु सबालेन्काने तिचे स्वप्न भंग केले. आता सबालेन्का पुढे मेलबर्न येथे खेळणार आहे.

### राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत वरुण तोमरला दुहेरी विजेतेपद

**नवी दिल्ली** : विद्यमान आशियाई विजेता व अनेक आयएसएसएफ पदक विजेता वरुण तोमरने येथे खेळल्या गेलेल्या ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत वरिष्ठ व कनिष्ठ पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तुल स्पर्धेत दुहेरी विजय मिळवला. डॉ. करणी शूटिंग रेंजमध्ये वरिष्ठ गटाच्या अंतिम फेरीत सेनादलाच्या २१ वर्षीय वरुण तोमरने संघसहकारी प्रद्युम्न सिंगवर ०.८ गुणांच्या फरकाने विजय नोंदवून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

### डॉजबॉल व नाईन ए साईड फुटबॉल निवड चाचणी स्पर्धा उद्या

**सोलापूर** : डॉजबॉल असोसिएशन सोलापूर व नाईन ए साईड हौशी फुटबॉल असोसिएशन सोलापूर यांच्या वतीने सब जुनिअर , ज्युनियर नाईन ए साईड फुटबॉल आणि ज्युनियर व सीनियर डॉजबॉल शहर व जिल्हा मुले व मुली निवड चाचणी स्पर्धा मंगळवार ७ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरेनगर विमानतळाच्या समोर आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी खेळाडूंची जन्मतारीख अनुक्रमे १ जानेवारी २००६ आणि १ जानेवारी २००८ नंतरची असावी. यामधून निवडलेला संघ हा सोलापुरातच होणाऱ्या राज्य स्पर्धेत सहभागी होईल. इच्छुक खेळाडूंनी प्रा.संतोष खेंडे (मो.९८५०६६६७९५), गंगाराम घोडके (९४२३७१७२७७) अथवा संतोष पाटील (९१५६२३०००९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष कार्तिक चव्हाण, सचिव सुहास छन्चुरे यांनी केले आहे.

### सुतार यांना राज्य स्तरीय उत्कृष्ट क्रीडाशिक्षक पुरस्कार जाहीर

**सोलापूर** : गांधी नाथा रंगजी विद्यालयातील क्रीडाशिक्षक शिवानंद अप्पासाहेब सुतार यांना प्री प्रायमरी स्कुल व ग्रामपंचायत खजुरी ता. आळंद



जिल्हा कलबुर्गी (कर्नाटक) याच्या वतीने उत्कृष्ट क्रीडाशिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा १६ जानेवारी खजुरी येथे होणार आहे. सुतार यांनी जिल्ह्यात रोल बॉल, टेनिक्वॉईट, सेपक टकरा, डॉजबॉल, थ्रो बॉल, रग्बी, आट्यापाट्या, स्क्वॅश, कबड्डी, खो- खो, कराटे, तायक्वादो, ज्युदो, सिकाई मार्शल आर्ट, किक बॉक्सिग या खेळामध्ये कामगिरी केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

### जिल्हा ज्युनियर व सब ज्युनियर नेटबॉल संघ निवड चाचणी आज

**सोलापूर** : १८ वी महाराष्ट्र राज्य ज्युनियर व सब ज्युनियर नेटबॉल स्पर्धा १० ते १२ जानेवारी दरमयान मोहाड, वर्धा येथे आयोजित करण्यात येतआहेत. या स्पर्धेकरिता सोलापुर जिल्हा संघाची निवड ६ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता रॉजर्स स्कूलमध्ये करण्यात येणार आहे. ज्युनियरकरिता १० जानेवारी २००६ व सब ज्युनियरकरिता १० जानेवारी २००९ नंतर जन्मलेल्या खेळाडूनी आपल्या जन्म दाखला व आधारची छायांकित प्रतिसह मैदानावर हजर रहावे, असे सेक्रेटरी कुदुस शेख यांनी कळविले आहे.

# ऑस्ट्रेलिया डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत

**भारतावर ६ गड्यांनी विजय ● ऑस्ट्रेलियाने ३-१ ने जिंकली बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिका**

## जसप्रीत बुमराह मालिकावीर, स्कॉट बोलॅण्ड सामनावीर



सिडनी येथील सिडनी क्रिकेट मैदानावर रविवारी पाचव्या क्रिकेट कसोटीत भारतीय संघावर विजय नोंदवल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघ बॉर्डर-गावस्कर चषकासह

◆ **सिडनी, ५ जानेवारी**

ऑस्ट्रेलियाने रविवारी येथे पाचव्या आणि शेवटच्या कसोटीत तिसऱ्याच दिवशी भारतावर ६ गडी राखून विजय नोंदवला आणि १० वर्षांनंतर बॉर्डर-गावस्कर चषकावर आपले नाव कोरले. या बरोबरच ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांची कसोटी मालिका ३-१ ने जिंकली आणि जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. याबरोबरच भारताचे डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीच्या शर्यतीतील आव्हान संपुष्टात आले.

भारताने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी १६२ धावांचे लक्ष्य ठेवले व ते ऑस्ट्रेलियाने २७ षटकांत ४ गडी गमावत सहज गाठले. लॉर्ड्स येथे ११ ते १५ जून या कालावधीत होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम फेरीच्या सामन्यात खेळण्यासाठी ऑस्ट्रेलिया संघ पात्र ठरला.

अंतिम कसोटी सामन्यात पहिल्या डावांत ३१ धावांत ४ बळी व दुसऱ्या डावांत ४५ धावांत ६ बळी टिपणारा ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज स्कॉट बोलॅण्ड सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला, तर पाच सामन्यांच्या मालिकेत एकूण ३२ बळी टिपणारा भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला, परंतु भारताने या मालिकेत केलेल्या सांघिक कामगिरीसाठी हा पुरस्कार फारसे सांत्वन नव्हते.

भारताने तिसऱ्या दिवशी ६ बाद १४१ धावांवरून पुढे आपल्या दुसऱ्या डावास सुरुवात केली आणि त्यांचा दुसरा डाव ३९.५ षटकांत १५७ धावांत आटोपला. पॅट कमिन्स व स्कॉट बोलॅण्डने उर्वरित चार फलंदाजांना झटपट बाद केले. कमिन्सने रवींद्र जडेजा (१३) व वॉशिंग्टन सुंदरला (१२), तर बोलॅण्डने नितीशकुमार रेड्डी (४) व कर्णधार जसप्रीत बुमराहला (०) बाद केले. बोलॅण्डने ६ बळी, कमिन्सने ३ बळी, तर वेबस्टरने एक बळी टिपला.

भारताने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी १६२ धावांचे लक्ष्य ठेवले. हंगामी कसोटी कर्णधार जसप्रीत बुमराह पाठीत दुखत असताना गोलंदाजी करण्याच्या स्थितीत असता तर ऑस्ट्रेलियाला लक्ष्य गाठणे अधिक अवघड ठरू शकले असते, परंतु सकाळच्या सराव सत्रात बुमराहने गोलंदाजी करण्याचा प्रयत्न केल्यावर त्याला विश्रांती देण्यात आली. विराट कोहलीच्या संघाला एकूण धावसंख्येचा बचाव करणे अशक्य झाले.

ऑस्ट्रेलियाच्या सॅम कोन्स्टास (२२) व उस्मान ख्वाजाने (४१) पहिल्या गड्यासाठी ४१ धावांची सलामी भागीदारी केली. ट्रॅव्हिस हेड व ब्यू वेबस्टरने नाबाद खेळी करत ऑस्ट्रेलियाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. ऑस्ट्रेलियाने २७ षटकांत ४ बाद १६२ धावा काढल्या. हेडने ३८ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद ३४ धावांची, तर ब्यू वेबस्टरने ३४ चेंडूंत ६ चौकारांसह ३९ धावांची खेळी केली. भारताकडून प्रसिध कृष्णाला ३ बळी, तर मोहम्मद सिराजला एक बळी टिपण्यात यश मिळाले. ◂(वृत्तसंस्था)

# हे निराशाजनक, पण शरीराचा आदर करावा लागेल : बुमराह



संवाद साधताना जसप्रीत बुमराह व रोहित शर्मा

◆ **सिडनी, ५ जानेवारी**

पाठीत दुखापत हे खरोखरचं निराशाजनक आहे, परंतु काही वेळा एखाद्या खेळाडूला आपल्या शरीराचा आदर करणे अत्यावश्यक ठरते, असे मत भारतीय क्रिकेट संघाचा हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहने व्यक्त केले.

बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेच्या अंतिम सामन्यातील दुसऱ्या डावांत पाठीच्या दुखण्यामुळे बुमराहला विश्रांती देण्यात आली. त्याला सिडनीच्या खेळपट्टीवर गोलंदाजी करता आली नाही. भारताला अवघड खेळपट्टीवर १६२ धावांचा बचाव करायचा होता, परंतु ऑस्ट्रेलिाने ते लक्ष्य केवळ २७ षटकांमध्ये गाठले. मालिकेत ३२ बळी टिपल्याब द्दल बुमराहला मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले.

आज सकाळच्या सराव सत्रात मी गोलंदाजी करण्याचा प्रयत्न केला, परंतु अस्वस्थता जाणवू लागली, त्यामुळे मला विश्रांत देण्यात आली. मात्र इतर खेळाडूंना विश्वास ठेवण्याबद्दल व आपले कौशल्य दाखवण्याबद्दल सूचित करण्यात आले होते, असे बुमराहने पुरस्कार वितरण समारंभानंतर म्हणाला.

कसोटी क्रिकेटमध्ये जास्त काळ राहणे, दबाव निर्माण करणे, दबाव शोषून घेणे आणि परिस्थितीशी जुळवून घेणे या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तुम्हाला परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागेल आणि हे शिकणे आम्हाला भविष्यात मदत करेल, असे तो म्हणाला.

नितीश रेड्डी आणि हर्षित राणासारख्या युवा खेळाडूंना ऑस्ट्रेलियात खेळण्याचा अनुभव भविष्यात मदत करेल. त्यांनी खूप अनुभव मिळवला आहे व ते आणखी ताकदीकडे पुढे जातील. आमच्या गटात खूप प्रतिभा आहे, असेही तो म्हणाला.

आम्ही जिंकलो नाही म्हणून बरेच युवा चाहते निराश झाले आहेत, पण या अनुभवातून युवा खेळाडू घडे गिरवतील. ही एक उत्तम मालिका होती, ऑस्ट्रेलियाचे अभिनंदन, त्यांनी खरोखर चांगली लढत दिली, असे हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराह म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

### ट्रॅव्हिस हेडने केले बुमराहचे कौतुक

४४६ धावांसह सर्वाधिक धावा करणारा ट्रॅव्हिस हेडने बुमराहचे कौतुक केले. तो एक उत्कृष्ट कामगिरी करणारा खेळाडू आहे. मी कसोटी क्रिकेटमध्ये पाहिलेली ही त्याची सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी आहे, असे हेड म्हणाला.

विजयी कर्णधार पॅट कमिन्सने पाच सामन्यांच्या मालिकेत आपल्या संघाचा ३-१ असा विजय अवास्तव असल्याचे म्हटले आहे. ऑस्ट्रेलियाने बॉर्डर-गावस्कर चषक जिंकल्याबद्दल आनंद व अभिमान व्यक्त केला.



# समाधान पुणेकर ‘भागवत श्री’चा मानकरी

## पश्चिम महाराष्ट्र शरीरसौष्ठव स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

येथील समाधान पुणेकर ( ७५ किलो गट) हा पश्चिम महाराष्ट्र शरीरसौष्ठव स्पर्धे तील भागवत श्रीचा मानकरी ठरला. त्यास ११ हजार रोख व उपविजेता सोहेल कुरेशी (७५ किलोवरील) यांस ३ हजार रोख पारितोषक तसेच सन्मान चिन्ह प्रमाण पत्र देऊन गौरविण्यात आले

छत्रपती रंगभवन येथे झालेल्या या स्पर्धेत ६५ खेळाडूंनी भाग घेतला होता. ६ वजनी गटात झालेल्या या स्पर्धेतील विविध वजनी गटातून ३५००, २५००, १५०० व १००० अशी रोख पारितोषके, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे व मनोज भागवत यांचे हस्ते झाले. क्रीडा संघटक रविन्द्र नाशिककर, पृथ्वी सुरवसे, प्रतिक भागवत, रामकृष्ण चितळे, आंतरराष्ट्रीय पंच रविंद्र आरते आदी उपस्थित होते. पारितोषिके पत्रकार प्रशांत जोशी, अजितकुमार संगवे, आकाशवाणीचे पदमाकर कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आली. या स्पर्धेसाठी जिल्हा संघटनेचे सचिव प्रमोद काटे, नजीर शेख, शफी शेतसंधी, शरणकुमार कुंभार गोरख गडसिंग यांचे सहकार्य लाभले.

**अंतिम निकाल (प्रथम चार) :** ५५ किलो : बालाजी जगताप (टेंभूर्णी), रितेश फटफटवाले (सोलापूर), सचिन कांबळे (कोल्हापूर), तौफिक चांदा (सोलापूर). ६० किलो : यागेश गवारे (बार्शी), जुनेद बागवान, श्रीकांत नाईक, साईराज अंबेवाले (सोलापूर). ६५ किलो : संभाजी गायकवाड, जयकुमार मानकापुरे (कोल्हापूर), गणेश जाधव, अजय जमादार (सोलापूर). ७० किलो : निखिल चव्हाण (सोलापूर), ऋषिकेश पाटील (कोल्हापूर), शाबाद नदाफ (सोलापूर), अक्षय बताले (नळदुर्ग). ७५ किलो : समाधान पुणेकर, अकबर कुरेशी, इस्माईल शेख, जावेद शेखल (सोलापूर). ७५ किलोवरील : सोहेल कुरेशी, यशपाल वाघमारे, केदार सातपुते (सोलापूर), मजमूल इराणी (अकलूज)

# सोलापूर मीडिया चषकावर ‘डिजिटल’ची मोहोर



सोलापूर : मिडिया स्पर्धेतील विजेता डिजिटल संघ.



सोलापूर : उपविजेता सावा संघ पारितोषिक स्वीकारताना

## सावा संघाला उपविजेतेपद

## स्वप्निल म्हेत्रसकर मालिकावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि सोलापूर ॲडव्हर्टायझिंग एजन्सीज वेल्फेअर असोसिएशन (सावा) यांच्या वतीने आयोजित सोलापूर मीडिया कप २०२५च्या अंतिम सामन्यात डिजिटल मीडिया संघाने सावा संघाला पराभूत करत स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. सावा संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल (रेल्वे मैदान) येथे आयोजित या स्पर्धेत लोकमत, दिव्य मराठी, सकाळ, संचार, तरुण भारत संवाद, श्रमिक पत्रकार संघ, सावा, मेट्रो सोलापूर, डिजिटल मीडिया आणि फोटो-व्हिडिओग्राफर या दहा संघांचा यात समावेश होता. अंतिम सामना रविवारी सायंकाळी डिजिटल मीडिया विरूद्ध सावा या संघात झाला. प्रथम फलंदाजी करताना सावा संघाने निर्धारित ६ षटकात ६ बाद १८ धावा केल्या. प्रत्युत्तरात डिजिटल मीडिया संघाने हे आव्हान अवघ्या १.१ षटकात २१ धावा करत पूर्ण केले आणि १० गडी राखून एकतर्फी दणदणीत विजय मिळविला. धनंजय जाधव हा सामनावीर ठरला. स्पर्धेतील बेस्ट बॅट्समन व मालिकावीरचा किताब स्वप्निल म्हेत्रसकर (सावा) याने पटकाविला. बेस्ट बॉलर इब्राहिम मुजावर (डिजिटल मीडिया) व बेस्ट फिल्डर सुभाष कलशेट्टी (श्रमिक पत्रकार संघ) यांना गौरविण्यात आले. अंतिम सामना एकतर्फी झाला असला तरी स्पर्धेचे उपांत्य फेरीचे सामने मात्र उच्चांकी धावसंख्येचे आणि चुरशीचे झाले होते. चारही संघांच्या फलंदाजांनी अक्षरशः षटकार व चौकारांची आतिषबाजी करत प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते.

सोलापूरचा पुत्र तथा आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू अर्शिन कुलकर्णी याच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, माजी नगरसेवक अनंत जाधव, बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकारी विजयकुमार सोनकुसरे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे, ‘सावा’चे अध्यक्ष संतोष उदगिरी, सचिव अक्षय जव्हेरी, राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके, संयोजन सदस्य आफताब शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### क्रिकेट नियमित खेळले पाहिजे : अर्शिन कुलकर्णी

क्रिकेट हा सांघिक खेळ आहे. तो सर्वांनाच आनंद देतो. अलिकडच्या काळात क्रिकेटची मोठी क्रेझ निर्माण झाली आहे. स्पर्धेपुरते न खेळता क्रिकेट नियमित खेळले पाहिजे, असे सांगून अर्शिन कुलकर्णीने विजेत्यांना व स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# राज्य स्पर्धेत अरिहंत स्कूलची ५१ पदकांची कमाई

## तीन गटात सर्वसाधारण विजेतेपद : 30 सुवर्ण, २० रौप्य व १ कांस्य







**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

महाराष्ट्र युवा खेल परिषद यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सोलापूर येथील अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलच्या खेळाडूंनी ३० सुवर्ण, २० रौप्य व १ कांस्य अशी ५१ पदकांची कमाई केली. तसेच तीन गटात त्यांनी सर्वसाधारण विजेतेपदाचे करडंक पटकाविले. कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेमध्ये अरिहंत स्कूलने क्रिकेट स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रथम, १४ वर्षाखालील मुलांच्या गटात प्रथम व १७ वर्षाखालील मुलांच्या गटात द्वितीय आणि १७ वर्षाखालील मुलींनी ४ बाय १०० मीटर रिले रेसमध्ये प्रथम क्रमांक मिळवत ही कामगिरी केली.

सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक आकाश मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे स्कूलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, पर्यवेक्षिका रजनी सग्गम, चन्नेश इंडी व शिक्षकांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेले खेळाडू :१४ वर्षाखालील : क्रिकेट - मुले :** अथर्व देशमुख, सुमितराज मेरगू, श्रेयस सोलंकर, अबूसुफियान पटेल, सुबान पटेल, नुमान भगवान, कुणाल साई कोंडा, अभिनव गायकवाड, महेंद्र मादास, श्रेयस गालपेल्ली, अथर्व बिराजदार, आर्यन पद्मा, आयुष पद्मा, प्रेम भोसले, वैभव पाटील. **धावणे** - विश्वास पल्ली (१०० मीटर, रौप्य), श्रेयस गालपेल्ली (२०० मीटर सुवर्ण), सुमितराज मेरगू (२०० मीटर रौप्य).

**१७ वर्षा खालील : क्रिकेट - मुले :**संतोष संगणगारी, सोमेश चनमल, भावेश अन्नम, विश्वराज डक्का, आर्यन याटकर, विश्वास पल्ली, विघ्नेश बंदगी, शौर्य आव्हाड, महेश टोणपे, पृथ्वीराज गोसावी, उदयराज बत्तुल, युवराज पाटील, आकाश बंदगी, समर्थ उदगिरी, श्रेनिक अंबाल, श्रीनाथ अन्नम. **मुली** : श्रुती चन्ना, हर्षदा पाटील, अक्षरा कांबळे, वैभव जेटगी, प्रियदर्शनी संगणगारी, शिफा शेख, अलेख्या भोसले, अलेख्या गंजी, श्रुती घाट. **धावणे - मुले** : आर्यन याटकर (२०० मीटर, सुवर्ण), संतोष संगणगारी (४०० मीटर सुवर्ण), विश्वराज डक्का (४०० मीटर रौप्य), भावेश अन्नम (४०० मीटर, कास्य). **मुली** : श्रुती चन्ना (३००० मीटर, सुवर्ण), अक्षरा कांबळे ४०० मीटर, सुवर्ण), हर्षदा पाटील (२०० मीटर सुवर्ण), प्रियदर्शनी संगणकारी (२०० मीटर रौप्य).



# निर्मलाताई ठोकळ प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा सप्ताहाचे उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष विपिन शंकरराव ठोकळ, प्रभारी पोलीस निरीक्षक ग्रामीण मोटार परिवहन अधिकारी, बालाजी पांडुरंग कांबळे, प्रा. डॉ. महादेव देशमुख, इंदिरा ज्ञानवर्धिनी संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पाताई ठोकळ व जिल्हा संघटक स्काऊट गाईड सोलापूरचे श्रीधर मोरे व प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्रशालेच्या खेळाडूंनी आणलेली क्रीडाज्योत मान्यवरांच्या हस्ते विराजमान करण्यात आली. त्यानंतर रंगीबेरंगे फुगे व कबुतर हवेत सोडून टाळ्यांच्या गजरात याचे उद्धघाटन झाले. यावेळी श्रीपुर येथे झालेल्या जिल्हा स्काऊट व गाईड मेळाव्यात प्रशालेच्या स्काऊटर अर्जुन सुरवसे, सुरज पवार व गाईडर पुनम चव्हाण, उर्मिला लंबे व पूजा कदम तसेच सर्व स्काऊट्स व गाईड्सनी मिळविलेल्या यशाबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन ए. यु. जाधव यांनी केले. व्ही.जी. पाटील यांनी आभार मानले.

# २० मोबाईल अन् सहा लाखांचे सोन्याचे दागिने केले परत

नातेपुते पोलिस ठाण्याची कामगिरी

तभा वृत्तसेवा,
नातेपुते, दि. ५ जानेवारी -

नातेपुते पोलीस ठाणेकडून चोरी घरफोडी सारख्या विविध उघडकीस आणलेल्या गुन्ह्यामधील व चोरी झालेले २० मोबाईल असे एकूण सहा लाख सोळा हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व मुंबई महाराष्ट्र पोलीस रायझिंग डे सप्ताह निमित्त मूळ फिर्यादीस केले परत केले.

नातेपुते पोलीस स्टेशन पोलीस अधीक्षक सोलापूर अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी रात्री दोन ते पावणे चार वाजताच्या



दरम्यान फिर्यादी सुभाष नरहरी केंजळे वय ५४ वर्षे व्यवसाय शेती रा. केंजळे वस्ती धर्मपुरी (ता. माळशिरस) यांचे राहते घर फोडून घरफोडी झाल्याबाबत फिर्याद प्राप्त झाली होती. त्यांच्या तक्रारीवरून नातेपुते पोलीस ठाणे येथे २५३/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. त्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजने करीत होते. गुन्हचा तपास करीत असताना गोपनीय बातमीदार मार्फत व तांत्रिक माहिती मिळवून सदर गुन्हा करणारे वेगवेगळे आरोपींना नातेपुते पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी विक्रांत दिघे, पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ चव्हाण यांनी आरोपी देवगन बापू उर्फ विजय पवार रा. आटपाडी जि. सांगली यास अटक करून त्याच्याकडून वरील गुन्ह्यातील दोन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत केले होते सदरचे सोने फिर्यादीस देणेबाबत माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यूबी पेठे माळशिरस न्यायालय यांच्या आदेशाने झाल्याने तसेच नातेपुते परिसरातील गहाळ व चोरी झालेले वेगवेगळ्या कंपनीचे म 'बाईल पोलीस कॉन्स्टेबल रणजीत मदने, पोलीस कॉन्स्टेबल रतन जाधव, यांनी तांत्रिक विश्लेषण करून सुमारे चार लाख सोळा हजार किमतीचे वेगवेगळे कंपनीचे २० मोबाईल हस्तगत केले असून वरील एकूण सहा लाख ६ लाख सोळा हजार रुपये किमतीची मुद्देमाल महाराष्ट्र पोलीस रायझिंग डे सप्ताहाचे औचत्य साधून वरील मुद्देमाल पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, विभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाण्याच्या प्रांगणात समारंभपूर्वक वरील सर्व गुन्ह्यातील वरील फिर्यादींना बोलावून घेऊन त्यांना सोन्याचे दागिने व मोबाईल परत करण्यात आले. यावेळी नातेपुते पोलीस ठाण्याचे सपोनि महारुद्र परजने, पोलीस उपनिरीक्षक विक्रांत दिघे, पोलीस कॉन्स्टेबल रामचंद्र चौधरी, पोलीस हेड कॉन्स्टेबल राहुल रणवरे, महादेव कदम, राकेश लोहार, रणजीत मदने, दिनेश रणवरे, नितीन पन्हाळे, अमोल बंदुके, सोमनाथ मोहिते, रमेश बोराटे, गणेश कुलकर्णी, रमेश कर्चे, अमोल देशमुख, नवनाथ थिटे, मपोकॉ नेहा बोंद्रे यांचे आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त



### सतर्क नागरीकांमुळे चोरीवर आळा घालणार : सपोनि मनोज पवार

मंद्रुप, दि. ५ जानेवारी-

नागरीकांच्या सुरक्षेसाठी पोलीस सदैव कार्यरत आहेत. सामाजिक बांधिलकी म्हणून मोठया व्यापाऱ्यांनी सुरक्षेसाठी व चोरीला आळा घालण्यासाठी सीसी टीव्ही कॅमेरा लावावे. मध्यवर्ती ठिकाणी किंवा रस्त्याच्या बाजूला कॅमेरा लावून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन केले. चोरांना पकडण्यासाठी व आळा घालण्यासाठी रात्रीची गस्त वाढविण्यात येणार आहे. नागरिक व व्यापाऱ्यांनी सतर्क राहून पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन मंद्रुप पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी केले. मंद्रुप येथे वाढत्या चोऱ्या व गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस ठाण्याच्या वतीने आयोजित बैठकीत सपोनि पवार बोलत होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, सरपंच अनिता कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, शिवपुत्र जोडमोटे, दयानंद ख्याडे, सचिन फडतरे, महमंद शेख, शिवराज कालदे, प्रदीप ख्याडे, निरंजन ख्याडे, प्रशांत दोशी, मळसिद्ध म्हेत्रे, चौधरी, उमेश माने, उमाशंकर रावत, रवीशंकर म्हेत्रे, अल्ताफ शेख, संदिप मेंडगुदले, अनमोल केवटे, सोन्याचे व्यापारी, कापड दुकानदार, खते बियाणे दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते .



### संतोष कस्तुरे यांना गुणवंत क्रीडा शिक्षक पुरस्कार प्रदान

वळसंग, दि. ५ जानेवारी-

वळसंग (ता.द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या श्री संतोष विठ्ठल कस्तुरे यांची शिक्षक भारती संघटनेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सावित्री फातिमा गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२५ या जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी गुणवंत क्रीडा शिक्षक म्हणून निवड करण्यात आली होती. पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रम रविवार दि. ५ जानेवारी रोजी जगदीशश्री लॉन्स अँन्ड हॉल कोणार्क नगर, शांती इंग्लिश मिडीयम स्कूल येथे संपन्न झाला. खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते शिक्षक भारती संघटनेच्या सर्व पदाधिकारी समवेत वरील पुरस्कार संतोष कस्तुरे यांना प्रदान करून सपत्नीक गौरविण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, तानाजी जमादार संजयकुमार धनशेट्टी, सिदधाराम भैरामडगी, निलकंठ कवटगी,सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, प्रा.संतोष शिंदे, बसवराज दुधगी,वीरेश थळंगे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, अजय माणकोजी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी यांच्यासह श्रेया कस्तुरे, प्रकाश कस्तुरे, प्रियांका भैरामडगी आदी उपस्थित होते.



### कासेगाव येथे कै. बाबासाहेब देशमुख यांची पुण्यतिथी साजरी

पंढरपूर, दि.५ जानेवारी-

कासेगाव येथील दौलतराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात (कै.) दौलतराव उर्फ बाबासाहेब देशमुख यांची १९ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रास्ताविक मुख्याध्यापक लवटे यांनी केले. (कै.) बाबांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पत्रकार बाळासाहेब बडवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इयत्ता दहावी व बारावीमध्ये प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा (कै.) बाबांच्या स्मरणार्थ ठेवलेली विविध पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पी.एच.देशमुख यांनी बाबांच्या जीवनकार्याचा परिचय करून देताना पन्नास वर्षापूर्वीच्या आठवणींना उजाळा देत असताना स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या कार्याला बाबांची त्यांना कशी साथ लाभली हे सांगत कासेगाव येथील बाबांनी केलेल्या विविध विकासकामांचा व गोरगरिबांसाठी केलेल्या कार्याचा देखील त्यांनी यावेळी आढावा घेतला. यावेळी बाळासाहेब बडवे, वसंतराव देशमुख, जीवन पाटील, चंदुकाका देशमुख उपस्थित होते.

### सहकार महर्षि महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

अकलूज, दि. ५ जानेवारी-

येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, शंकरनगर-अकलूज या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी सिने अभिनेता अशोक शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे, कार्यालयीन अधीक्षक शब्बीर शेख, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सिनेअभिनेता अशोक शिंदे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे यांनी प्रस्तावविक केले व सर्वांना सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन तसेच आभार प्रा. सचिन पांढरे यांनी मानले.

## कुर्डूवाडी-पंढरपूर रोडवर स्वखर्चाने रस्त्याचे मुरमीकरण

तभा वृत्तसेवा,
मोडनिंब, दि. ५ जानेवारी-

माढा तालुक्यातील कुर्डूवाडी पंढरपूर रोड वर बावी (ता. माढा) नजीक रस्त्याच्या भीषण दुरावस्थेचा मुद्दा कळीचा बनला असताना सामाजिक कार्यकर्ते निलेश पाटील यांच्या माध्यमातून आणि लोकसहभागातून मुरमीकरण करण्यात आले.यामुळे या भागातून प्रवास करणाऱ्या नागरिकांचा प्रश्न यातून सुखकर झाला आहे. बऱ्याच दिवसापासून ह्या रस्त्याची दुरावस्था झाली होती. पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वखर्चाने मुरमीकरण करून प्रवासांचा मार्ग सुखकर केला आहे. या रस्त्याच्या मुरम 'करणामुळे वाहनधारक, प्रवासी, शेतकऱ्यांसह शालेय विद्यार्थ्यांचा प्रश्न मार्गी लागला आहे.या ठिकाणी रस्त्याची खूपच दयनीय अवस्था झाल्याने परिसरातील नागरिक तसेच शालेय विद्यार्थ्यांना येजा करताना मोठी कसरत करावी लागत होती. या संदर्भात लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून लवकरच रस्त्याचे प्रश्न सोडविणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.



## इंजिनिअरिंग प्रवेशासाठीच्या 'सीईटी २०२५' करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.५ जानेवारी -

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरिता राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एम एचए-एमएचटी सीईटी (पीसीएम व पीसीबी) २०२५ या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया सोमवार दि.३० डिसेंबर २०२४ पासून ते शनिवार, दि.१५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत चालणार आहे.

बारावी सायन्स मधून उत्तीर्ण झालेल्या व सध्या बारावी सायन्समध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएचए-एमएचटी सीईटी (पीसीएम व पीसीबी) २०२५ साठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग म ध्ये उपलब्ध करण्यात आली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी दिली.

बारावी सायन्स नंतर पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजली जाणारी एमएचए- एमएचटी सीईटी (पीसीएम व पीसीबी) २०२५ ही परीक्षा शासनाच्या दिलेल्या वेळापत्रकानुसार घेतली जाणार आहे. एकूणच पीसीएम व पीसीबीच्या या सीईटी परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची प्रक्रिया सोम वार दि.३० डिसेंबर २०२४ पासून ते शनिवार, दि.१५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत चालणार आहे.



## धर्माचरणातून भक्तीमार्ग दाखविणारे केंद्रबिंदू म्हणजे वटवृक्ष मंदिर : डॉ. स्वामी

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट. दि. ५ जानेवारी -

आजच्या आधुनिक युगात भौतिक सुखाच्या शोधात मानसिक शांतीपासून परावृत्त होत असलेल्या मानवी जीवनास आध्यात्मिकतेतून व धर्माचरणातून भक्तीमार्ग दाखविणारे केंद्रबिंदू म्हणजे स्वामी समर्थांच्या वास्तव्याने व पदस्पर्शाने पावन झालेले येथील वटवृक्ष मंदिर असून स्वामींचे हे वटवृक्ष मंदिर हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असल्याचे मनोगत सोलापूर येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ.इरेश स्वामी यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच वटवृक्ष मंदिरास भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन व आशिर्वाद घेतले असता वटवृक्ष मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांचा श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. याप्रसंगी ते बोलत होते. प याप्रसंगी मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, दिपक स्वामी, गिरीश पवार, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद सोनार, संतोष पराणे, सागर गोंडाळ, स्वामी लोणारी, श्रीशैल गवंडी, नरेंद्र शिर्के, संतोष जमगे इत्यादी उपस्थित होते.

## दत्त प्राथमिक व दिलीपराव सोपल प्रशालेत बालिका दिन साजरा

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ५ जानेवारी-

येथील दत्त प्राथमिक विद्यामंदिर व दिलीपराव सोपल प्रशाला बार्शी या दोन्ही शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्त प्राथमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका संगीता काळे तर प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेतील सर्व शिक्षिका उपस्थित होत्या. क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. व्यासपीठावरील मान्यवर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. अध्यक्ष व सर्व मान्यवरांना विद्यार्थीनींच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन व



प्रास्ताविक चंद्रकांत लोखंडे यांनी केले. इयत्ता १ ली ते १० वीमधील विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे, सचिन काळे व चंद्रकांत लोखंडे, युवराज जगताप, सुनील लंगोटे सर, मंगेश मोरे, संगीता काळे, अरुणा मठपती, राहुल ठोंगे, संतोष ठोंबरे, विलंबिनी पाटील व सेवक संदीप भोरे आदी उपस्थित होते.

## कडलास मॅरेथॉनमध्ये सांगलीचा स्वराज पाटील प्रथम

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.५ जानेवारी-

कडलास, ता.सांगोला येथील सुपुत्र कार्यकारी अभियंता सचिन पवार यांचे संकल्पनेतून तरुणाई आरोग्य चळवळीकडे ओढली जावी, व्यसनाधीनतेकडे नव्हे याउद्देशाने दरवर्षी प्रमाणे नववर्षाच्या स्वागतासाठी कडलास मध्ये मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. ह्या स्पर्धा कै.रावसाहेब पाटील आदर्श विद्यालय कडलास येथे पार पडल्या. या स्पर्धेत ४०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेतला. १० किमी, ५ किमी व ३ किमी गटात स्पर्धा पार पडली. या स्पर्धे नंतर उद्धव बुवा गायकवाड, अतुल वाघमोडे, शशिकांत भजनावळे, सिद्धेश्वर ढेबे यांचेतर्फे अल्पोपाहार




वाटप करण्यात आला. सदर स्पर्धेचे बक्षीस वितरण सचिन पवार, वैशाली पवार, अनुराधाताई पाटील, मुख्याध्यापिका संगीता शिंदे, पूनम टापरे, प्रा.संतोष कांबळे, डॉ.शैलेश डोंबे, दीपक टापरे, डी.के. पाटील, सुनील भोरे, सतीश राऊत, भारत इंगोले, अण्णासाहेब गायकवाड यांचेहस्ते करण्यात आले. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कडलास मॅरेथॉन संयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचे विजेते-**

१० किमी पुरुष-प्रथम स्वराज देवानंद पाटील (सांगली), द्वितीय सुशांत प्रकाश सरगर (कोळा), तृतीय सोमनाथ शिवाजी ऐवळे, महिलांमध्ये प्रथम अनुष्का अमरदीप शिंदे, (माढी), द्वितीय अक्षरा शिवाजी पवार, तृतीय गायत्री संतोष मासाळ. ५ किमी मुले- प्रथम ओंकार शिवाजी भुसनर, द्वितीय हरिप्रसाद शिवाजी ऐवळे, तृतीय शशिकांत चव्हाण, मुली प्रथम स्नेहल भाऊसाहेब खरात, द्वितीय अनुश्री हरिदास मासाळ, तृतीय भाग्यश्री सुधीर गिड्डे, ३ किमी मुले- प्रथम बालाजी सुरेश गिड्डे (तडवळे), द्वितीय यश सुधीर गिड्डे तृतीय साहिल धर्मेंद्र ऐवळे, मुली प्रथम स्नेहल विलास गिड्डे द्वितीय राजेश्री संभाजी किरकद, तृतीय रोहिणी राजेंद्र पवार (कडलास)



### चार्जिंग स्टेशनची चाचणी तातडीने करावी : ग्राहक पंचायतीची मागणी

पंढरपूर, दि.५ जानेवारी -

राज्य परिवहन महामंडळाच्या चार्जिंग स्टेशनचे काम होऊनही अद्याप ते सुरू करण्याबाबतची कार्यवाही दिसून येत नाही. त्यामुळे जिल्ह्यात ई बससेवा सुरू झालेली नाही.तरी चार्जिंग स्टेशनची चाचणी तातडीने घेऊन तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूरसाठी ई बस प्राधान्याने मिळाव्यात अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास,जिल्हा सचिव सुहास निकते यांनी विभाग नियंत्रक यांच्याकडे केली आहे. मागील वर्षभरापासून चार्जिंग स्टेशनचे काम सुरू आहे. सध्या एकावेळी आठ बसगाड्या चार्जिंग करता येतील एवढे काम झालेले आहे त्याची चाचणी तातडीने घेण्यात यावी. अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या भाविक, प्रवाशांना ई-बसमधून प्रवासाचा लाभ मिळेल अशी अपेक्षा जिल्हा संघटक दीपक इरकल, प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते यांनी व्यक्त केली आहे.



### अक्कलकोट येथे सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

अक्कलकोट, ४ जानेवारी-

अक्कलकोट येथील ब्यागेहळ्ळी रोडवरील राजमाता जिजाऊ मंगल कार्यालयात भारतीय बौद्ध महासभा शाखा अक्कलकोट यांच्यावतीने ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष मेजर कमलाकर कांबळे, जिल्हा संघटक सिद्धाराम घटकांबळे, जिल्हा प्रवक्ते दिलीप कदम, राजकुमार बनसोडे, श्रीशैल शिवशरण, तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे, अनंत शिवशरण, शंभूदेव सुरवसे, भीमाशंकर घटकांबळे, शिवशंकर गुंजले, दिलीपकुमार शिवशरण, उर्मिला राजकुमार बनसोडे, पत्रकार राजेश जगताप, स्वामीराव गायकवाड, दिलीप कदम आदी उपस्थित होते. आभार सिद्धाराम घटकामुळे यांनी मानले.



### टेंभुर्णी प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी अमरसिंह शेंडे, उपाध्यक्षपदी धनंजय मोरे

टेंभुर्णी, दि. ४ जानेवारी-

टेंभुर्णी प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी अमरसिंह शेंडे, उपाध्यक्ष धनंजय मोरे, सतीश काळे यांची सचिव, खजिनदारपदी पत्रकार सचिन होदाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सतीश चांदगुडे, सोपान ढगे, सूरज देशमुख, संतोष पाटील, सुहास साळुंखे, सोपान ढगे, सदाशिव पवार, सदाशिव पवार, गणेश चौगुले, सोपान ढगे, संतोष पाटील, अनिल जगताप, सतीश चांदगुडे, विष्णूभाऊ बिचकुले, सुहास साळुंखे उपस्थित होते.



### शिंदेवाडीत सावित्रीमाईंची जयंती साजरी

नातेपुते : शिंदेवाडी (ता. माळशिरस) येथील वजीर तांबोळी कुटुंबाकडून क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी समरीन तांबोळे असद तांबोळी, अकबर तांबोळी, आयशा तांबोळी, अफ्रिन तांबोळी आदी उपस्थित होते.

# आर्थिक शिस्तीच्या बळावर सिद्धेश्वर बँक रोल मॉडेल : सहकारमंत्री पाटील

## ● सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

प्रामाणिकपणा व आर्थिक शिस्तीच्या बळावर सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेची आजवरची वाटचाल झाली आहे. ऑडिटमध्ये सातत्याने 'अ' दर्जा मिळविणे ही सोपी गोष्ट नाही. मात्र ही किमया करून दाखवत पन्नास वर्षांचा टप्पा पार करणारी सिद्धेश्वर बँक म्हणजे सहकारी वित्तपुरवठा क्षेत्रातील रोल मॉडेल आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी काढले.

सिद्धेश्वर बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभा हेरिटेज बी लॉन येथे रविवारी थाटात पार पडला. त्याप्रसंगी उदघाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रिझर्व बँकेच्या केंद्रीय मंडळाचे संचालक सतीश मराठे होते. यावेळी व्यासपीठावर आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे, अध्यक्ष नरेंद्र गंभिरे, उपाध्यक्षा सुचेता थोबडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सिद्धेश्वर बँकेसारख्या संस्थांनी सोलापूरचे नाव सहकाराच्या क्षेत्रात अग्रभागी आणले. रिझर्व बँकेच्या नियमांचे काटेकोर पालन करत सिद्धेश्वर बँकेने स्वतःची मोठी पत निर्माण केली. महाराष्ट्राने एक ट्रिलियन अर्थकारण करण्याचे जे उद्दिष्ट बाळगले आहे, त्यामध्ये सिद्धेश्वर बँकेप्रमाणे पारदर्शक कारभार करणाऱ्या सहकारी संस्था व बँकांचा सिंहाचा वाटा असणार आहे, अशा शब्दांत सहकारमंत्री पाटील यांनी सिद्धेश्र्वर बँकेचे कौतुक केले. सिद्धेश्वर बँकेसारख्या सहकारी वित्तीय संस्था या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाला सुलभ अर्थपुरवठा करतात. त्यामुळे सावकाराच्या जाचाच्या दुष्टचक्रात न अडकता त्यांना आपली प्रगती साधता येते, असे सतीश मराठे म्हणाले. वसूली प्रक्रिया सुलभ करण्यासाठी शासनाने सहकारी बँकांना सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी राज्य शासनाला केले.



ठेवीदार, सभासद, कर्जदार अशा सर्वच घटकांच्या अपेक्षा वाढत असल्याने सहकारी वित्तीय संस्था चालविणे म्हणजे सध्या तारेवरची कसरत ठरत आहे. मात्र व्यापारी व तरुणांना अर्थपुरवठा करून सोलापूर जिल्ह्यातील ब्रेन ड्रेनही रोखणे गरजेचे आहे. हे आव्हान पेलण्यासाठी सहकारी वित्तपुरवठा संस्थांनी सिद्धेश्वर बँकेप्रमाणे आदर्श कारभार करावा, असे आवाहन व्यासपीठावर उपस्थित लोकप्रतिनिधींनी केले. सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात या सर्व मान्यवरांच्या हस्ते बँकेच्या पन्नास वर्षांतील वाटचालीचा मागोवा घेणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. तत्पूर्वी बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे यांनी आपल्या स्वागतपर प्रास्ताविकात बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीचा लेखाजोखा मांडला. 'सुवर्णनिधी ठेव' योजनेअंतर्गत बँकेकडे केवळ तीन महिन्यात ७५ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या. बँकेच्या सभासद व ग्राहकांनी दाखविलेला विश्वास यातून व्यक्त होतो. त्यांच्याबद्दल कृतज्ञता म्हणून दहा हजार सभासदांना चांदीची सिद्धेश्वर प्रतिमा भेट देण्यात आली. पन्नास वर्षांचा प्रवास हा आव्हानांचा होता. मात्र आजपासून आमची शतकमहोत्सवाकडे धैर्यपूर्वक वाटचाल सुरु झाली आहे, असे बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभिरे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

आजोबा विष्णुपंततात्या कोठे यांचे निधन झाल्यानंतर मी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलो होतो. मात्र २०२१ साली सिद्धेश्वर बँकेने केलेल्या कर्जपुरवठ्यामुळेच मी सावरू शकलो, अशा शब्दांत आ. देवेंद्र कोठे यांनी बँकेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शोभा बोल्ली यांनी सूत्रसंचालन केले तर सी.ए. श्रीधर रिसबूड यांनी संचालक मंडळाच्या वतीने आभार मानले. या समारंभास जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्रशासक कुंदन भोळे, संतोष पवार, आनंद चंदनशिवे, जुबेर बागवान, अरविंद जोशी, माजी चेअरमन सुभाष मुनाळे, मल्लिनाथ विभुते, लातूर डि.सी.सी.चे संचालक अशोक गोविंदपूरकर, अश्वीनीचे बिपिनभाई पटेल, ज्येष्ठ विधीज्ञ मिलिंद थोबडे, विष्णू मोंढे, दिपक पाटील, महावीर बँकेचे दिपक मुनोत, अण्णासाहेब कोतली, डॉ. सिद्धेश्वर वाले, भिमाशंकर पटणे तसेच बँकेचे संचालक मंडळातील सर्वश्री सौ. रूपाली बिराजदार, प्रकाश वाले, तुकाराम काळे, अशोक लांबतुरे, पशुपतीनाथ माशाळ, रुपाली बिराजदार, शिवानंद कोनापुरे, बाळासाहेब आडके, भीमाशंकर म्हेत्रे, प्रकाश हत्ती, सिद्धेश्वर मुनाळे, महेश सिंदगी, ॲड. धानय्या चिवरी, संजय घाळे, राजेश कलशेट्टी व कर्मचारी वर्ग यांच्यासह लातूर, उदगीर, बार्शी, वैराग, मंद्रूप, अक्कलकोट, दुधनी व पुणे येथील सभासद, ग्राहक, स्थानिक सल्लागार, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहभोजनाने या समारंभाचा समारोप झाला.

▸ **मोबाईल बँकिंग सेवेचा शुभारंभ :** बँकेने २०१५ ला कोअर बँकिंग प्रणाली स्वीकारली होती. तसेच ऑनलाईन एनपीए कार्यप्रणाली सुरू करणारी सिद्धेश्वर बँक ही सोलापूरातील पहिली बँक ठरली होती. आता ग्राहकांची गरज ओळखून बँकेने मोबाईल बँकिंग सेवाही सुरू केली. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे मोबाईल बँकिंग सेवेचा शुभारंभ झाला.

▸ **शुभसंदेशांचे वाचन :** सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त बँकेला केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री ना. अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, सहकारी बँकांची असोसिएशन असणाऱ्या अम्ब्रेला ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष ज्योतींद्रभाई मेहता यांनी पाठविलेल्या शुभसंदेशांचे वाचन बँकेचे सरव्यवस्थापक राम शर्मा यांनी केले.

# बाराबंदी पोशाख शिवण्यास कुदळे कारागीर बंधू व्यस्त

### सिध्देश्वर यात्रेनिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्देश्वर यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. यात्रा कालावधीत मानकरी आणि नंदीध्वजधारक यांच्यासाठी महत्वाचा मानला जाणारा बराबंदी पोशाख शिवण्यात कुदळे कारागीर बंधू व्यस्त असल्याचे चित्र दिसून येत आहे.





शहरातील कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरालगत कुदळे यांचे दुकान आहे. येथे सर्व मानकरी आणि नंदीध्वजधारक दरवर्षी आपल्या बाराबंदी पोशाखाचे मोजमाप देऊन नवीन पोशाख शिवून घेतात. यात्रेच्या प्रमुख चारदिवशी चार-बाराबंदी परिधान करून ते यात्रेमध्ये सहभागी होतात. दरम्यान, सदरचा पोषाख हा श्रीसिध्देश्वर महाराज परिधान करत असत, त्यामुळे या पवित्र पोशाखाला यात्रा कालावधीत अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. हा पोषख परिधान केल्यानंतरच यात्रेत नंदीध्वज पेलण्यात येतो. तसेच मानकरी पालखी देखील हा पोषाख घालून यात्रेच्या विधीमध्ये सहभागी होतात. सदरचे एक पोषाख शिवण्यासाठी कारागिरांना दोन ते तीन तासांचा अवधी लागतो. यासाठी पांढरेशुभ्र खादी कापड आणि धोतर यांची आवश्यकता असते. दो घोडा सुती पांढरा शुभ्र वस्त्रांवर शिलाई केली जाते. नेहरू शर्ट, आणि त्यावर बारा बंद असलेला कोट म्हणजेच बाराबंदी असा हा पारंपारिक पोशाख यात्रेच्या काळात मानकरी परिधान करतात. कुदळे परिवार यात्रेच्या एक महिना अगोदरपासून हा पोशाख तयार करण्यात व्यस्त असतात. सुमारे साडेतीनशेहून अधिक बाराबंदी पोशाख या काळात शिवण्यात येतात. एकंदरीत ग्रामदैवत श्रीशिवयोगी सिध्देश्वर महाराजांच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात यात्रेची लगबग सुरू झालेली दिसून येत आहे.

**पिढ्यान्‌पिढ्या बाराबंदी पोशाख शिवण्यात कुदळे परिवार व्यस्त**

आमच्या पिढीकडे हा पोषाख शिवण्याचा मान असून आमच्या पिढ्यान् पिढ्या या पवित्र सेवेमध्ये कार्यरत आहेत. यात्रेच्या प्रमुख दिवशी सिद्धरामेश्वरांना भगवा बाराबंदी पोशाख तयार करून परिधान केला जातो. त्याच पद्धतीने मकर संक्रांती या दिवशी देखील काळा कोट आणि पांढरा शुभ्र बाराबंदी पोशाख परिधान केला जातो. लहान मुलांना शिवण्यात येणारा बाराबंदीची शिलाई ३५० रुपये तर मोठ्यांसाठी ५५० सुती कापडासह घेतली जाते.

**- कुदळे, बाराबंदी कारागीर**

**यात्रेनिमित्त बाराबंदी पोशाख शिवण्यासाठी तयारी सुरु**

सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षीही बाराबंदी शिवण्यासाठी कुदळे यांच्याकडे आलो आहोत. यात्रेमध्ये सहभागी झालेले मानकरी आणि नंदीध्वजधारक हा पोशाख परिधान करतात. यंदाच्या वर्षी देखील यात्रेचा उत्साह दिसून येत आहे.

**- जयप्रकाश आमनगी, सिध्देश्वर भक्त**

# यूपीएससीच्या परीक्षेत बीडचा ऋषिकेश जोगदंड देशात अव्वल

● जिल्हाभरातून कौतुकाचा वर्षाव; तरुणांसाठी ठरले आदर्श..!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

जिद्द, चिकाटी व सातत्याने प्रयत्न करतात त्यांना हमखास यश मिळते, त्याचे मूर्तिमंत उदाहरण समोर आले आहे. बीड तालुक्यातील वानगाव येथील ऋषिकेश जोगदंड या तरुणाने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या अंमलबजावणी अधिकारी, लेखाधिकारी या पदासाठीच्या परीक्षेत देशातून पहिला येण्याचा बहुमान मिळवला आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी ऋषिकेश आदर्श ठरले आहेत.



ऋषिकेश यांचे वडील रामकिसन जोगदंड व आई मीरा जोगदंड हे शेती करतात. मोठा अधिकारी बनायचे अशी जिद्द ऋषिकेश यांची लहानपणापासूनच होती. आई- वडिलांनीही त्यांना नेहमी प्रोत्साहन दिले. चौथीपर्यंतचे शिक्षण मामाकडे चहाटा येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, चहाटा येथे पूर्ण केले. पुढे बीड येथील संस्कार विद्यालयात माध्यमिकपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर गोवा राज्यातील बिट्स पिलानी कॅम्पस महाविद्यालयात इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. दहावी बोर्ड परीक्षेत बीड जिल्ह्यातून तिसरा क्रमांक मिळविण्याचा बहुमान मिळविला होता.

▸ **'सारथी' ची शिष्यवृती घेवून मिळवले यश**

एनटीएस परीक्षेत महाराष्ट्रातून चौथा क्रमांक मिळवला. आर्थिक अडचण निर्माण झाल्याने 'सारथी' संस्थेची शिष्यवृत्ती घेऊन हलाखीच्या परिस्थितीत महत्त्वपूर्ण यश मिळवत आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केले. सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी ऋषिकेशचे अभिनंदन केले आहे.

▸ **जिल्ह्याचे नाव देशपातळीवर चमकले**

दरम्यान, केंद्रीय लोकसेवा आयोगाने भविष्य निर्वाह निधी संस्था, कामगार व रोजगार मंत्रालय या विभागातील अंमलबजावणी अधिकारी, लेखाधिकारी या पदासाठी २ जुलै २०२३ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत ऋषिकेश यांनी देशातून पहिला क्रमांक मिळवला.त्यांचे वानगावचे सरपंच संतोष जोगदंड, बबन जोगदंड, चहाटा गावचे सरपंच तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विनेश उबाळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप बाबूराव उबाळे, मुकेश रसाळ आदींनी ऋषिकेश यांचे स्वागत केले आहे.





**सोलापूर : येथील वामन नगर येथे डॉ. प्रशांत गाडे यांच्या 'डॉक्टर गाडे बालरुग्णालय' या नूतन हॉस्पिटलचा उद्घाटन सोहळा आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थित राहून डॉ. गाडे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, नगरसेवक नागेश टाकमोगे, शिवलिंग कांबळे, ज्योतीताई वाघमारे, फुलचंद गाडे, निर्मला गाडे, डॉ. प्रशांत गाडे, दीपाली गाडे उपस्थित होत्या.**



## सात नंदीध्वज पूजन

**सोलापूर : रविवारी सकाळी शिवानुभवन मंगल भवन, कामेश्वर भवन समस्त ट्रस्ट यांच्यावतीने श्री सात नंदीध्वज पूजन करण्यात आले. (छाया : केवल तिवारी)**

# बार्शीच्या सांस्कृतिक जीवनाचा मानबिंदू सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळ

बार्शी तालुक्यातील जवळगांवचे सुपुत्र शिवाजीराव डिसले यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन शुन्यातून विश्व घडविले आणि या राज्यात उद्योगपती, शिक्षण संस्थाचालक आणि दानशूर व्यक्तीमत्व म्हणून समाजात आपले स्थान निर्माण केले. शिवाजीराव डिसले यांनी आपल्या कठोर परिश्रम, स्पष्टवक्ता, पारदर्शी स्वभाव, स्वच्छ कार्यपद्धती यातून आपल्या सार्वजनिक बांधकाम क्षेत्रातील कामांचा व्याप वाढविला. त्यांच्याकडे कर्तृत्वामुळे जसा लक्ष्मीचा आशीर्वाद होता तसाच त्यांच्या दानशूर स्वभावामुळे त्यांना मानणारा मोठा वर्ग पंचक्रोशीत निर्माण झाला होता. गरजू माणसाला मदत करण्याची त्यांची वृत्ती होती. त्यामुळे त्यांच्याकडे एक अजातशत्रू व परोपकारी व्यक्तीमत्त्व म्हणून पाहिले जात होते. जवळगांवच्या अनेक उपक्रमांना त्यांनी आजीवन सढळ हाताने मदत केली. डिसले यांच्या प्रेरणेने उच्चशिक्षित कलाप्रेमी, युवा नेतृत्व रवींद्र कापसे यांनी सन १९९९ साली सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाची स्थापना केली. आपले मित्र व मंडळाचे सचिव प्रताप दराडे व अन्य सहकार्यांच्या मदतीने कापसे यांनी बार्शी तालुक्यात कला, साहित्य, क्रीडा, नाट्य व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध उपक्रम गेली २५ वर्षे राबविले आहेत.

रवींद्र कापसे यांनी युवकांमध्ये सभा धीटपणा व अभिव्यक्ती आणि अविष्कार व आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे संयोजन केले. तसेच एकांकिका या अभिजात नाट्यकलेचे संवर्धन करण्यासाठी सलग १३ वर्षे राज्यस्तरीय कै. बाबुराव डिसले करंडक एकांकिका स्पर्धांचे संयोजन केले. या स्पर्धेला राज्याच्या कानाकोपर्यातून अनेक नववधीत विद्यार्थी कलावंतांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन घडवत सहभाग दिला. त्यामुळे या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक चांगले कलावंत घडले. या स्पर्धांचे वैशिष्ट्य म्हणजे खुल्या रंगमंचावर या स्पर्धांचे संयोजन झाले होते. सर्व विभागातून सर्व समावेशक पारितोषिके हे या स्पर्धेचे वेगळे वैशिष्ट्ये होते. तसेच या मंडळाने निसर्गचित्र रेखाटन या अभिनव स्पर्धांचेही आयोजन केले. या मंडळाच्या वाटचालीतील शिरपेचात मानाचा तुरा खोवण्याचे काम कै. बाबुरावजी डिसले जीवनगौरव पुरस्काराने केले आहे. समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये आपल्या गुणवत्ता, कर्तृत्व, कलागुण, सेवाभाव, कल्पकता यांचा ठसा उमटवित कार्यरत असणार्या प्रज्ञावंत, कलावंत, क्रीडापटू, शिक्षक, पत्रकार, कर्तृत्वशालिनी महिला यांना सन्मानित करण्याचे काम या पुरस्कारांच्या माध्यमातून होत आहे. गेली २२ वर्षे हे पुरस्कार दिले जात असून या पुरस्कार सोहळ्यांमध्ये विख्यात सिनेअभिनेते राहुल सोलापूरकर, अभिनेत्री क्रांती रेडकर, सुरेखा कुडची, अविनाश देशमुख यासारखे नामवंत कलावंत आले आहेत. या पुरस्कारांमुळे समाजातील गुणवंतांची काम करण्याची उमेद वाढली आहे. विधायक कामाला प्रोत्साहन ही या उपक्रमामागची संयोजक रवींद्र कापसे यांची भूमिका आहे.



रवींद कापसे हे शिक्षण क्षेत्रातील ध्येयवादी व्यक्तीमत्त्व आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सुसंस्कार, व्यक्ती महत्त्व विकास, विविध सुप्त गुणांना व्यासपीठ व राष्ट्रप्रेम निर्माण करावे ही कापसे यांची शिक्षण क्षेत्रातील दृष्टी आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागात आधुनिक काळाची गरज असलेले इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शिशुविहार ते कनिष्ठ महाविद्यालय अशा शाखा अर्णव शैक्षणिक संकुल, सासुरे फाटा, वैराग व शिवप्रभा शैक्षणिक संकुल, नागोबा चौक, रुई, ता. बार्शी येथे निर्माण केल्या आहेत. या शाळांच्या माध्यमातून विज्ञान प्रदर्शन, वार्षिक स्नेहसंमेलन, आनंद बाजार, जिल्हास्तरीय स्काऊटगाईड मेळावा असे विद्यार्थ्यांना घडविणारे उपक्रम आयोजित केले जातात. तसेच या शाळांमध्ये देशी खेळांना प्रोत्साहन मिळावे व चांगले क्रीडापटू घडावेत या उद्देशाने राज्यस्तरीय कुस्ती व कबड्डी स्पर्धांचेही संयोजन केले जाते. या शाळांच्या माध्यमातून चांगले विद्यार्थी घडले आहेत. रवींद्र कापसे यांनी विद्यार्थीदशेपासूनच सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांच्याकडे संघटन कौशल्य आहे. तसेच समाजासाठी काही भव्यदिव्य घडविण्याची त्यांची इच्छाशक्ती आहे. त्यामुळे शिक्षण व सामाजिक कार्य या क्षेत्रात कापसे यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. आपल्या शिक्षण संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोणत्याही सोयीसुविधांची कमतरता भासू नये यासाठी ते प्रयत्नशील असतात. ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा उंचाविण्याचे काम कापसे यांच्या ध्येयवादी दृष्टीकोनामुळे होत आहे. आपल्या मंडळाच्या माध्यमातूनही समाजाला दिशा देण्याचे काम कापसे यांनी केले आहे. कापसे यांनी बार्शी तालुक्यात विविध क्षेत्रातील मित्र परिवाराच्या माध्यमातून विधायक उपक्रमशीलता जोपासली आहे. आपल्या शिक्षण संस्थांच्या माध्यमातून जबाबदार नागरिक निर्माण करण्याबरोबरच त्यांच्यामध्ये स्वावलंबन, स्वयंपूर्णता व आधुनिक ज्ञानाची गोडी निर्माण करण्यासाठी कापसे प्रामाणिक तळमळीने काम करीत आहेत. त्यांच्या या कार्यामध्ये सुविद्य पत्नी सौ. अर्चना कापसे या समर्पित भावनेने साथ देत आहेत. सौ. कापसे यांनी मुख्याध्यापिका म्हणून नेटके व शिस्तबद्ध व्यवस्थापन अंमलात आणले आहे. समाजभूषण शिवाजीराव डिसले यांनी अतिशय कष्टातून विविध उद्योगांची निर्मिती केली. त्यांच्या विचारांचा व कार्याचा वसा आणि वारसा जपण्याची काम या शैक्षणिक संकुल व सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून होत आहे. शिवाजीराव डिसले यांचे आदर्श पुढे नेण्यासाठी त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांची स्मृती चिरंत्तर राहाते आहे हे कौतुकास्पद आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK


# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## संक्षिप्त वृत्त...



### हँडल लॉक केलेली दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

बोळकोटे नगराजवळील वीटभट्टी जवळ हँडल लॉक करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली.प्रवीण दीपक कुंभार (वय-३०,रा. विनायक नगर,सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.२८ डिसेंबर रोजी रात्री सुमारास ही घटना घडली.अनेक ठिकाणी शोध घेतल्यानंतर ४ जानेवारी रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करित आहे. तर दुसरी घटना ही पठाण बाबा दर्ग्याच्या बाहेरील बाजूस सार्वजनिक रोडवर हँडल लॉक करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार अलीम शमशोद्दीन जरतारघर (रा.साखरपेठ,सोलापूर) यांनी दिली आहे.जरतारघर यांनी ३०डिसेंबर रोजी आपली दुचाकी क्रमांक एम.एच.१३ सी.पी .७८३४ ही लॉक करून ठेवली होती.अज्ञात चोरट्याने नजर ठेवून ती मोटरसायकल पळवली. या घटनेचा तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल परिट हे करत आहेत.




### जुना पुना नाका ब्रिजवरील अपघातात एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

सोलापूर मार्केटयार्डाकडून मोहोळकडे आपल्या भावासह दुचाकीवरून जाणाऱ्या दुचाकीस्वारास धडक देऊन व त्याच्या भावाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकाच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हाकिकत अशी की,फिर्यादी मल्लेश श्रीनिवास दिकोंडा (वय-२५,रा.आकाशवाणी केंद्राजवळ,एमआयडीसी सोलापूर) हे आपल्या भावासह दुचाकीवरून २५ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास मोहोळकडे जात असताना जुना पुना नाका ब्रिजवर समोरून येणाऱ्या वाहन चालक सतीश गाडपिले (रा.देसाई नगर,एमआयडीसी,सोलापूर) यांनी आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजी पणाने चालविल्याने फिर्यादी जखमी झाला.तर त्याच्या पाठीमागे बसलेला भाऊ मार लागून गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.घटनेचा तपास स.पो.निरीक्षक पाटील हे करत आहेत.

### माढा प्रेस क्लबच्या सचिवपदी शेखर म्हेत्रे

**माढा, दि. ५ जानेवारी-**



माढा प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी उल्हास सोनार, उपाध्यक्षपदी बाबासाहेब लोंढे यांची एकमताने निवड करण्यात आली. सचिवपदी शेखर म्हेत्रे, खजिनदारपदी राजेंद्र गुंड यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रमोद गोसावी, संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण, मदन चवरे, विजय राऊत), आयुबखान शेख, चारूदत्त माढेकर, हिम्मत जाधव, संदिप शिंदे, अमर गायकवाड, वैभव देशमुख, अक्षय गुंड, विजय चौगुले, समाधान लटके, विजय शिंदे उपस्थित होते.

### आज जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर,दि. ५ जानेवारी-**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार, दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याचीही माहिती कुंभार यांनी दिली.

# पालकमंत्री 'डीपीसी'पुरते मर्यादित नको!

## उपरा पालकमंत्री सोलापूरकरांची अपरिहार्यता; पालकमंत्रीपद औपचारिकते ऐवजी विकासाभिमुख हवे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

सन २०१९ पासून सोलापूर जिल्ह्याला सतर उपरा पालकमंत्री असून यंदाच्या टर्ममध्ये देखील सोलापुरात भाजपाचे पाच आमदार असतानाही मंत्रिमंडळात कोणाची वर्णी न लागल्याने आताही उपरा पालकमंत्री ही सोलापूरकरांची अपरिहार्यता असल्याचे स्पष्ट होत आहे. ठिक आहे, उपरा पालकमंत्री द्यावा परंतु तो केवळ डीपीसी म्हणजेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीपुरता मर्यादित नसावा. सोलापूर आपला जिल्हा नाही म्हणून नियुक्त होणाऱ्या पालकमंत्र्यांनी पालकमंत्रीपदाकडे केवळ औपचारिकता म्हणून न पाहता सोलापूर शहर व जिल्हा विकासाभिमुख पालकमंत्री नियुक्त होणे सोलापूरकरांसाठी खूपच महत्वाचे आहे. कारण गेल्या काही वर्षात सोलापूरला सक्षम राजकीय नेतृत्व नसल्याने विकासाच्या बाबतीत सोलापूर शहर व जिल्हा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये खूपच मागे पडला आहे.

एकेकाळी महाराष्ट्राला एकाचवेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्य देणारा सोलापूर जिल्हा गेल्या काही वर्षात राजकीय नेतृत्व नसलेला जिल्हा झालेला आहे. सन २०१४ ते २०१९ या कालावधीत सोलापूरला दान मंत्रीपदे मिळालेली होती. परंतु या काळात सोलापूर जिल्हाचे नेतृत्व विकसीत झाले नसल्याची शोकांतिका आहे. या कालावधीत सोलापूर जिल्ह्याचे नेतृत्व करणारे नेता पाच वर्षात सोलापूरकरांना मिळणे अपेक्षित होते. पण तसे न झाल्याने पुढील पाच वर्षे आणि आता यंदा देखील सोलापूरला स्थानिक पालकमंत्रीपद मिळालेले नाही. कारण सोलापूरच्या भाजपाच्या पाचपैकी एकाही आमदाराला राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान मिळवता आलेले नाही. किंबहुना सोलापुरातील एकाही आमदाराला



पक्षश्रेष्ठींची मर्जी राखता न आल्याचेच स्पष्ट होते आहे. तर एकनाथ शिंदे सेना आणि अजित राष्ट्रवादी यांना सोलापूर जिल्ह्यातील ११ पैकी एकही विधानसभेची जागा जिंकता आलेली नाही.

विशेष म्हणजे मागील काळात अडीच वर्षे महाविकास आघाडीचे सरकार राज्यात होते. या कालावधीत सोलापूरचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे होते. त्याकाळातही सोलापूरला राष्ट्रवादीने उपराच पालकमंत्री दिलेला होता. राष्ट्रवादीमध्ये अनुभवी स्थानिक आमदार असतानाही त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळवता आले नव्हते अथवा ते सक्षम नव्हते अशीही चर्चा राजकीय वर्तुळात होती. यंदाही सोलापूरला अनुभवी आमदार असतानाही त्यांच्या सत्ताधारी पक्षांनी मंत्रिमंडळात कोणालाही स्थान दिलेले नाही. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद हे भाजपाकडे असून मंत्री चंद्रकांत पाटील अथवा मंत्री जयकुम ार गोरे यांना सोलापूरचे पालकमंत्रीपद मिळेल अशी चर्चा सध्या ऐकिवात आहे. दरम्यान पुण्याचे पालकमंत्रीपद अजित पवार यांना भाजपाने सोडले जाणार असल्यामुळे चंद्रकांत पाटील हेच सोलापूरला पुन्हा पालकमंत्री होतील, अशीही चर्चा आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

सोलापूर शहर व जिल्ह्यातील अनेक विकासकामे प्रलंबित अथवा रखडलेली आहेत. यात प्रामुख्याने उजनी ते सोलापूर समांतर दुहेरी जलवाहिनीचे काम रखडलेले आहे. हे काम झाल्यास सोलापूरकरांचा पाण्याचा वनवास संपण्याची शक्यता आहे. सध्या आठवड्यातून एकदा होणारा पाणीपुरवठा किमान एकदिवसाआड तरी होईल, अशी सोलापूरकरांना अपेक्षा आहे. शहरातील दोन उड्डाणपूलांचे सोलापूरकरांचे अधुरे स्वप्न कधी पूर्ण होणार हे आता कोणी ज्योतिषीही सांगू शकणार नसल्याची दयनिय स्थिती आहे. सोलापूरच्या होटगी रोड विमानतळावरून विमानसेवा सुरु होणार की हे सोलापूरकरांचे दिवास्वप्नच ठरणार याची देखील उत्सुकता ५० लाख सोलापूरकरांना आहे. प्रचंड वाहतुकीची वर्दळ असलेला आसरा रेल्वे पूल रुंदीकरणासह डी-मार्ट ते आतारनगर दुपदरी रस्ता कधी होणार याकडे जुळेसोलापूरकर नजरा लावून बसलेले आहेत. सोलापूर महापालिकेचा कारभार तर रामभरोसे असून स्मार्ट सिटीतून होणाऱ्या आणि झालेल्या कामांचा दर्जा न सांगण्याजोगाच आहे. शहर व हद्दवाढमध्ये अनेक अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे सातत्याने होत असतानाही पालिका प्रशासनाने अक्षम्य दुर्लक्ष आहे. सोलापुरातील भुईकोट किल्ल्यामुळे परिसरातील अनेक इमारतींचा विकास खुंटलेला आहे.

जिल्ह्यातील अनेक सिंचन योजना रखडलेल्या आहेत. मुंबई, पुण्याला मेट्रोसाठी हजारो कोटी रुपये देणाऱ्या सरकारने सोलापूर जिल्ह्यातील अर्धवट सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी काही शे कोटी रुपयांचा निधी दिला तरी ही कामे पूर्ण होणार आहेत. पंढरपूर कॉरिडॉर, नमामी चंद्रभागा, उजनी पर्यटन, उजनी धरणातील गाळ काढणे, जिल्ह्यात अनेक ठिकाणी बॅरेजस उभारून सिंचनक्षेत्र वाढवणे, सोलापूरसह जिल्ह्यातील एसटी बस स्थानकांची सुधारणा करणे, आरोग्य सेवा सुधारणे आदी अनेक विकासकामे करणारा पालकमंत्री सोलापूरकरांना हवा आहे. अन्यथा उपरा पालकमंत्री येणार आणि त्याला सोलापूरचे काहीच सोयरे-सुतक नसणार, केवळ डीपीसी बैठक आणि त्या अनुषंगाने सोपस्कार पार पाडणे यासाठीच पालकमंत्री यंदाही मिळाले तर सोलापूरकर दुदैवीच ठरणार हे मात्र नक्की होय.

### मुख्यमंत्री फडणवीसांनी घ्यावे सोलापूरचे पालकत्व!

सोलापूर शहर व जिल्ह्यातील मतदारांनी भाजपाला भरभरून मतदान केलेले आहे. सोलापूरला उपरा पालकमंत्री मिळणार असला तरी सोलापूरचे पालकत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारल्यास सोलापूरकरांना सक्षम राजकीय वाली मिळणार आहे. सोलापूरची रखडलेली विकासकामे पूर्ण होण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीसांनी संबंधित विभागाच्या वारंवार बैठका घेवून सूचना देणे गरजेचे आहे. सोलापूरच्या पाच भाजप आमदारांनी यासाठी पुढाकार घेवून एकत्रितरित्या मुख्यमंत्री फडणवीसांना साकडे घालण्याची गरज आहे. पण त्यासाठी एकत्र येणे खूप गरजेचे आहे.

# श्री सिद्धेश्वर यात्रेच्या धार्मिक विधीचा प्रारंभ वीरेश गणपती पूजनाने





सोलापूर : श्री सिद्धेश्वर यात्रेची सुरवात सोलापुरातील अष्टविनायक श्री वीरेश गणपती पूजनाने झाली. त्याप्रसंगी मंदिराचे ट्रस्टी व इतर भक्तमंडळी उपस्थित होते. (छाया : नागेश दंतकाळे)

### गड्डा यात्रा निर्विघ्न पार पाडण्याची श्री चरणी प्रार्थना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेच्या धार्मिक विधींची सुरुवात अक्कलकोट रोडवरील पोगुल मळा येथील श्री वीरेश गणपती पूजनाने सुरुवात झाली. यावेळी पुरोहितांच्या मंत्रघोषात श्री गजाननाचे पूजन करण्यात आले. यात्रा निर्विघ्न आणि सुरळीतपणे पार पाडावी. असे मागणी यावेळी श्रींच्या चरणी करण्यात आली. दरम्यान, सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर महाराजांनी सोलापूर शहरात अष्टविनायक स्थापन केले आहेत. श्रीसिद्धेश्वर म हाराजांनी स्थापित केलेल्या अष्टविनायक गणपतींचे पूजन करून गड्डा यात्रेच्या धार्मिक विधींची सुरुवात झाली आहे. याप्रसंगी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे ट्रस्टी नीलकंठ कोनापुरे, गुरुराज माळगे, प्रकाश बिराजदार, सुनील रीक्के, पशुपतिनाथ माशाळ, विलास कारभारी, सुरेश म्हेत्रे आदींसह कमिटीचे पदाधिकारी सदस्य भक्तगण उपस्थित होते.

### ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रा निर्वीघ्न व सुरळीत पार पाडावी यासाठी गणेश पूजन

ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेच्या धार्मिक विधीची सुरुवात श्री वीरेश गणपती पूजनाने झाली आहे. यात्रा काळातील सर्व धार्मिक विधी आणि कार्यक्रम रूढी परंपरेनुसार निर्विघ्न व सुरळीतपणे पार पाडावे अशी प्रार्थना श्री चरणी केली आहे. श्री सिद्धेश्वर महाराजांनी शहरात विविध ठिकाणी अष्टविनायक स्थापित केले असून त्या सर्वांचे पूजन करून यात्रेच्या धार्मिक विधींची परंपरेनुसार सुरुवात करण्यात आली आहे.

**- नीलकंठ कोनापुरे,**
**जेष्ठ सदस्य, सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी**

# शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार जाहीर


विश्वास पाटील


आप्पासाहेब खोत


गोपाळराव देशमुख


प्रमोद जोशी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ जानेवारी-**

श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्ट शंकरनगर, अकलूज यांच्यावतीने सन २०२५ साठी साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल दिले जाणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आले. माजी उपमुख्यमंत्री व ट्रस्टचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सदरच्या पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

यावर्षीचा सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विशेष साहित्य पुरस्कार पानिपतकार विश्वास पाटील यांना जाहीर झाला असून रोख रुपये ५० हजार, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर साहित्यिक पुरस्कार ग्रामीण कादंबरीकार आप्पासाहेब खोत व इतिहासाचे लेखक गोपाळराव देशमुख यांना जाहीर झाला असून प्रत्येकी रुपये २५ हजार, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावर्षीपासून प्रथमच माळशिरस तालुक्यातील साहित्यिकास दिला जाणारा पुरस्कार परिसस्पर्शचे लेखक प्रमोद जोशी यांना जाहीर झाला असून रोख रुपये ११हजार, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार सोहळा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते व सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.१५ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता सहकार महर्षी साखर कारखान्याच्या उदय सभागृहामध्ये संपन्न होणार आहे.

यावेळी मंडळाचे सदस्य ॲड. नितीनराव खराडे-पाटील, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, सेक्रेटरी अभयसिंह माने-देशमुख, सदस्य रघुनाथ माने, तुकाराम जाधव, श्रीमती वसुंधरा देवडीकर, संतोष माने, चंद्रकांत कुंभार, निवड समितीचे प्रा. विश्वनाथ आवड उपस्थित होते.

# कुलगुरुंचा मनमानी कारभार; आधिसभेतला निर्णय फिरविला



**खेळाडूंना आखूड ब्लेजर शिवलेबाबत प्रशासकीय समिती नेमली**

**ठेकेदाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

खेळाडूंना आखूड ब्लेजर शिवलेच्या प्रकरणात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आधिसभेत गठीत झालेली समिती डावलून कुलगुरूंनी स्वतःच्या अधिकारात प्रशासकीय समिती नेमून संबंधित ठेकेदाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे.

क्रीडा दिनानिमित्त आंतर विद्यापीठ स्पर्धेत कामगिरी केलेल्या व सहभागी विद्यापीठाच्या खेळाडूंचा गौरव २९ ऑगस्ट २०२४ रोजी क्रीडा दिनानिमित्त ब्लेजर देऊन केला होता. हे ब्लेझर ८२ खेळाडूंबरोबरच त्यांचे प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक आणि विद्यापीठातील काही अधिकाऱ्यांनाही दिले होते. परंतु हे ब्लेझरच आखूड शिवले होते. याबाबत आधिसभा सदस्य ए. बी. संगवे यांनी २४ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या आधिसभा बैठकीत प्रश्नोत्तराच्या तासात हा प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेनंतर संबंधित ठेकेदारावर काय कारवाई करायची यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. या घटनेला तीन महिने झाले तरीही ही समिती गठीत केल्याचे किंवा समितीची बैठक असल्याचे पत्र संबंधिताना पाठविले गेले नव्हते. या संदर्भात समितीचे सदस्य श्री. संगवे यांनी या समितीची कार्यवाही कुठपर्यंत आली आहे, असे कुलगुरू व कुलसचिव यांना १७ नोव्हेंबर २०२४ रोजी लेखी कळविले होते. तसेच कुलगुरू प्रा. महानवर आणि कुलसचिव योगिनी घारे यांच्याकडे पाठपुरावा केला असता कुलसचिव घारे यांनी अशी माहिती दिली की, समिती स्थापन केली आहे. त्यांनी बैठका घेतल्या आहेत. लवकरच त्यांच्याकडून अहवाल सादर केला जाईल. त्यांना लवकरात लवकर अहवाल देण्याची विनंती केली आहे, असे उत्तर दिले होते. या संदर्भात आधिसभेत प्र. कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड व आधिसभा सदस्य सदस्य संगवे यांची समिती नेमली होती. परंतु अधिसभेत ठरल्याप्रमाणे एकाही समिती सदस्याला या समितीच्या मीटिंग झाल्याचे माहिती नव्हते. प्रत्यक्षात समिती सदस्य असलेले व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. गायकवाड यांनी समितीच्या मीटिंग झाल्याचे खंडन केले होते.

### प्रशासकीय समिती नेमली : कुलगुरू

याबाबत कुलगुरू प्रा. महानवर यांना शनिवारी पत्रकार परिषदेत प्रश्न विचारला असता त्यांनी अशी माहिती दिली की प्रश्नोत्तराच्या तासात झालेली समिती ही नियमाप्रमाणे गठीत होऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही प्रशासकीय समिती नेमली आहे. त्यांच्याकडून माहिती घेतली असता काही ब्लेजर आखूड झाले होते, काही अदलाबदली झाली होती. याची कार्यवाही संबंधित ठेकेदाराने केली आहे.

### ब्लेजर मिळालेल्या सर्व खेळाडूंना कळवा

अधिसभेत झालेला निर्णय बदलणे चुकीचे आहे. ब्लेजर मिळालेल्या सर्व ८२ खेळाडू विद्यार्थ्यांना ब्लेजरबाबत काही तक्रारी असल्यास कळवावे, असे पत्र विद्यार्थ्यांना पाठवले नसल्याचे संबंधित प्रशासकीय समिती सदस्यांच्या निदर्शनास मी आणून दिले आहे. त्यामुळे सर्व ८२ विद्यार्थ्यांना पत्र पाठवा असे मी सांगितले आहे.

**- प्रा. सचिन गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य**

### अधिसभेचा अपमान

आधिसभेने घेतलेला निर्णय नियमाच्या चौकटीत बसत नसेल तर कुलगुरू महोदयांनी हे सभेतच सांगणे गरजेचे होते. नंतर स्वतःच्या अधिकारात प्रशासकीय समिती नेमण्यापेक्षा स्वतःच्या अधिकारात कुलगुरू हीच समिती कायम ठेवू शकले असते. परंतु प्रशासकीय समिती नेमून ठेकेदाराला पाठीशी घालण्याचा त्यांचा प्रयत्न आहे का अशी शंका वाटते. अधिसभेतला निर्णय बदलणे हा समिती सदस्याचा अपमान नसून आधिसभेचा अपमान आहे

**- सिद्धेश्वर स्वामी, अधिसभा सदस्य**

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९९५

**माकडें मुठीसी धरिले फुटाणे ।
गुंतले ते नेणें हात तेथें ।।**

हव्यास आणि चुकीचे आचार-विचार माणसाला केव्हा ना केव्हा तरी अडचणीत आणतात. याची जाण बुध्दीजीवी माणसाला असते. तरीपण जवळपास सर्वच लोक कधीना कधी तरी एखाद्या विषयाच्या हव्यासात किंवा अतिविश्वासात अडकतात किंवा फसतात. एकदा अडकल्यानंतर त्यातून सहजासहजी सुटका होत नाही. विशेष म्हणजे सर्व कांही कळत असतांनाही किंवा आपण चुकीचे करीत असल्याने त्याचा विपरीत परिणाम भोगावा लागणार आहे, याची जाणीव असतांनाही स्वार्थापोटी, हव्यासापोटी माणूस नको त्या संकटात अडकत असतो. पशू-पक्ष्यांना माणसाएवढी बुध्दी किंवा विचार करण्याची शक्ती नसते. त्यामुळे बुध्दीजीवी माणसाच्या तावडीत ते सापडतात. पण बुध्दीजीवी माणूसही स्वत: होऊन बऱ्याचवेळा हव्यासापोटी अडचणीत सापडतो तेव्हा मात्र आश्चर्य वाटते. फाशेपारधी, माकडाला पकडण्यासाठी जमिनीत बारीक तोंड असलेले भांडे अर्धवट उघडे ठेवून पुरतो. माकडाकडे पाहात किंवा माकडाला दाखवित त्या भांड्यात तो शेंगदाणे, फुटाणे टाकतो आणि बाजूला सरकतो. पारधी बाजूला सरकताच माकड झाडावरुन खाली येते आणि त्या घागरीतील/भांड्यातील सर्व शेंगदाणे फुटाणे एकदाच



ताब्यात घ्यावेत म्हणून दोन्ही हात भांड्यात घालते. दोन्ही हात फुटाण्यांनी भरुन ते बाहेर काढण्याचा प्रयत्न करते. हातात फुटाणे असल्याने व मूठ मारल्याने हात बाहेर निघत नाहीत. हात बाहेर निघावेत म्हणून त्याला मुठ सोडून फुटाणे घागरीत टाकावे वाटत नाहीत. त्याचा हव्यास त्याला पारध्याच्या तावडीत देण्यास कारणीभूत होतो. हे सांगताना तुकाराम महाराज म्हणतात,

**माकडें मुठीसी धरिले फुटाणे ।
गुंतले ते नेणें हात तेथें ।।**

माकडाप्रमाणे पोपटालाही असेच पकडले जाते. लहान दोरीतून मोठी नळी घातली जाते. त्या नळीवर खाऊ ठेवला जातो. लालसेने पोपट नळीवर बसतो. पोपट बसताच नळी गर्कन फिरते. पोपट खाली आणि नळी वर होते. आपण खाली पडून मरतो म्हणून त्याला नळी सोडावी वाटत नाही. पंख असूनही किंवा उडता येत असूनही केवळ मूर्ख विचाराने पोपट नळी सोडत नाही. त्याचा परिणाम पारध्याच्या तावडीत सापडण्यात होतो. मानवाचेही असेच आहे. या संसारात तो सर्व माझे-माझे म्हणत असतो. संसारात तो स्वत:ला एवढे गुरफटून घेतो की, त्याला या संसाराला सोडले तर माझे कांहीच खरे नाही असे वाटत असते. शाश्वत काय आहे, हे जाणून घेण्यापेक्षा नाशवंत त्याला त्याचे वाटू लागते. त्याचे हे वाटणे त्याला संसाराच्या मायाजाळात पूर्णत: गुंतवून टाकते. तो स्वत:ला संसारात इतका गुंतवून घेतो की, आपण कोण आहोत? काय करायला हवे? या प्रश्नांची त्याला आठवणही होत नाही. मी आणि माझे म्हणून मारलेली मूठ किंवा संसार नळीवर उलटे लटकणे त्याला महागात पडते. आपण लक्षात ठेवावे की एके दिवशी आपणाला आहे ते सर्व जिथल्या तिथे टाकून काळरुपी पारध्याच्या जाळ्यात त्याला अडकावे लागणार आहे. त्यामुळे आपण बुध्दीजीवी असल्याने आणि संत महात्म्यांचे मार्गदर्शन आपल्यासाठी उपलब्ध असल्याने पशू-पक्ष्यांसारखी वेळ आपल्यावर येता कामा नये. आपल्या जीवनातील आनंदलहरींचा लाभ आपण निश्चीत घ्यायला हवा. आपली सजकता आपणाला आनंदी ठेवण्यास सहायकारी ठरणारी असते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - |
| दि. ६ जानेवारी २०२५ | पत्रकार दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | गुरु गोविंदसिंह जयंती |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. सप्तमी - (१८.२३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशीर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ.भाद्रपदा (१९.०६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (२६.०४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (०७.२०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा.

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धाम ळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. काम काजाचा विस्तार होईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मि ळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. नियंत्रण ठेवा.

# पर्यावरण, शिक्षण, पाणी नियोजन, कौशल्य विकासावर होणार काम




सोलापूर: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी इंगळगीचे राहुल वंजारे आणि केवडचे सरपंच प्रतिनिधी राजेंद्र पाटील यांना दत्तक गाव निवडीचे पत्र दिले.

### सोलापूर विद्यापीठाकडून इंगळगी आणि केवड गाव दत्तक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक गाव योजनेअंतर्गत दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी आणि माढा तालुक्यातील केवड ही दोन गावे दत्तक घेतली आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी दोन्ही गावच्या प्रतिनिधींना निवडीचे पत्र दिले.

या माध्यमातून पर्यावरण, शिक्षण, पर्यटन, महिला सबलीकरण, पाणी नियोजन, कौशल्य विकास अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून गावाचा विकास साधला जाणार आहे. २०२४-२०२५ पासून पुढील तीन वर्षे ही दोन गावे विद्यापीठाने दत्तक घेतलेले असून अशा आशयाचे पत्र दोन्ही गावच्या ग्रामपंचायतींना देण्यात आले आहे. यावेळी प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख डॉ. राजेंद्र वडजे, डॉ.श्रीकांत अंधारे, डॉ.अभिजीत जगताप, कक्ष अधिकारी विजय पाटील, सागर धर्मे आदी उपस्थित होते. इंगळगी ग्राम पंचायतीच्यावतीने राहुल वंजारे यांनी तर केवडतर्फे सरपंच प्रतिनिधी राजेंद्र पाटील, उपसरपंच प्रतिनिधी नितीन पाडुळे, ग्रामपंचायत सदस्य भारत लटके, निलेश लटके,पोपट घुले, विशाल लटके यांनी पत्र स्वीकारले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अ ल क . म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; सम जायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक :- (१०) गंगोत्री

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अरुणोदय आणि अभ्युदयाची गाथा अनेक दृष्टिकोनातून अद्वितीय आहे. इसवी सन १९२५ च्या संघाच्या अरुणोदयाला संघ शाखेत मूर्तरूप नवयुवक येत होते. आज पृथ्वीच्या पाठीवर संघ वटवृक्ष बनला आहे. आज विद्यार्थी असो की शिक्षक, शेतकरी असो की श्रमिक, व्यापारी असो की कारागीर, कर्मचारी असो की उद्योगपती, बुद्धिजीवी असो की श्रमजीवी सारेच जण यात सहभागी झाले आहेत. हा गंगोत्रीचा ओघ दिवसेंदिवस लोकप्रिय होत (६) आहे. कारण संघ चालवत असलेले जनजागरण अभियान. उदाहरणार्थ दैनंदिन शाखेवर ऐतिहासिक पौराणिक लाखो गोष्टी सहज सोप्या शब्दात सांगून खरेपणाची ओळख करून देणे. अशी अनेक उदाहरणे आपण पुढे पाहू. यामुळे मन शुद्ध होतं.

### अलक:- (११) विजयादशमी

संघटन करण्यासाठी शुद्ध राष्ट्रीय संस्कार व परस्परानुकूल स्नेहमयी स्वभाव हा संघटकाचा स्थायी धर्म असावा लागतो. तो परमपूजनीय (प.पू.) डॉक्टरांच्या ठायी होता. स्वधर्माची चाले या उक्तीनुसारच १९२५ च्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर आपल्या घरी पंधरा-वीस जणांना बोलवून डॉक्टरांनी सर्वांना आपण आज संघ सुरू करत आहोत असे सांगितले. व सर्वांनी मान्यता दिली. पुढे डॉक्टरांच्या संस्कारांमुळेच संघ स्थापनेपासून आजपर्यंत अनेक क्षेत्रात म्हणजे बौद्धिक- नैतिक- धार्मिक- सामाजिक- शारीरिक- राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात सिमोल्लंघन प्रयत्नपूर्वक झाले. उदा:- व्यक्तिगत जीवनातून- समष्टी जीवनाकडे; दास्यत्वाकडून स्वातंत्र्याकडे; निद्रेतून- जागृती कडे; दैन्यातून- समृद्धीकडे; दौर्बल्यातून सशक्तीकरणाकडे असे सिमोल्लंघन झाले. मोठ्या प्रमाणावर जनजागरण झाले. गरजेनुसार साध्य सिद्ध सिद्धता झाली. विजयादशमीलाच रामानी रावणाला आपल्या रामबाणाचा प्रताप दाखविला होता. गांडीव धनुष्याचा टणत्कार अर्जुनानी सर्वांना ऐकवला होता. म्हणूनच संघाच्या रूपात बलिष्ठ हिंदू राष्ट्र स्थापनेचा दिवस विजयादशमीच्या सुमुहूर्ताचाच ठरवला. 'भारत माता की जय'

क्रमश:



### चन्नवीर चिट्टे मित्रपरिवीरातर्फे 'योग्यनिर्णय' दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

चन्नवीर चिट्टे मित्र परिवीराच्या वतीने 'योग्यनिर्णय' २०२५ दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. काशिपिठाचे जगदगुरू श्री श्री श्री १००८ श्री मल्लिकार्जुन महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते व भाजपाचे ज्येष्ठ नेते किशोर देशपांडे, नरसिंग मेंगजी, प्रभाकर जामगुंडे, शिवानंद पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

जगदगुरू मल्लिकार्जुन महास्वामीजींनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या व चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या सातत्यपूर्ण सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी म ल्लिनाथ पाटील, कल्याण करजगी, श्रीनिवास दासरी, गुरूनाथ कोळी, रवि शहापूरकर, सद्दाम कोसगीकर, महेश हलसगी, रवि कोळी, पप्पू क्षीरसागर , रेवणसिद्ध बिराजदार, शिवा पाटील, साईनाथ सजे, सोम नाथ कलशेट्टी, श्रीनाथ संदुपटला, राहुल गंगीशेट्टी आदींनी परिश्रम घेतले.

## यमाईदेवी आश्रम शाळेत किशोरी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

पंचायत समिती उत्तर सोलापूर व यम ईदेवी प्राथमिक आश्रम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त उत्तर सोलापूर तालुक्यातील म र्डी येथील यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी येथे तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळावा व बाल आनंद मेळावा पार पडला.

मार्डीच्या सरपंच प्रांजली पवार यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी सैन्य दलातील कॅप्टन महिमा मल्लिनाथ उटगे, प्राध्यापिका डॉ. विजया महाजन, वकील सरोजिनी तमशेट्टी, शिक्षण विस्तार अधिकारी बाबुराव जमादार, यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळेचे अध्यक्ष सुरेखा लांबतुरे, संस्थापक अशोक लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, म हिला बालविकास प्रकल्प अधिकारी प्रतिभा साखरे, समाजसेविका सुवर्णा झाडे खेलबुडे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे डॉ. स्वप्नाली काटे, डॉ. स्वाती बनसोडे, डॉ.सत्यभामा टोणपे, डॉ.अंजली पाटील, किशोरी हितगुज



मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी कुमारी फातिमा इरफान शेख, यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळेची विद्यार्थिनी उपाध्यक्ष कुमारी तनुजा संभाजी थोरात, प्रज्ञा चंदनशिवे, श्रावणी पिटलेवाड, आदी उपस्थित होते.

प्रथम ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या मेळाव्यात ६०० किशोरी उपस्थित होत्या. कार्यक्रमामध्ये योगा प्रकार व प्रात्यक्षिके नागराज यावगल, मनीषा जंगले यांनी करून घेतले. यावेळी कर्तुत्वान महिलांच्या मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला. सांस्कृतिक कार्यक्रम, पोस्टर्स स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्तर सोलापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, विस्तार अधिकारी बापूराव जमादार, संतोष साळुंखे, सिद्राम वाघमोडे, बाबुराव कोळी, मल्लिनाथ निंबर्गी, विकास पाटील, नागराज यावगल, पीरसाहब चौधरी, कळमण केंद्रप्रमुख प्रशांत नीचळ तसेच सर्व विषय साधनव्यक्ती सर्व विषय शिक्षक आय.डी. विभागाचे निलेश शिरवळकर, मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आशा प्रक्षाळे, अमोलिका जाधव यांनी केले तर आभार महताब शेख यांनी व्यक्त केले.

## शेतकऱ्यांच्या मुलांसाठी 'ग्लोबल व्हिलेज'

### स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी दत्ता शिंदे यांचे गौरवोद्गार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून ग्राम ीण भागात सीबीएसई सोबतच नई तालीम व अटल टिंकरिंग लॅबची जोड देऊन ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुल जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे. मी गोकुळ शुगरच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी काम करतो तर ग्लोबल व्हिलेज शेतकरी- शेतम जुरांच्या मुलांसाठी काम करते, असे गौरवोद्गार ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुल, बोरामणीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना गोकुळ साखर कारखाना धोत्रीचे चेअरमन दत्ता शिंदे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. याप्रसंगी व्यासपीठावर सचिवा संगिता



शहा-चनशेट्टी, बोरामणीचे सरपंच प्रा. डॉ. राज साळुंखे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी, खजिनदार सुजाता बादोले, विश्वस्त सरोजिनी कुरुटी, वैशाली चनशेट्टी, राजश्री चनशेट्टी, पालक-शिक्षक संघाचे अध्यक्ष पंडीत मामा आचलेरे, प्राचार्य आसमा नदाफ, प्राचार्य डॉ. शंकर राठोड व पालक शिक्षकसंघाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीगीताने आणि डिजिटल दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी के. ब. ई. चनशेट्टी गुरुजी यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूलचा विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य-नाट्यांनी उपस्थितांची मने जिंकली. आदर्श विद्यार्थी प्रतियोगीता पुरस्कार वितरण दरवर्षी दिला जाणारा के. चि. अथर्व दयानंद झुरळे स्मरणार्थ आदर्श विद्यार्थी पुरस्कार यावर्षी इयत्ता बारावीतील साक्षी भोसले या विद्यार्थीनीला प्रदान करण्यात आला. याप्रसंगी दयानंद झुरळे, कमलाकर भोसले, अरूण शिंदे, रवी म्हस्के, सौ. हाके यांच्यासह सोलापूर, बोरामणी, मुस्ती, तांदुळवाडी, वडजी, देवसिंगा, खानापूर, इटकळ आदी गावातील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रेया अचलारे, श्रेयश पोतदार, श्रेया गुंड, सानिका जगताप व श्रेयश गुंड यांनी केले तर आभार मल्लिनाथ जळकोटे यांनी मानले.

### मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये बालिका दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल मध्ये बालिका दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी शिक्षक घरेप्पा हत्तुरे होते. प्रमुख अतिथी पर्यवेक्षक रमेश दिंडोरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी श्रद्धा केसकर, साक्षी स्वामी, श्रावणी हविनाळे, उमेरा नदाफ, अलिया अगरखेड, गौरी देशपांडे, श्रेयश अरबळे, मदिहा नदाफ, निवा साह या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. प्रास्ताविक राजनंदिनी चव्हाण हिने केले, सूत्रसंचालन पूर्वा शरणार्थी हिने केले तर आभार स्वराली पाटील हिने मानले. यावेळी प्रशालेतील सुकेशनी गंगोडा, दत्तात्रय अगरखेड, अण्णाराया तुप्पद, विद्याधर हुलगेरी, संतोष हिरेमठ, गुरुसिद्धप्पा पाटील उपस्थित होते.

## निर्झरा केअर फाऊंडेशनतर्फे कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

श्रीश्रीश्री १००८ काशी जगद्गुरू मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी, होटगी संस्थान मठ यांच्या आशिर्वादाने निर्झरा केअर फाऊंडेशनच्या वतीने बोरामणी येथील कै. सिध्दाराम व्ही. साखरे यांच्या स्मरणार्थ दि. ११ व १२ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष स्वाती अळ्ळीमोरे (साखरे) यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री सिध्देश्वर आखाडा, किल्ला बाग, पार्क चौक, सोलापूर येते ही कुस्ती स्पर्धा होणार आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी हिंद केसरी व डी. वाय.एस.पी. हिंद केसरी सुनिल साळुंखे, बठाण महाराष्ट्र केसरी पै. समाधान घोडके आदी म ान्यवरांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. विशेष अतिथी म्हणून भाजपा महाराष्ट्र कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, जलसंपदाचे माजी सचिव चन्नवीर बिराजदार, डॉ. शैलेश पाटील, शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे , उद्योजक नितीन बिज्जरगी, आयआरएस मल्लिनाथ जेऊरे, सोलापूर कारागृह अधीक्षक प्रदीप बाबर, डबल उपमहाराष्ट्र केसरी पै. मौलासाब शेख, डबल उप महाराष्ट्र केसरी पै. सत्यवान घोडके, पै. पांडुरंग घोडके, पै. राजाभाऊ देशपांडे, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. रविवार दि. १२ जानेवारी रोजी बक्षिस वितरण समारंभ होणार आहे. यावेळी श्री सिध्देश्वर देवस्थान अध्यक्ष धर्मराज काडादी, हिंद केसरी (गंगावेस तालीम, कोल्हापूर) पै. दिनानाथ सिंह आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे. महिला कुस्तीगीरांच्या प्रेक्षणीय कुस्त्या रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी ४ ते ६ या वेळेत घेण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस सोमनाथ अळ्ळीमोरे, भारत मेकाले, गणेश पाटील आदी उपस्थित होते.

### संप्रदाय जिल्हा सेवा समितीतर्फे रक्तदान महायज्ञ उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जानेवारी-**

अनंत श्री विभुषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज नाणीज धाम, रत्नागिरी, प्रणित स्व-स्वरुप संप्रदाय जिल्हा सेवा समितीच्यावतीने जिल्ह्यात ४ ते १९ जानेवारीपर्यंत रक्तदान महायज्ञ हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणी ३५ रक्तदान शिबीरे आयोजित करण्यात आलेली आहे. या शिबिराच्या माध्यमातून जिल्ह्यातून पाच हजार रक्तदान करण्याचा मानस आहे. जगद्गुरुंनी नरेंद्राचार्य महाराज संस्थेच्यावतीने १९ जानेवारीपर्यंत संपूर्ण देशात रक्तदान महायज्ञ या संकल्पनातून १ लाख रक्तदान करण्याचा संकल्प आहे.

## पांडुरंगाच्या आशीर्वादानेच बनले खासदार : खा. प्रणिती शिंदे

### वारकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे दिले आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जानेवारी**

पांडुरंगाच्या आशीर्वादामुळे मी सोलापूरची खासदार बनले आहे. खासदार झाल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना दिल्ली दरबारी वाचा फोडू असे सांगितले. महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र श्री पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दर्शनाला, दरवर्षी येणाऱ्या वारीला वारकरी, साधू संत, आणि भाविक भक्तांच्या, अडचणी सोडविण्यासाठी सज्ज असून, केंद्र आणि



राज्य सरकारकडे याससंबंधी पाठपुरावा करू, असे आश्वासन खासदार प्रणिती शिंदे यांनी दिले.

अखिल भारतीय वारकरी मंडळ सोलापूर शहर व जिल्हा समस्त सोलापूरकरांच्या वतीने जुनी मिल कंपाऊंड भैय्या चौक येथे अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सुरू आहे. या सोहळ्यास खासदार प्रणिती शिंदे यांनी उपस्थित राहून हभप श्रीगुरु जयवंत म हाराज बोधले महाराज यांच्या सुश्राव्य कीर्तन श्रवणाचा लाभ आणि आशीर्वाद घेतला. त्यावेळी ते बोलत होते. अखिल भारतीय वारकरी मंडळ सोलापूर शहर व जिल्हा यांच्यावतीने या धार्मिक कार्यक्रम ांचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमास खा. शिंदे यांनी भेट देत, अखंड हरिनाम सप्ताह आणि गाथा पारायण धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतला. याप्रसंगी त्यांनी उपस्थित वारकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी अखिल भारतीय वारकरी मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, वारकरी यांच्यासह माजी नगरसेवक मनोज यलगुलवार, विनोद भोसले आदींसह हजारो वारकरी आणि भाविक भक्त उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### सुधाकर कांबळे यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर



**श्रीपूर, दि. ५ जानेवारी-**

श्रीपूर येथील चंद्रशेखर विद्यालय व नारायण काका आगाशे कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक सुधाकर कांबळे यांना प्रहार शिक्षक संघटना सोलापूर यां संघटनेकडून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ज्योतीबा सावित्री गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्कार वितरण सोहळा ४ जानेवारी रोजी सोलापूर येथे शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक येथे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी मंगेश चिवटे, कादर शेख, विठ्ठल ढेपे उपस्थित राहणार आहेत. त्यांचे डॉ. रामदास देशमुख, मुख्याध्यापक पांडुरंग बनसोडे यांनी अभिनंदन केले.



### जेऊर येथे संभाजी ब्रिगेडच्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**करमाळा, दि. ५ जानेवारी-**

जेऊर येथे संभाजी ब्रिगेडच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पुणे विभागीय कार्याध्यक्ष नितीन खटके, निलेश पाटील, अतुल निर्मळ, हेमंत शिंदे, आदिनाथ माने, पिंटू जाधव, सचिन गारुडे, पांडुरंग घाडगे, अजित उपाध्ये, धनंजय गारुडे, सागर बनकर, अविनाश घाडगे उपस्थित होते.



### 'रत्नत्रय'मध्ये फळ वाटपाचा स्तुत्य उपक्रम

**नातेपुते, दि. ५ जानेवारी-**


मांडवे येथील रत्नत्रय शैक्षणिक संकुलात फळवाटपाचा स्तुत्य उपक्रम प्रत्येक शनिवारी राबविला जातो. त्यामुळे लहान मुलांना लहानपणापासून फळे खाण्याची सवय लागावी यासाठी हा स्तुत्य उपक्रम प्रत्येक शनिवारी शाळेमध्ये घेण्यात येतो. नियमित फळांचे सेवन केल्याने पचनशक्ती वाढते, त्याचबरोबर लहान मुलांमध्ये फळे खाण्याची आवड निर्माण होते. यावेळी सहदेव बबन खोमणे, दिनेश जाधव, गीतांजली लवटे, जुलेखा शेख, शिवानी गोसावी, कोमल जाधव उपस्थित होते. मुख्याध्यापक दैवत वाघमोडे यांच्या उपस्थितीत हा उपक्रम राबविला गेला. सूत्रसंचालन दिपाली राऊत यांनी केले.



### कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**बार्शी, दि. ५ जानेवारी-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमत: प्रमुख मान्यवरांचे हस्ते क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले, त्यावेळी भागवत बोबडे, उत्तमराव देशमुख, समाजसेवक सुहास सुतार, संतोष पाटील, सोम नाथ गायकवाड, दशरथ मोरे, किशोर भगत आदी उपस्थित होते. या औचित्याने प्रमुख मान्यवरांनी आपले यथोचित मनोगत व्यक्त केले. ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले.




### कासेगावात सावित्रीबाई जयंती साजरी

**पंढरपूर, दि. ४ जानेवारी-**

कासेगांव येथील दौलतराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन संस्थेचे डायरेक्टर वसंतराव देशमुख यांनी केले. बेसुळके यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी तारळेकर होत्या. यावेळी मुख्याध्यापक लवटे, पर्यवेक्षक करडे उपस्थित होते.




### करमाळ्याचे कवी प्रा. रवींद्र दवणे यांचा पुणे फेस्टिव्हलमध्ये सन्मान

**करमाळा, दि. ५ जानेवारी-**

पुणे येथील एस एम जोशी सभागृह येथे पार पडलेल्या जगातील पहिल्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल २०२५ मध्ये करमाळा तालुक्यातील प्रा. रविंद्र नारायण दवणे यांची निमंत्रित फुले प्रेमी कवी म्हणून निवड झाली. यामध्ये प्राध्यापक दवणे यांची उत्कृष्ट कवी म्हणून निवड झाली याबद्दल त्यांना आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल २०२५ पुरस्कार प्राप्त झाला आला. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील कविता सादर केली. या काव्य संमेलनामध्ये जगभरातील कवींनी सहभाग नोंदवला होता.

## वैराग पोलिस स्टेशन ॲक्शन मोडवर

### व्यसनमुक्ती, वृक्षारोपण अन् अवैध धंदे बंद करण्यावर भर

**नूतन पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांचा नववर्ष संकल्प**

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. ५ जानेवारी-**

वैराग पोलीस स्टेशनला नवीन वर्षात नवीन पोलीस निरीक्षक कुंदन गावडे हे बदलून आलेले आहेत . त्यांनी पदभार घेताच नवीन वर्षात एक चांगला संकल्प केलेला असून व्यसनामुळे नवीन पिढी बरबाद होत असून तरुणांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी प्रत्येक गावात व्यसन मुक्ती मोहिम राबविली जाणार आहे . व्यसनांमुळे अनेक तरुण गुन्हेगारी वृत्तीकडे झुकत असून त्यांच्या संसाराचे नुकसान होत आहे . व्यसनामुळे मन व बुद्धी अकार्यक्षम बनून मानसिक त्रास होतो. तसेच व्यसनांची पूर्तता करण्यासाठी अनेक तरुण विविध गैरमार्गाने पैसे कमाऊ लागलेले असून त्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढू लागले आहे . व्यसन म्हणजे 'विकतचे दुखणे आहे ती शरीराला लागलेली वाळवी सारखी कीड आहे.

वैरागसह ग्रामीण भागात सुरू असलेले दारू मटका, जुगार या सारखे अवैद्य धंदे बंद करणार असून अवैध धंदे करणाऱ्या लोकावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. स्वतः पुढाकार घेऊन वृक्षारोपण करण्यावर भर दिला जाईल. लोकांच्या तक्रारी, भांडण तंटे जाग्यावरच मिटवण्याचा प्रयत्न केला जाईल . यासाठी सर्वांना सोबत घेऊन चांगल्या प्रकारे काम करावे लागणार आहे काम चुकार आणि कामात हयगय करणाऱ्या पोलीसावर देखील कारवाई करण्यासाठी मागे पुढे पाहणार नाही . पोलीस स्टेशन अंतर्गत असणाऱ्या गावातील दोन नंबरचे धंदे बंद केले जातील दारू, मटका, जुगार या सारख्या अवैध धंद्यामुळे गावातील शांतता सुरक्षितता कायदा व्यवस्था धोक्यात आलेली आहे त्यामुळे त्याचा समाज मनावर विपरीत परिणाम होत आहे .






प्रत्येक गावातील अवैध धंदे बंद करण्याच्या सूचना बीट अंमलदार व पोलीसांना देण्यात आल्या आहेत . गावात अवैध धंदे चालू असल्याची तक्रार माझ्याकडे आल्यास त्या बीटच्या पोलीसावर कारवाई करावी लागेल असा इशाराही पोलीसांना दिला आहे.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणार

### सपोनि मनोज पवार यांचा संकल्प

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप, दि. ५ जानेवारी-**

नागरीक, व्यापारी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत असताना शेतीविषयक वाद मिटविण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाणार असल्याची माहिती मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी दिली. नवीन वर्षानिमित्त संकल्प केला असून पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहायक पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर व उपअधीक्षक संकेत देवळेकर यांच्या सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली वर्षभर काम करणार आहे.

ग्रामीण भागात शेतीविषयक सीमा, रस्ता, वहीवाट व वारसा हक्क यासह अनेक तक्रारी असतात. म्हणून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन महसूल विभागाच्या सहकार्याने वाद मिटविणार आहे. शिवाय सेंद्रीय शेतीला प्राधान्य देऊन कार्यशाळा, व्याख्यान, क्षेत्रभेट यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करणार आहे. कृषी क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली सेंद्रीय शेती करण्याकडे युवकांचा कल वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. ग्रामसुरक्षा दल स्थापन करून चोरांपासून गावांचे संरक्षण करण्यासाठी तरूणांचा सहभाग घेणार आहे. वाहतुकीच्या नियम त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणार आहे. प्रत्येक नागरिकाला पोलीस मित्र वाटावे यासाठी विविध माध्यमातून प्रयत्न करणार आहे. व्यापारी, उद्योजक व प्रतिष्ठीत व्यक्तींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणार आहे.



> कायदा व सुव्यवस्थेचे पालन करताना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी बांधावर जाऊन वाद मिटविण्यासाठी व सेंद्रीय शेतीसाठी विशेष प्रयत्न करणार आहे. कृषी क्षेत्रातील पदवीधर व ग्रामीण भागातील शेतीशी नाळ असल्याने शेतीसंवर्धनासाठी विशेष प्रयत्नशील राहणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी रुजावे म्हणून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणार असून प्रत्येक शाळेत महीला सुरक्षितताविषयक कार्यक्रम राबविणार आहे. गावातील तंटे गावात मिटावेत यासाठी तंटाम क्ती अध्यक्ष, पोलीस पाटील व लोकप्रतिनिधी यांचा सहभाग वाढविणार आहे.

## करकंब येथे चौंडश्वरी पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम

### राष्ट्रीय कीर्तनकारांची कीर्तने, महिलांसाठी विविध स्पर्धा, हळदीकुंकू, व्याख्याने, पुरस्कार वितरणांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.५ जानेवारी-**

करकंब प्रतिनिधी:-प्रतिवर्षाप्रमाणे श्री.चौंडेश्वरी पौष पौर्णिमानिमित्ताने श्री.चौंडेश्वरी मंदिर सोमवार पेठ करकंब येथे दिनांक ७ ते १३ जानेवारी या कालावधीत विविध कार्यक्रम ांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये दररोज पहाटे ५:३० देवीची पूजा आणि काकडा,संध्याकाळी ८ ते १० ७ जानेवारी कैलास बुवा खरे मुंबई,८ जानेवारी ख्यातनाम कीर्तनकार प्रशांतबुवा पांडव पुणे,९ जानेवारी श्रीपाद लिंबेकर परभणी,१०जानेवारी ख्यातनाम कीर्तनकार डॉ.अर्वतिका टोळे पुणे,११ जानेवारी नम्रता निमकर यांच्या कीर्तनांचे आयोजन करण्यात आले असून स्मिता आजेगांवकर यांच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे.त्यांना तबला ज्ञानेश्वर दुधाणे,हार्मोनियम साथ राम अनवते करणार आहेत.९ जानेवारी रोजी कोष्टी समाज युवकांच्यावतीने बनाळी येथून ज्योत आणण्याचे आयोजन करण्यात आले असून या ७दिवसांच्या कालावधीमध्ये दुपारी २ते४ या वेळेत करकंबमधील सर्व म हिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये संगीतखुर्ची,पाककला ,वेशभूषा,झटपटस्पर्धा,ताकधिनाधिन,रांगोळ ी इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.१३ जानेवारी रोजी श्री.चौंडेश्वरीमातेची पालखी मिरवणूकीने या महोत्सवाची सांगता होणार असून या सर्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण समारंभ,हळदीकुंकू,तिळगुळ वाटप,महिलांसाठी प्रशांत सरुडकर यांचे मार्गदर्शक व्याख्यान,करकंब कोष्टी समाज भूषण पुरस्कार प्रभाकर टेके, कै.पंढरीनाथ दुधाणे स्मृती शिक्षण पुरस्कार शिक्षणाधिकारी (योजना)सुलभा वटारे अकलुज,कै.गोरख रामचंद्र इदाते स्मृती उद्योगरत्न पुरस्कार अतुल बावकर (नातेपुते) असे विविध पुरस्कार पुरस्कारप्राप्त व्यक्तींना विविध मान्यवरांच्या उपस्थितीत १९ जानेवारी रोजी सा.५ वा.प्रदान करण्यात येणार असून या सर्व कार्यक्रमांना महिला,करकंबकर ग्रामस्थ,कोष्टी समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री.चौंडेश्वरी मंदिर कोष्टी समाज ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद उकरंडे,सचिव विजय भागवत,सदस्य,समाज बांधव यांच्यावतीने करण्यात आले आहे.हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व समाज बांधव अधिक परिश्रम घेत आहेत.

## डॉ.मनोज भायगुडे यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.५ जानेवारी-**

श्रीनाथ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिका भंडीशेगाव च्या माध्यमातून देण्यात येणारा स्वामी विवेकानंद पुरस्कार पंढरपूर येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. मनोज भायगुडे यांना जाहीर झाल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीधर यलमार यांनी सांगितले.



भारत सरकारच्यावतीने जम्मू काश्मीर या राज्यातील दुर्गम भागात आरोग्य शिबीराचे आयोजन केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त करण्यात येते. संवेदनशील राज्यात जाऊन आरोग्य सेवा बजावणारे डॉ. भायगुडे यांना माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते ११ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून यावेळी स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालयाचे उद्घाटनही आहे. पंढरपूरचे प्रसिद्ध त्वचारोग तज्ञ अरुण मेणकुदळे, डॉ.सचिन लादे,पुणे येथील उद्योजक अम ोल येलमार,बाळासाहेब लोकरे, संजय येलपले आदी उपस्थित राहणार आहेत.

## कै. बाबुराव डिसले स्मृती जीवन पुरस्काराचे आज वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग दि. ५ जानेवारी -**

सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळ आयोजित कै. बाबुराव डिसले स्मृती जीवन पुरस्कार व कै.शिवाजीराव डिसले स्मृती जीवनगौरव पुरस्कार विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना गेल्या २१ वर्षापासून दिले जातात. यावर्षी सन २०२४- २५ च्या पुरस्काराचे वितरण अर्णव शिक्षण संकुल सासूरे फाटा वैराग येथे आज दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह प्रमाणपत्र शाल श्रीफळ व बुके असे आहे. कै शिवाजीराव डिसले यांच्या ७१ व्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत

पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार जयंत आसगावकर यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध सिने नाट्य अभिनेता शंतनू मोघे आणि सुप्रसिध्द सिने नाट्य अभिनेता अजय तपकिरे, माध्यमिक शिक्षण धिकारी सचिन जगताप, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, शिक्षण उपनिरक्षक रावसाहेब मिरगणे गट शिक्षणाधिकारी, बालाजी नाटके, प्राचार्य रवि कापसे, माजी सभापती अनिल डिसले या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

सामाजिक पुरस्कार- नागनाथ म ल्लिकार्जुन उंबरे, बावी, शैक्षणिक पुरस्कार - विलास पांडुरंग मिरगणे मळेगाव, क्रिडा पुरस्कार दिपक दत्तात्रय चिकणे, सोलापूर, साहित्य पुरस्कार सोमनाथ टकले, समाज सेवा पुरस्कार राहूल घोका, महिला भूषण पुरस्कार-शुभदा देशपांडे , सांस्कृतिक पुरस्कार-दिपक नलवडे, पत्रकारिता पुरस्कार-संजय बारबोले, अध्यात्मिक पुरस्कार-हभप राजन महाराज काशीद , उद्योजक पुरस्कार-तुषार भोसले, कला पुरस्कार - प्रदीप काळे, उद्योजिका शुभांगी भोसले.

## सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचे बार्शी हाफ मॅरेथॉन स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ जानेवारी-**

हेल्थ क्लब बार्शी, लायन्स क्लब बार्शी व बार्शी रनर्स क्लब यांनी बार्शी हाफ मॅरेथॉन (रन फॉर बार्शी... रन फॉर हेल्थ) ही स्पर्धा ५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सोजर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाविद्यालयाच्या बी फार्मसी द्वितीय वर्षातील विद्यार्थी पवन विलास सुरवसे यांनी २१ किलोमीटर धावणे या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला आहे.

सोजरफार्मसीमहाविद्यालयविद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना आणि कौशल्यांना प्राधान्य देत असते. शारीरिक तंदुरुस्ती कायम ठेवण्यासाठी आणि जीवनशैली आरोग्यपूर्ण बनवण्यासाठी ॲथलेटिक्सचा मोठा वाटा आहे. ॲथलेटिक्समुळे केवळ शरीर निरोगी राहते असे नाही, तर मानसिक तणावही कमी होतो. नियमित व्यायाम आणि ॲथलेटिक्समुळे वजन नियंत्रणात राहते, हृदयाची कार्यक्षमता सुधारते आणि ऊर्जा पातळी वाढते. असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी व्यक्त केले. स्वतः प्राचार्य यांनीही २१ किलोमीटरची हाफ मॅरेथॉन स्पर्धा पूर्ण केली व सर्वांना हेल्दी व निरोगी राहण्यासाठी उस्फूर्त केले. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. शशिकांत मोडेकर, अखलाक शेख यांनीही या स्पर्धेमध्ये ५ किलोमीटर पळण्याचे आव्हान पूर्ण केले. संस्था अध्यक्ष श्री. अरुणदादा बारबोले व महाविद्यालयातील कर्मचारी श्री. दिनेश गारमपल्ली, असिफ आतार, सौरभ सुरडकर व निरंजन टिकटे यांनी उपस्थित राहून सर्वांना प्रोत्साहन दिले.






या स्पर्धेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य प्रा. रणजीत शेळके यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल म हाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष अरुण बारबोले आणि सचिवा कल्पना बारबोले यांनी विद्यार्थ्यांच्या या यशाचे कौतुक केले.


## डॉ. वेदपाठक, डॉ. चव्हाण, संगीता जाधव यांच्या जलप्रदूषण स्त्रोतशोधक यंत्र रचनेस पेटंट मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ५ जानेवारी-**

पेटंट कार्यालय, भारत सरकारच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे डॉ. बलभिम चव्हाण, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फ ूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी महिला महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर येथील संगीता जाधव आणि सोलापूर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य मंगळवेढ्याचे डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांच्या जलप्रदूषण स्त्रोत शोधणाऱ्या यंत्राच्या नवीन रचनेच्या शोधास भारत सरकारचे पेटंट मंजूर झाले असून त्यांना सदरचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.







जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रत्यक्षदर्शी स्त्रोत शोधण्याच्या या यंत्राच्या रचनात्मक निर्मितीचा दावा केलेल्या भागामध्ये रसायने, जड धातू आणि जैविक विषारी पदार्थ व अन्य घटक यासारखे प्रदूषक शोधणारे सेन्सर आणि भौगोलिक स्थान निश्चित करण्यासाठी एक जीपीएस मॉड्यूल यांचा समावेश आहे. सेन्सर माहिती सकलकावर सूक्ष्म नियंत्रकाद्वारे प्रत्यक्षदर्शी वेळेत परिगणन व विश्लेषण प्रक्रिया केली जाते. त्यातुन प्रदूषकांचे प्रकार आणि स्थळ एकाग्रतेचे विश्लेषण करते. हे उपकरण विविध प्रकारच्या जलप्रणालीमध्ये तैनात केले जाऊ शकते. ते विविध ठिकाणी पाण्याचा नमुना घेण्यासाठी प्रत्यक्षदर्शी व्यक्तिगत ठेवता येते. या यंत्राद्वारे संकलित केलेल्या माहिती संचाद्वारे केंद्रीय देखरेख प्लॅटफॉर्मवर वायरलेस पद्धतीने प्रसारित केला जातो. त्यामुळे विविध प्रकारच्या जलप्राधिकरणांना प्रदूषण पातळीचे दृश्यमान मापन करता येते. आणि त्याचा मूळ स्त्रोत ओळखता येतो.

हे उपकरण हाताळण्यासाठी अत्यंत सुलभ, लघू आकाराचे, सौरऊर्जेवर चालणारे आणि नद्या, तलाव किंवा औद्योगिक पाणी सोडण्याच्या ठिकाणी वापरण्यासाठी डिझाइन केलेले आहे. प्रत्यक्षदर्शी वेळेत माहितीतून इंटरनेट ऑफ थिंग्ज हे नेटवर्क व हे यंत्र यांना इंटरनेटच्या माध्यमातून माहिती संकलन प्रकरण व प्रसारणासाठी देवाणघेवाण करण्यास मदत करतात. ही उपकरणे सेन्सर, सॉफ्टवेअर आणि इतर तंत्रज्ञानासह जोडल्यामुळे ते अचूक प्रदूषण स्रोत शोध घेण्यात सक्षम सुविधा प्रदान करून जलद उपाय कृती आणि सुधारित पाणी व्यवस्थापन करण्यास मदत करते. हे उपयुक्त संशोधन आधारित पेटंट प्राप्त केल्याबद्दल डॉ. बलभिम चव्हाण, संगीता जाधव आणि डॉ. मंगेश वेदपाठक यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## स्वा.सावरकर मुक्तद्वार वाचनालनाच्यावतीने खास महिला व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.५ जानेवारी -**

येथील सावरकर प्रेमी मंडळ पंढरपूर, संचलित स्वा. सावरकर मुक्तद्वार वाचनालनाच्या वतीने खास महिला व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सावरकर प्रेमी मंडळाचे अध्यक्ष मोहन मंगळवेढेकर यांनी दिली.

या व्याख्यानमाले संदर्भात माहिती देताना अध्यक्ष मंगळवेढेकर यांनी सांगितले की, येत्या रविवारी दि. ५ जानेवारी ते बुधवार दि.८ जानेवारी या कालावधीत दररोज सायंकाळी सहा वाजता स्वा.सावरकर क्रांतीमंदिर, सावरकर पथ, पंढरपूर येथे या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या व्याख्यानमालेत सोमवारी (ता.६) प्रा. मेघा दाते या बोलू ऐसे वेदु या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. सौ.शेरॉन भोपटकर यांचे मंगळवारी (ता.७) मन वढाय, वढाय या विषयावर व्याख्यान आयोजिण्यात आले आहे. या शिवाय बुधवारी (ता.८) शर्मिला देशपांडे, श्रीहरी कुलकर्णी आणि सहकलाकार यांचा स्वरचैतन्य संगीत समूह गीत गायन हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष, मोहन मंगळवेढेकर डॉ. वर्षा काणे, प्रा.मेघा दाते, राधिका उत्पात, श्रीमती ज्योती कुलकर्णी यांनी केले आहे.

## भारत विकास परिषदेतर्फे पर्यावरण दिंडी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ जानेवारी-**

भारत विकास परिषदेतर्फे नवीन वर्षाची सुरवात पर्यावरण दिंडीने करण्यात आली. या पर्यावरण दिंडीत येथील आपटे उपलप प्रशाला आणि महिला मंडळ प्राथमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.




लहान मुलांना पर्यावरणबाबत जनजागृती व्हावी यासाठी या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती भारत विकास परिषदेचे अध्यक्ष मंदार लोहोकरे यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या दिंडील सुरुवात झाली. दोन्ही शाळेतील जवळपास १६५ विद्यार्थी या दिंडीत सहभागी झाले होते. मुलांना पर्यावरण विषयी माहिती व्हावी आणि भविष्यात येणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी जनजागृती व्हावी हा उद्देश ठेवल्याचे भारत विकास परिषदेचे सचिव डॉ. अनिल पवार यांनी सांगितले. आभार कोषाध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी मानले. यावेळी भारत विकास परिषदेचे अध्यक्ष मंदार लोहोकरे, सचिव डॉ. अनिल पवार, कोषाध्यक्ष अजित कुलकर्णी, सदस्य रोहिणी कोर्टीकर, राजेंद्र केसकर, जयंत हरिदास, जगदीश टाक, स्वानंदी काणे, नीलम माळी, सुजाता पवार, विवेक परदेशी आदी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### क्रीडाशिक्षक योगेश उपळकर यांना जोतिबा-सावित्री गुणवंत पुरस्कार

**बार्शी, दि. ५ जानेवारी-**

महाराष्ट्र विद्यालय बार्शी या ठिकाणी कार्यरत असलेले क्रीडाशिक्षक योगेश सुभाष उपळकर यांना प्रहार शिक्षक संघटना सोलापूर यांच्यावतीने देण्यात येणारा ज्योतिबा-सावित्री गुणवंत शिक्षक पुरस्कार शिवस्मारक सभाग्रह सोलापूर या ठिकाणी देण्यात आला. हा पुरस्कार शिक्षणाधिकारी सचिन जगताप, मंगेश चिवटे व सचिन नागटिळक या मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी उपळकर परिवार व विद्यालयाचे पर्यवेक्षक सुरेश महामुनी,खंडेराव मदने, सुहास वाघमारे, पुष्कराज पाटील, मनोज मिरगणे, हनुमंत चव्हाण, महेश माने, महेंद्र पाटील, सुरेश डिसले, विजय अनभुले, अतुल नलगे, सिद्धेश्वर शिंदे, जयप्रकाश कोरे, पंकज ठाकरे, अनिल लटके,प्रशांत बारंगुळे, योगेश पाटील उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल योगेश उपळकर यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी.पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ मिराताई यादव, एस.बी. शेळवणे, प्राचार्या के.डी.धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे यांनी अभिनंदन केले.



### जिल्हास्तरीय शालेय मॉन्टेक्स क्रिकेट स्पर्धेमध्ये आर्या स्कूलचे यश

**माढा, दि. ५ जानेवारी-**

विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टें) संचलित, आर्या पब्लिक स्कूल, माढा सीबीएसई मान्यताप्राप्त स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद ,सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने मोडनिंब येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय मॉन्टेक्स क्रिकेट स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेमध्ये कर्णधार आर्यन धायगुडे, ओम गोरे, विघ्नेश साठे, अर्जुन जाधव, आयुष पोपळजकर, रुद्र लटके, भूषण बोबडे, अथर्व कोल्हे, शौर्य तांबिले, हर्षवर्धन भांगे, श्रीपाद मुलादे, रुद्र भाकरे, समर्थ लोंढे, सूर्या सुरवसे, प्रथमेश कुलकर्णी, शिवतेज चवरे या खेळाडूंचा समावेश होता. या सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक शुभम पुरवत यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनराव शिंदे, सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीत शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे, प्राचार्य सागर थोरात, अरुण माने, तुषार तोडकरी यांनी अभिनंदन केले.

### किशोरी हितगुज मेळावा उत्साहात

**अक्कलकोट, दि. ५ जानेवारी-**

पंचायत समिती शिक्षण विभाग अक्कलकोट आयोजित तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळावा संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा खानापूर नवीन येथील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी दुल्हन अमिन पटेल हिने भुर्षाविले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन दुल्हनच्या हस्ते करण्यात आले. नवभारत साक्षरता अभियान याचे उद्घाटन रिबीन कापून करण्यात आले. यावेळी अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी सोमेश्वर स्वामी, ॲड. सविता बाके, ॲड . कल्ले , पार्वतीबाई जम्पले, काशीराया पाटील, म्हेत्रे, शिक्षक संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड, मुख्याध्यापक संजय उंबरजे, सुरेश गायकवाड, अमिन पटेल उपस्थित होते.

### उजनीतील वाळू चोरी प्रकरणात मधुकर महाडिक यांची निर्दोष मुक्तता

**टेंभूर्णी, दि. ५ जानेवारी-**

उजनी धरणातील वाळू चोरी प्रकरणातील आरोपी पंडित मधुकर महाडिक याने आपल्या मालट्रक नंबर चक ४५/०५१८ मध्ये उजनी जलाशयातील ३ ब्रास वाळू त्याची किंमत अंदाजे ३०.०००/रु ची अवैधरित्या, शासनाची कोणती हि परवानगी न घेता तसेच रॉयल्टी न भरता वाहतूक करून घेवुन जात असताना मिळून आला म्हणुन त्याचे विरुद्ध भारतीय दंड सहिता कलम ३७९ व पर्यावरण अधिनियम कलम १५ प्रमाणे फिर्याद स्वप्निल सोनटक्के (तलाठी) यानी टेंभुर्णी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर २५२/२०१९ द्वारे गुन्हा नोंद केला होता. या मध्ये तपासी अधिकारी म्हणून गूटाळ यांनी काम पाहिले होते. प्रस्तुत प्रकरणात ०५/०८/२०२४ रोजी आरोपीवर दोषारोप ठेवण्यात आले होते. अभियोग पक्षाच्या वतीने ४ साक्षीदार तपासण्यात आले होते, आरोपीच्या वकिलांचा अंतिंम युक्तिवाद ग्राह्य धरून व अभियोग पक्ष दोषाआरोप सर्व संशया पलीकडे सिद्ध करण्यास अपयशी ठरल्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. संपूर्ण प्रकरण हे मा. पिठासिन अधिकारी न्यायाधीश जी.व्ही.गांधे साहेब याच्या कोर्टात चालले. आरोपी पंडित महाडिक याच्या वतीने ॲड. रणजित हरिदास पाटील यानी काम पाहिले.

## बार्शीतील आर्यन शुगर मालमत्ता तारण प्रकरणात ४२ कोटींचा गैरव्यवहार

**● तत्कालीन संचालक व बँक अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बार्शी येथील मार्केट यार्ड शाखेतील आर्यन शुगर प्रा. लि. या साखर कारखान्याशी संबंधित मालतारण कर्ज प्रकरणात तब्बल ४२.२५ कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणुकीचे प्रकरण उघडकीस आले आहे. यामध्ये कारखान्याचे तत्कालीन संचालक आणि बँकेच्या तत्कालीन शाखाधिकारी व इन्स्पेक्टर यांच्यावर गंभीर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले आहेत.



फिर्यादीत म्हटले आर्यन शुगर प्रा. लि. या साखर कारखान्यास २०१२ -१३ च्या गाळप हंगामासाठी बँकेकडून मालतारण कर्ज मंजूर करण्यात आले होते. प्रारंभी ३५ कोटींचे कर्ज मंजूर झाले होते, तर नंतर वाढीव २० कोटी मंजूर करुन एकूण ५५ कोटींचे कर्ज वितरित करण्यात आले. हे कर्ज कारखान्यातील साखरेचे तारण ठेवून मंजूर करण्यात आले होते. कर्ज मंजुरीच्या अटींनुसार, साखरेची विक्री केल्यानंतर मिळालेली रक्कम बँकेच्या मालतारण कर्ज खात्यात भरणे आवश्यक होते. मात्र, बँकेच्या गोडाऊनकिपरच्या परवानगीशिवाय साखर विक्री केली गेली. साखरेच्या विक्रीतून मिळालेल्या रु. ४८.२७ कोटींपैकी फक्त रु. १२.९९ कोटी मालतारण कर्ज खात्यात भरले गेले, तर उर्वरित रक्कम इतर कर्ज खात्यांमध्ये वळविण्यात आली. या प्रकरणात कारखान्याचे तत्कालीन संचालक योगेश सोपल, विलास रेणके, सुधीर सोपल, अलका सोपल, उज्वला सोपल, अविनाश वसंतराव भोसले ,श्रीकांत गोपाल नलवडे , राजु वसंतराव भोसले आणि बँकेचे तत्कालीन शाखाधिकारी आर.एस. उंबरदंड आणि बँक इन्स्पेक्टर व्ही.एस. आगलावे यांनी संगनमत करुन बँकेला तब्बल ४२.२५ कोटींचे नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणात भारतीय दंड विधानाच्या कलम ४२० (फसवणूक), ४०८, ४०९, १२० ब आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बँकेच्या अहवालानुसार ४२.२५ कोटी रुपयांचे कर्ज परतफेड झालेले नाही, तसेच व्याजासह मोठे नुकसान बँकेला सोसावे लागले आहे. संशयित आरोपींनी कर्जाच्या अटी धाब्यावर बसवून इतर कर्ज खात्यांमध्ये रक्कम वळविली, तसेच साखरेचे तारण चुकीच्या पद्धतीने विक्री करुन फसवणूक केली आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखाधिकारी राहुल खुने यांनी या प्रकरणी अधिकृत शहर पोलिसांत तक्रार नोंदवली असून, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला आहे.

## स्वच्छ व सुंदर अक्कलकोट तीर्थक्षेत्र संकल्पना कागदावरच

**● नगरपालिकेचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष; नागरिकांमधून संताप**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ५ जानेवारी-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोटी भाविकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ वाढत असल्याने सार्वजनिक स्वच्छता आरोग्य पाणी विज या सेवेवर ताण पडत आहे. मात्र सार्वजनिक स्वच्छतेकडे पालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. सुभाष गल्ली, जुना अडत बाजार, लक्ष्मी मंडई, शास्त्री गल्ली येथे रस्त्यावर कचरा येत आहे तो वेळेवर उचलला जात नाही यामुळे नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे स्वच्छ सुंदर अक्कलकोट तीर्थक्षेत्र संकल्पना कागदावरच राहत आहे.



अक्कलकोट तीर्थक्षेत्री भाविकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे यामुळे बसस्थानक समाधी मंदिर बुधवार पेठ वटवृक्ष स्वामी मंदिर परिसर गुरु मंदिर भारत गल्ली भागात स्वच्छता वारंवार बाधीत होते. पण सुभाष गल्ली लक्ष्मी भाजी मंडई शास्त्री गल्ली आदि भागात भाविकांची वर्दळ मोठी नाही शास्त्री गल्लीत गटार तुंबल्या आहेत. साफ सफाई झाली नसल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शास्त्री गल्ली सुभाष गल्ली लक्ष्मी भाजी मंडई नपा शाळा सेंट्रल स्कुल मागे कचरा उचलला जात नाही तो रस्त्यावर येत आहे लक्ष्मी भाजी मंडई जवळील प्रसाधन गृह एवन चौक येथील प्रसाधन गृह स्वच्छता नाही यामुळे नागरी कातुन संताप व्यक्त होत आहे भाविक चुकुन जरी स्वच्छता गृहात प्रवेश केला तर त्यांनां मोठा पश्चाताप होतो. यामुळे अक्कलकोट नपा च्या आदर्श कार्याची लक्तरे वेशीवर येत आहेत अर्शा प्रतिक्रिया प्रितेश किलजे यांनी व्यक्त केली.

## माढ्याच्या अभिजित पाटीलचे यूपीएससीत यश

**इन्फोर्समेंट अधिकारी म्हणून झाली निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ५ जानेवारी-**

लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या युपीएससीच्या इफोर्समेंट ऑफिसर क्लास १ परीक्षेत माढा तालुक्यातील लव्हे येथील अभिजित हेमंत पाटील यांनी देशात ९ वा रैंक मिळवत यश मिळवले.अभिजीत पाटील याने पहिल्याच प्रयत्नात यश मिळवत इन्फोर्समेंट ऑफिसरपदी निवड झाली आहे.

अभिजीत यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत सदाशिवराव माने विद्यालय अकलूज येथे त्याचबरोबर इयत्ता अकरावी व बारावी शिक्षण शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश मीडियम स्कूल धवलनगर येथे आणि नंतर बीएससी (ॲग्री) कृषी महाविद्यालय पुणे येथे पूर्ण केले. कोरोना काळात देखील तो यूपीएससी तयारी करत दिल्ली येथे राहण्याकरिता गेला. त्याने मागील २-३ वर्षांत तीन परीक्षांमध्ये यश संपादन केले. सध्या तो दिल्ली येथे ट्रेनिंग घेत असताना लोकसेवा आयोगाचा निकाल लागला आणि यूपीएससीकडून घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षामधून एनफोर्समेंट ऑफिसर म्हणून निवड झाली. केंद्र सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या अंमलबजावणी अधिकारी पदी काम करण्याची संधी अभिजीत पाटील यांना परीक्षेद्वारे मिळाली आहे.



> अभ्यासात सातत्य आणी प्रयत्नांची पराकाष्टा केल्यामुळे मी पहिल्याच प्रयत्नात युपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालो. ग्रामीण भागातील तरुणांनी सोशल मिडीयापासून बाजूला राहून उचित ध्येय गाठावे.
>
> **- अभिजित पाटील**



### खेळ पैठणीचा स्पर्धेत विद्या घायतिडक ठरल्या होम मिनिस्टरच्या मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग दि. ५ जानेवारी,**

वैरागमधील सासुरे फाटा येथील अर्णव शैक्षणिक संकुलात शनिवारी सायंकाळी क्रांतीनाना व सह्याद्री मळेगावकर यांच्या सादरीकरणातील होम मिनिस्टर कार्यक्रम पार पडला. खेळ पैठणीचा मध्ये काळेगावच्या विद्या घायतिडक या प्रथम क्रमांकाच्या विजेत्या ठरल्या असून त्यांना फ्रीज देण्यात आले.

कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका अर्चना डिसले-कापसे, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ आदमाने, संतोष दराडे, समाधान खेंदाड, भैरवनाथ देशमुख यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. शुभांगी पाटणे वॉशिंग मशिन जिंकून दुसऱ्या क्रमांकाने विजयी ठरल्या. भाग्यश्री गायकवाड, पूजा जीवन करंडे व पल्लवी नंदू जाधव यांना तिसरे, चौथे व पाचवे बक्षीस म्हणून अनुक्रमे एलइडी, कुलर व मिक्सर भेट देण्यात आले. बबीता आवारे यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. यावेळी चेतन पाटील, विजय लांडगे यांची उपस्थित होते.




### बचेरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी जयवंत भिसे

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ५ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील बचेरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच महादेव बरकडे यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्यानंतर रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठी सरपंच राणीताई गोरड यांच्या अध्यक्षतेखाली सर्व ग्राम पंचायत सदस्यांची ग्रामपंचायत कार्यालयात बैठक बोलाविणयात आली होती.

यावेळी उपसरपंच पदासाठी जयवंत भारत भिसे यांचाच एकमेव अर्ज आला होता.सदरचा अर्ज छाननीमध्ये मंजुर करणयात आला. यामुळे उपसरपंच पदी त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी निवडणुक निरीक्षक म्हणून माळशिरस पंचायत समितीचे विस्तार अधिकारी सुनिल जाधव यांनी तर निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन सरपंच राणीताई गोरड यांनी काम पाहीले तर सहहयाक म्हणून ग्रामसेवक बालम कोरबु यांनी काम पाहीले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य महादेव पाटील, मोहन शिकारे, महादेव बरकडे, जयवंत भिसे, पुजा थिटे यांच्यासह प्रा शंकर शिंदे, सूदाम शिंदे, विश्वजित गोरड, राजु गटकुळे, सोमनाथ गाढवे, सुधिर पाटील, सुनील माने, नारायण खरात, वामन माने, संभाजी शिंदे, नारायण शिंदे, बाबुराव गोरड उपस्थित होते.

### तालुका स्तरावरील लोकशाही दिन सुरु करा

**ग्राहक पंचायतीची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जानेवारी -**

जिल्ह्यात तालुका स्तरावरील तहसील कार्यालय, पंचायत समिती, तसेच महानगरपालिका, नगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन सुरू करावेत, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने जिल्हाधिकारी यांचेकडे पत्राद्वारे केली असल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.



प्रत्येक महिन्यात पहिल्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरावरील लोकशाही दिन नियमित सुरू आहे. मात्र सर्वांना जिल्ह्याचे मुख्यालय ठिकाणी उपस्थित राहून आपल्या अडचणी मांडणे वेळ व आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही हे लक्षात घेऊनच शासनाने तालुकास्तरावरील लोकशाही दिन सुरू करण्याचे आदेश काढले आहेत. त्यामुळे प्रत्येक महिन्यात पहिल्या शुक्रवारी पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी यांनी तक्रार निवारण दिन घ्यावा, तिसऱ्या सोमवारी तहसीलदार यांनी त्यांचे कार्यालयात लोकशाही दिन, तसेच महानगरपालिका, नगरपालिका स्तरावरही लोकशाही दिन घेण्याचे आदेश आहेत. त्याची जिल्ह्यात अंमलबजावणी होत नाही. ती नियमित व्हावी जेणेकरून नागरिकांच्या अडचणी, समस्या तात्काळ सुटतील व शासनाचा हेतू सफल होईल, अशी अपेक्षा प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी व्यक्त केली आहे.



### लोकसेवा शाळेत फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ जानेवारी,**

येथील लोकसेवा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्म दिन बालिकादिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य बसवराज कुमठेकर होते.


पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत राणी अडवीतोटे, श्रृती फुलारी, ज्योती जोडमोटे, मोनाली साठे या शिक्षिकेंच्या तसेच सावित्रीच्या लेकी बनलेल्या मुलींच्या हस्ते सावित्रीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी धनश्री कुमठेकर, तन्वी राठोड विद्यार्थिनींचे आणि श्रृती फुलारी, मोनाली साठे यांची भाषणे झाली. यावेळी स्वराली पाटील, तन्वी राठोड, समृद्धी स्वामी, कादंबरी काळे, प्रियंका कुंभार या सावित्रीच्या लेकींच्या वेशभूषेत येऊन शोभा वाढविल्या. प्रास्ताविक धानप्पा बगले, सूत्रसंचालन सुभाष सुतार तर आभार बसप्पा घाटे यांनी मानले.

## पंढरपूर न.प.मधील १३ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्तीचे आदेश

**● डॉ. पी.पी. वावा यांनी घेतला सफाई कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी बाबत आढावा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ डिसेंबर -**

पंढरपूर नगर परिषदमधील १३ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्तीचे आदेश देण्यात आले. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग नवी दिल्ली चे सदस्य पी. पी. वावा यांनी दिनांक ३ ते १० जानेवारी महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये जाऊन नगरपरिषदांना भेटी देऊन राज्यातील सफाई कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न आणि अडचणीवर चर्चा करणे बाबत दौरा आयोजित केला आहे.



यावेळी डॉ. पी.पी. वावा सदस्य राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग यांचे सल्लागार गिरी नाथ व संदीप चरण, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव, उपमुख्याधिकारी ॲड. सुनील वाळूजकर, नगर अभियंता नेताजी पवार, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे व नागनाथ तोडकर, जनसंपर्क अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक सुवर्णा हाके, आस्थापना लिपिक ऋषी अधटराव, चिदानंद सर्वगोड, चेतन चव्हाण व अखिल भारतीय सफाई काँग्रेस युनियनचे अध्यक्ष गुरु दोडिया त्यांचे सहकारी पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटनाचे अध्यक्ष महादेव आदापुरे, नानासाहेब वाघमारे, धनजी वाघमारे, संतोष सर्वगोड, दत्तात्रय चंदनशिवे, दिनेश साठे, जयंत पवार, अनिल गोयल, सतीश सोलंकी व सफाई कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पंढरपूर नगरपरिषद मधील सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीचे दृष्टीने आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकाऱ्यांची बैठक घेऊन सफाई कर्मचाऱ्यांना विविध सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले आहेत व वरील मुद्द्यांपैकी अनेक मागण्या यापूर्वीच वेळोवेळी संघटनेशी चर्चा करून मान्य करण्यात आल्या होत्या व त्यातील काही कामांची पूर्तता ही करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी जाधव यांनी राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांच्या समोर सादर करण्यात आली. यात प्रामुख्याने सफाई कर्मचारी यांना ६०० चौरस फुटाचे कायम स्वरुपी घर बांधून प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून सदरची शासनाची अंतिम मंजुरी मिळेल नंतर त्या ठिकाणी सफाई कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी चांगला निवारा मिळणार आहे व इतरही अनेक प्रश्न मार्गी लावल्याबद्दल डॉ.पी पी वावा यांनी नगर परिषद प्रशासनाचे कौतुक केले. या बरोबरच लवकरात लवकर सफाई कर्मचाऱ्यांना शासनाकडून त्यांना हक्काची घरे मिळणेबाबत आशावाद व्यक्त केला.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## संघटन पर्व अंतर्गत सदस्यांना नोंदणी महाअभियानास प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
५ जानेवारी २०२५ रोजी धाराशिव शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. यावेळी नागरिकांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनाची माहिती देण्यात आली. यावेळी विविध या योजनेचे लाभार्थ्यांनी व नागरिकांनी सरकारचे आभार मानले.

यावेळी उपस्थित या अभियानाचे जिल्हा संयोजक इंद्रजीत देवकते, शहर संयोजक रोहित देशमुख, प्रसाद मुंडे, प्रदेश कार्यकारणी सदस्य विनोद गपाट, प्रवीण पाठक, जिल्हा उपाध्यक्ष सुनील काकडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहराजे निंबाळकर, शहराध्यक्ष अभय इंगळे, नाना धतुरे, रमण जाधव, संदीप इंगळे, अमोल राजेनिंबाळकर, सलमान शेख, ओमकार देवकते, सुनील पंगुडवाले, अभिजीत काकडे, दाजी पवार, दत्ता पेठे, अमोल पेठे, बापू पवार, बालाजी लोकरे, अमित कदम, सोमनाथ सर्जे, अनिल तावस्कर, बप्पा उंबरे, पुष्पकांत माळाळे, मिसा जनराव, गणेश घोडके, विलास लोंढे, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### आ. पाटील यांचा सत्कार

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा शाखा धाराशिवच्या वतीने महाराष्ट्राच्या विधानसभेवर नवनिर्वाचित आमदार भाजपा राणाजगजीतसिंह पाटील यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्रांत सहकार्यवाह किशोर पिसे, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, कार्यवाह राजाभाऊ हुकिरे, प्रांत पदाधिकारी प्रशांत महाजन, कार्याध्यक्ष सतीश जाधवर, विशाल जाधव, शिवाजी चव्हाण, सतीश कानडे, वसंत पाटील, सचिन हुलसुलकर, खटके, सुनील क्षीरसागर, गणेश बळे, दत्ता राठोड व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



### तुळजापूरात भाजपा सदस्य नोंदणी

**तुळजापूर, दि.५ जानेवारी -**
आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या आदेशाने व युवक नेतृत्व विनोद गंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले. शहरातील सर्व बुथ मध्ये लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. विशेषतः लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबविल्यामुळे महिला वर्गाने जास्तीत जास्त सदस्य नोंदणीत सहभाग नोंदविला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहराध्यक्ष शांताराम पेंदे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राजेश्वर कदम, युवा मोर्चा शहराध्यक्ष राम चोपदार, दिनेश क्षीरसागर, सुरेखा पवार, नितीन पवार, रमेश पवार, राहुल चव्हाण, विक्रम पवार, सचिन राठोड, काशिनाथ पवार, अशिष साळुंके, अजय कांबळे, संकेत घोगरे, अजित तोडकरी व शहरातील प्रमुख सर्व भाजप कार्यकर्ते व बूथ प्रमुख उपस्थित होते.



### आय.एम. विनर स्पर्धा संपन्न

**उमरगा, दि.५ जानेवारी -**
ध्येय प्रकाशन अकॅडमी, महाराष्ट्र राज्य संचलित आय.एम. विनर स्पर्धा दि.५ जानेवारी रोजी उमरगा तालुक्यातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्या मंदिर उमरगा या केंद्रावर सुव्यवस्थितपणे पार पडली. या स्पर्धा परीक्षेचे संचालक डॉ. विनायक टाळकुटे यांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन क्लास घेतले. परीक्षेचे विभाग प्रमुख गोविंद जमादार, वर्षा शाईवाले व प्रणित सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांचा सराव घेतला. स्वामी विवेकानंद परीक्षा केंद्रावर मुख्याध्यापिका सविता लोहार केंद्राध्यक्ष म्हणून गोपाळ आष्टे, बाह्य परीक्षा विभाग प्रमुख गोविंद जमादार, वर्षा शाईवाले, प्रणित सूर्यवंशी, वेंकट वचणे, जैतूनबी मेंडके, निकीता आर्य, लक्ष्मी सूर्यवंशी यांनी परीक्षेचे कामकाज पाहिले.



### लोहाऱ्यात भाजपा सदस्य नोंदणी

**लोहारा, दि.५ जानेवारी -**
संघटन पर्व २०२४-२०२५ भाजपा सदस्य नोंदणी अभियान' अंतर्गत लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि.५ जानेवारी रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'संघटन पर्व २०२४-२५ भाजपा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ भाजपा तालुकाध्यक्ष शिवशंकर हत्तरगे भाजपा जिल्हा कोषाध्यक्ष नेताजी शिंदे, जिल्हा नोंदणी सहसंयोजक विक्रांत संगशेट्टी, नोंदणी तालुका संयोजक तथा तालुका सरचिटणीस दगडू तिगाडे, तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बबनगिरी महाराज, दिलीप पवार, संपत देवकर, बाबा सुंबेकर, प्रमोद पोतदार, संजय कदम, सुरेंद्र काळप्पा, युवराज जाधव, परमेस्वर कदम, निकेश बचाटे, सुयश दंडगुले, बालाजी सोनटक्के, जनक कुलकर्णी, विजय महानुर, कल्याण ढगे, सिद्धेश्वर बिडवे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### माय-लेकरास मारहाण

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
येथील संभाजीनगर येथे एका तरूणाला व त्याच्या आईला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी धाराशिव आनंदनगर पोलिस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साकेत सुशिलकुमार सरवदे या तरूणाने दिलेल्या फिर्यादीनुसार सुरेंद्र महादेव रणदिवे, संगिता सुरेंद्र रणदिवे, विमल महादेव रणदिवे आणि अभिजीत रामलिंग रणदिवे यांच्या विरोधात धाराशिव आनंद नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोयाबीन खरेदीसाठी ४५ दिवसांची मुदतवाढ द्या

**पणन मंत्री रावल यांच्याकडे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
सुरुवातीला आर्द्रता आणि त्यानंतर बारदाण्याच्या तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रांवर सोयाबीन घालता आलेले नाही. नोंदणीकृत शेतकऱ्यांची एकूण संख्या आणि बाजारात भाव मिळत नसल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला शेतकऱ्यांचा कल पाहता, अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी सोयाबीन खरेदीला ४५ दिवसांची मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी आपण पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांच्याकडे केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव जिल्हा आणि परिसरात खरीप हंगामातील नगदी पीक म्हणून सोयाबीनला बहुतांश शेतकऱ्यांची पसंती आहे. त्यामुळे यंदाच्या खरिप हंगामात ४ लाख ६२ हजार ८७२ हेक्टरवर सोयाबीनचा पेरा करण्यात आला होता. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीनला रास्त हमीभाव मिळावा, यासाठी जिल्ह्यात २१ हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहेत. सुरुवातीला हवामानातील बदलामुळे अपेक्षित आर्द्रता नसल्याने शेतकरी बांधवांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन घालण्यासाठी विलंब झाला. मागील आठवडा भरापासून बहुतांश खरेदी केंद्रांना बारदान्याची चणचण भासत आहे. परिणामी काही केंद्रांवरील खरेदी प्रक्रिया यामुळे ठप्प पडलेली आहे.



लवकरच बारदाना उपलब्ध होईल आणि खरेदी पूर्ववत सुरू होईल त्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे. सोयाबीनला सध्या खुल्या बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी बांधव यंदा मोठ्या संख्येने शासकीय खरेदीकडे वळले आहेत.

जिल्ह्यात ३२ हजार ००९ शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रांकडे नोंदणी केलेली आहे. त्यापैकी ५ हजार ३३८ शेतकऱ्यांच्या १ लाख ३३ हजार २२७ क्विंटल सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तर १४ हजार ५४१ शेतकऱ्यांना खरेदी केंद्राकडून मेसेज गेलेले आहेत.

जिल्ह्यातील बहुतांश सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांकडे आजही मोठ्या प्रमाणात सोयाबीन शिल्लक आहे. मात्र सुरवातीला आर्द्रता व त्यानंतर बारदाना तुटवडा यामुळे शेतकरी बांधवाना हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन घालता आलेले नाही.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या नोंदणीची मुदत ३१ डिसेंबरपासून ६ जानेवारीपर्यंत वाढविली आहे. मात्र खरेदीच्या मुदतीत अद्यापही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे मुळात ३१ डिसेंबरपर्यंत नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांचेच सोयाबीन १२ जानेवारीपर्यंत खरेदी होऊ शकणार नाही.

तर मग ६ जानेवारीपर्यंत नोंदणी होणाऱ्या शेतकऱ्यांचे सोयाबीन कसे खरेदी होणार? असा प्रश्न उपस्थित करीत, नोंदणीकृत शेतकऱ्यांची संख्या व बाजारात भाव मिळत नसल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला कल पाहता अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना हमीभाव योजनेचा लाभ मिळावा यासाठी सोयाबीन खरेदीसाठी ४५ दिवसांची मुदत वाढवून देण्यात यावी अशी मागणी पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांच्याकडे केली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## श्री तुळजाभवानी मंदिराला मिळणार पुरातन झळाळी

**जीर्णोध्दाराचे काम वेगात सुरू... देवीच्या मूळ गाभाऱ्याचे काम जलद गतीने सुरू...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जानेवारी -**
महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या मंदिराला लवकरच पुरातन झळाळी लाभणार आहे. मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम सध्या वेगात सुरू आहे.

तुळजाभवानी देवीचा शाकंभरी नवरात्र महोत्सवा निमित्त सात दिवसाची निद्रा चालू असल्याने देवीचा मूळ गाभारा रिकामा असल्यामुळे देवीच्या मूळ गाभाऱ्याला पुरातनतत्व विभागाच्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार पुरातन रूप देण्याचे काम जलद गतीने चालू आहे. सध्या हे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून येत आहे. हजारो वर्षांच्या अनमोल अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या तुळजाभवानी देवीच्या मंदिरासह मंदिर परिसरातील उपदेवतांच्या मंदिरांनाही प्राचीन गतवैभवाचे रूप मिळणार आहे.

लवकरच राज्यासह देशभरातील देविभक्तांना तुळजाभवानी देवीच्या मंदिराचा मूळ प्राचीन गाभारा याची देही याची डोळे मनभरून पाहता येणार आहे.



## परंड्यात आर्थिक वादातून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**
परंडा येथील बसस्थानकावर आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून झालेल्या वादात एका ४० वर्षीय व्यक्तीला काचेच्या बाटलीने मारहाण करून जखमी करण्यात आले आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली अशी की, अरूण दशरथ खडके (वय ४०, रा. माळी गल्ली परंडा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भैय्या अर्जून सोनवणे आणि सौरव बनसोडे या दोघांनी दि.४ जानेवारी रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास परंडा बसस्थानकावरील त्यांच्या पान टपरीसमोर आर्थिक व्यवहारावरून त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण करत काचेच्या बाटलीने वार करून जखमी केले. तसेच आरोपींनी जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी परंडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## नगरपरिषद कचरा डेपोमुळे संपूर्ण परिसरास भीषण आग



**तातडीने अग्निशमक गाडी घटनास्थळी आल्याने आग आटोक्यात...भीषण आगीत हजारो झाडे जळून खाक...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जानेवारी -**
नळदुर्ग रोड वरील नगर परिषदेच्या कचरा डेपोला दि.५ जानेवारी रोजी दुपारी दीड दोनच्या सुमारास अचानक आग लागून संपूर्ण फॉरेस्ट डोंगर परिसराला भीषण आग लागली बघता बघता आगीने चांगलाच भडका घेत कचरा डेपो पासून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पर्यंत ही आग पसरत गेली. काही क्षणातच आगीने भीषण रूप धारण केल्यामुळे मोठ्या प्रमाणात आग पसरत गेली. आगीचा वनवा एवढा भीषण होता की परिसरातील नागरिक घाबरून गेले होते.



या आगीमध्ये डोंगरावर असणारे हजारो वृक्ष जळून खाक झाले. महाविद्यालयाचे प्राध्यापक अमोद जोशी यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांना फोन केला. रोचकरी यांनी नगरपरिषदेस ही बाब कळवून अग्निशामक गाडी तातडीने पाठवण्यास सांगितले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अवघ्या काही मिनिटातच घटनास्थळी अग्निशामक दलाची गाडी आली आणि कचरा डेपो पासून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय परिसरात अग्निशामक गाडीतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेऊन ही भीषण आग आटोक्यात आणली.

दोन अडीच तास परिश्रम घेऊन अग्निशामक दलाचे प्रमुख देविदास देवकते फायरमन अजयरत्न सोनवणे, संजय बनसोडे, चालक हर्षद क्षीरसागर यांनी भीषण पेटलेली आग आटोक्यात आणून संभाव्य दुर्घटना टाळली.

## खेटा पूर्ण करण्यासाठी खंडोबा मंदिरात भाविकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ जानेवारी -**
नळदुर्ग (मैलारपुर) येथे श्री खंडोबा यात्रेपुर्वीच्या शेवटच्या रविवारी म्हणजे पाचव्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटे पासुनच मोठी गर्दी केली होती.

श्रीक्षेत्र मैलारपुर येथे दि.१२ ते १४ जानेवारी या कालावधीत श्री खंडोबा देवाची यात्रा भरणार आहे. दि.५ जानेवारी रोजी यात्रेपुर्वीच्या शेवटच्या रविवारी म्हणजे पाचव्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी भल्या पहाटेपासुनच मंदिरात मोठी गर्दी केली होती.

बोरी नदीवर स्नान करुन अनेक भाविक बोरी नदी घाट ते मंदिरापर्यंत देवाला दंडवत घालत येत होते. त्याचबरोबर देवाला नैवेद्य दाखविणे, बाशिंग बांधणे, मंदिरावर खोबरे-भंडारा उधळणे आदी धार्मिक विधी भाविकांकडुन पार पाडले जात होते. यावेळी दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती.

यात्रेपुर्वीचा हा शेवटचा रविवार आहे. त्यामुळे गर्दीत देवाचे दर्शन नको म्हणुन अनेक भाविक याठिकाणी दर्शनासाठी आले होते.

यात्रा सात दिवसांवर आली असल्याने श्रीक्षेत्र मैलारपुरात मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात व्यवसायिकांनी दुकाने थाटली आहेत.

नळदुर्ग-मैलारपूर श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांना व्यवस्थित दर्शन व्हावे यासाठी दर्शन रांग तयार केली आहे. त्याचबरोबर भाविकांना याठिकाणी मोफत अन्नदान वाटप केले जात आहे.

## मा. मंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते भाजपा सदस्यता नोंदणी अभियाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ जानेवारी -**
भारतीय जनता पक्षाच्या सदस्यता नोंदणी अभियानाला राज्यभरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, याच अनुषंगाने मुरूम (ता.उमरगा) येथे सदस्य नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले. बसवराज पाटील यांच्या सह सर्व उपस्थितांनी सदस्यता नोंदणी केली.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी हे अभियान यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना सर्वतोपरी योगदान देण्याच्या बसवराज पाटील यांनी सूचना केल्या.

यावेळी यावेळी धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अध्यक्ष बापूराव पाटील, सचिन पाटील, गोविंद पाटील, रशिद शेख, श्रीकांत बेंडकाळे, देवेंद्र कंटेकूरे, अनिल सगर, विक्रम मस्के, नगरसेवक महेश माशाळकर, परमेश्वर टोपगे, संचालक विजय सोनकटाळे, महालिंग बाबशेट्टी, विरभद्र बरबडे, अप्पू गुंजोटे, सिद्राम बालकुंदे, राजूभाई मुल्ला, शिवशंकर नागोबा, ताशकंद टेलर, फैजान मुल्ला उपस्थित होते.

## परंड्यात भारतीय जनता पार्टीचे सदस्य नोंदणी अभियान



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ जानेवारी -**
भारतीय जनता पार्टी देशातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टी चे आज सदस्य नोंदणी अभियान छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने नोंदणी करण्यात आली.

यावेळी भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव टोंपे, सरचिटणीस विकास कुलकर्णी, जिल्हा चिटणीस सुजित परदेशी, विठ्ठल तिपाले, प्र.का. सदस्य ॲड. झहीर चौधरी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, अविनाश विधाते, सारंग घोगरे, रामकृष्ण घोडके, भालचंद्र औसरे, सुबोधसिंह ठाकूर, समरजीतसिंह ठाकूर, तानाजी पाटील, धनाजी गायकवाड, बाबासाहेब जाधव, साहेबराव पाडुळे, निशीकांत क्षिरसागर, प्रभाकर लिमकर, बाळासाहेब गोडगे, सागर पाटील, धनंजय काळे, गौरव पाटील, सुरज काळे, आदर्श ठाकूर, आकाश मदने, तुषार कोळेकर, महिला मोर्चा शहराध्यक्षा ज्योती भातलवंडे, शुभदा शेलार, गायत्री तिवारी, जमदाडे, पाटील तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## पालकांचे छत्र हरवलेल्या चिमुकल्यांना ज्ञानराज चौगुले यांचा आधार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ जानेवारी -**
उमरगा तालुक्यातील तुरोरी येथील प्रमोद व प्रणिता कराळे यांचे मागील काही दिवसांपुर्वी अपघाती निधन झाले होते. त्यांच्या पश्चात तीन मुली व आई असा परिवार असुन तिन्ही मुलींच्या शिक्षणासाठी शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या वतीने प्रत्येकी ५० हजार रू. या प्रमाणे एकुण दीड लाख रूपये मदत करण्यात आली आहे.

तुरोरी येथील प्रमोद कराळे व त्यांच्या पत्नी प्रणिता कराळे यांचे दि.१८ डिसेंबर रोजी रात्री साडेसात च्या दरम्यान लक्ष्मी पाटीजवळील अपघातात निधन झाले होते. यानंतर माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांनी मयत कुटुंबाची भेट घेऊन तीनही मुलींचे पुढील शिक्षण पुर्ण करण्याची जबाबदारी स्विकारली होती व प्रत्येकी पन्नास हजार रूपयांचे आर्थिक सहाय्य करण्याचे आश्वासित केले होते. दिलेला शब्द पाळण्यासाठी युवासेना विभागीय निरीक्षक आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते प्रतिक्षा कराळे, प्रांजल कराळे, व प्रज्ञा कराळे या तिन्ही मुलींच्या नावे प्रत्येकी ५० हजार रूपयांची मुदत ठेव ठेवलेले प्रमाणपत्र मुलींची आज्जी विमल कराळे, मामा गणेश सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत सुपुर्द केले.



यावेळी शिवसेना शाखाप्रमुख विजयकुमार भोसले, उपसरपंच तुकाराम जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष पवन जाधव, भाजपचे बालाजी माणिकवार, शाहुराज भोसले यांच्यासह सौदागर सुर्यवंशी, नंदकिशोर पाटील, आनंद शिंदे, नवनाथ जाधव आदींची उपस्थिती होती.

## उमरगा तालुका पत्रकार महासंघाच्या अध्यक्षपदी अंबादास जाधव

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ जानेवारी -**

उमरगा शासकीय विश्रामगृहामध्ये घेण्यात आलेल्या बैठकीत सन २०२५-२६ वर्षासाठीची नूतन कार्यकारिणी जाहिर करण्यात आली.

यावेळी तालुकाध्यक्षपदी अंबादास जाधव, उपाध्यक्षपदी विकास गायकवाड व महेबुब पठाण यांची तर सचिवपदी प्रदिप भोसले यांची निवड करण्यात आली. यावेळी खालील प्रमाणे कार्यकारिणीची निवड करण्यात आली.



कार्याध्यक्ष देवसिंग राजपूत, सहसचिवपदी विश्वास सोनकांबळे, कोषाध्यक्ष महादेव पाटील, संघटक आकाश पोतदार, सहकोषाध्यक्ष जाफर जमादार, मुख्यसल्लागार गुणवंत जाधवर, सुभाष जेवळे, प्रसिद्धीप्रमुख मोहन जाधव तर कार्यकारिणी सदस्य म्हणून आदिनाथ भालेराव, शंकर बिराजदार, लक्ष्मण पवार, उमेश सूर्यवंशी, अमोल गायकवाड, विशाल देशमुख, अनिकेत औरादे, शिवराज पाटील, हणमंत शंके, सुरज आबाचणे, आनंद बागल, अमोल सुरवसे यांची निवड करण्यात आली.

### ▶▶ सावित्रीबाई फुलेंना अभिवादन...

## अध्यक्षपदी सचिन बारकुल

**येरमाळा, दि.५ जानेवारी -**



धाराशिव जिल्हा पत्रकार संघ संलग्न असलेल्या कळंब तालुक्यातील येरमाळा येथील पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून सचिन राजेंद्र बारकुल, उपाध्यक्ष म्हणून दिपक लिंबराज बारकुल तर सचिवपदी दत्तात्रय दिलीप बारकुल हे काम पाहतात. उर्वरित कार्यकारणीत कोषाध्यक्षपदी सुधीर शिवाजीराव लोमटे, कायदेशीर सल्लागार मिलींद चंद्रकांत देशमुख, प्रसिद्धी प्रमुख सुखदेव लक्ष्मण गायके, सदस्य म्हणून कल्लेश मल्लेश भोसले, बालाजी रमेश बारकुल, संतोष विष्णु बारकुल, तानाजी उत्रेश्वर बारकुल, सतिष सुरेश पवार यांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्हा कार्यकारणी सदस्य म्हणून बाळासाहेब शिवाजी जाधवर, दत्तात्रय कोंडीबा गायके यांची निवड करण्यात आली आहे.

## खिचडे, कोकाटे, जाधवर यांना आदर्श दर्पण पुरस्कार जाहीर

**कळंब, दि.५ जानेवारी -**

६ जानेवारी रोजी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पणची सुरुवात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी केली



यानिमित्त ६ जानेवारी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीचे पुरस्कार, सेवा पुरस्कार समिती कळंबचे अध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांनी जाहीर केले असून पुरस्कारचे मानकरी नरसिंग धोंडीराम खिचडे, संदीप अशोक कोकाटे, शाम बाबुराव जाधवर यांचा समावेश आहे. पुरस्कार वितरण सोहळा १० जानेवारी, शुक्रवार रोजी संत ज्ञानेश्वर बालकाश्रम तांदुळवाडी रोड कळंब येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

## मोबाईलची चोरी

**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

६ जानेवारी रोजी महिलेचा मोबाइल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. शितल ज्ञानदेव डोंबाळे (रा. सुंभा, ता. जि. धाराशिव) या महिला दि.१ जानेवारी रोजी सकाळी ९.५० वाजता बसस्थानकावरून प्रभात सहकारी पतपेढी येथे कामासाठी जात असताना यशदा मल्टीस्टेट, नाईकवाडी नगर, धाराशिव समोर दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या खिशातील विवोवाय ५६ कंपनीचा मोबाइल चोरून नेला. या मोबाईलची किंमत अंदाजे १० हजार रुपये आहे. याप्रकरणी शितल डोंबाळे यांनी आनंदनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अवैधपणे पार्क केलेल्या वाहनांवर श्री तुळजाभवानी संस्थानकडून कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जानेवारी -**

तुळजाभवानी मंदिर परिसरात अवैधरित्या पार्क केलेल्या वाहनांवर आज मंदिर प्रशासनाने पोलीस प्रशासनाच्या मदतीने कडक दंडात्मक कारवाई केली.

मंदिर परिसरातील भवानी रोडवर, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय इमारतीसमोर तसेच प्रवेशद्वाराजवळ नो पार्किंग झोन असताना रस्त्याच्या मध्यभागी अवैधरीत्या नो पार्किंग झोनमध्ये दुचाकी पार्क केलेल्या असल्यामुळे पादचारी भाविकांसह स्थानिक नागरिक व कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत होता. मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा व्यवस्थापन माया माने यांनी याबाबत आदेश दिल्यानंतर संस्थानच्या सुरक्षा विभागाकडून पोलिसांच्या मदतीने एकूण २२ दुचाकींवर मोटर व्हेईकल ॲक्टनुसार कारवाई करण्यात आली.

यावेळी पोलिसांबरोबर मंदिराचे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी, कंत्राटी कंपनीचे सुपरवायझर, संस्थानचे सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पाटील, सहाय्यक सुरक्षा निरीक्षक ऋषभ रेहपांडे उपस्थित होते. इथून पुढे ही कारवाई नियमित केली जाणार असून यापुढे परिसरातील पार्किंगची परवानगी नसलेल्या ठिकाणी तसेच मंदिर प्रशासकीय इमारतीसमोर वाहने लावू नयेत असे आवाहन मंदिर संस्थानतर्फे करण्यात आले.

### महाद्वारासमोरील अतिक्रमणे हटवली...

मंदिराच्या महाद्वारासमोर अनेक पथविक्रेत्यांनी अवैधरित्या अतिक्रमण केल्याने भाविकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. शाकंभरी नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील ही अतिक्रमणे देखील मंदिर संस्थानने पूर्णपणे हटवली असून पुन्हा अतिक्रमणे केल्यास कडक कारवाईचा इशारा मंदिर संस्थान प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



पुन्हा अतिक्रमणे केल्यास कडक कारवाईचा इशारा मंदिर संस्थान प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# परंडा येथे उरुस कमेटीची शांतता व नियोजन बैठक संपन्न

### बैठकीस नायब तहसिलदार सह आधिकारी व मान्यवरांची उपस्थिती...



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ जानेवारी -**

हिंदू मुस्लीमांचे श्रद्धास्थान असलेले परंडा येथिल सुफीसंत हजरत ख्वॉजा बद्रोदीन चिश्ती शहीद यांचा उरूस दि.९ जानेवारी रोजी दरवर्षी प्रमाणे साजरा करण्यात येणार आहे. त्या संदर्भात परंडा पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक यांच्या अध्यक्षते खाली शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी पोलिस ठाणे येथे उरूसा निमीत्त शांतता व नियोजन ची आढवा बैठक घेण्यात आली.

या बैठकीत उरूसा निमीत्त घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम व ऊरुसाच्या मुख्य संदल मिरवणूकी विषयी कमेटीच्या वतीने प्रशासणाला माहिती देऊन दर वर्षी प्रमाणे पोलिस बंदोबस्त देण्यात यावा तसेच उरुसा काळात शहरातील पाणी पुरवठा दररोज करावा, रस्त्यावरील खड्डे बुजवावे, अखंडीत विजपुरवठा करण्यात यावा तसेच शहरातील साफसफाई करावी आदि मागण्या करण्यात आल्या. पोलिस निरिक्षक इज्जपवार व नायब तहसिलदार यांनी उरुसा साठी प्रशासना कडून आवश्यक त्या उपाय योजना करण्यात येतील, असे यावेळी मार्गदर्शन करताना स्पष्ट केले. ऊरुसाचा शुभारंभ दि.८ जानेवारी रोजी दर्गाह येथे संदल माली पासुन सुरू होत असुन मुख्य मिरवणूक दि.९ जानेवारी रोजी संध्याकाळी ५.३० वाजता तहसिल कार्यालयातून तहसिलदार यांच्या डोक्यावर फुलाची चादर देऊन फिरवणुकीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक टिपू सुलतान चौक, मंडई पेठ या मार्गा वरून मिरवणूक रात्री १० वाजता दर्गाह येथे पोचल्या वर प्रसाद वाटप करून मिरवणुकीचा समारोप करण्यात येणार आहे. उरूसानिमीत्त दरवर्षीप्रमाणे वायजबयान कव्वाली, मुशायरा, भक्तीगीत, कलगीतुरा, बारागाड्या ओढणे, इत्यादी कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

पोनि. विनोद इज्जपवार, नायब तहसिलदार पाडुरंग माढेकर, सहाय्यक अभियंता अंकुश जाधव, शेख, मुनेर जिकरे, पोना. गुंडाळे, पोना. अफरोज शेख, संजयकुमार बनसोडे, राहूल बनसोडे, वाजीद दखणी, डॉ. आब्बास मुजावर, रफीक मुजावर, मैनु तुटके, बाशाभाई शाहाबर्फीवाले, अझर शेख मकसुद पल्ला, खय्युम तुटके, अमजद मुजावर तसेच इम्रान मुजावर, उपाध्यक्ष तय्यब मुजावर, गौस मुजावर, सलीम मुजावर, मलीक मुजावर, रफीक मुजावर, मजाहीद मुजावर, समीर मुजावर, चांद मुजावर, मुशरफ मुजावर, शारूख मुजावर, आकील मुजावर, अहेमद मुजावर, बबलू मुजावर, असलम मुजावर, सादीक मुजावर, रिजवान मुजावर यांची उपस्थीती होती.

## खासदार व जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय तक्रार आढावा बैठकीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी तालुकानिहाय नागरीकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने आढावा बैठकीचे आयोजन धाराशिव जिल्हयातील नागरीकांच्या विविध तक्रारीच्या अनुषंगाने दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी परांडा, दि.२० ऑगस्ट २०२४ तुळजापूर, दि.२२ ऑगस्ट २०२४ रोजी भूम, दि.२३ ऑगस्ट २०२४ रोजी उमरगा, दि.२७ ऑगस्ट २०२४ रोजी लोहारा, २८ ऑगस्ट २०२४ रोजी वाशी, दि.२९ ऑगस्ट २०२४ रोजी कळंब तालुकास्तरीय आढावा बैठकीचे व दि.११ ऑक्टोंबर २०२४ रोजी फेर आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीमध्ये नागरीकांकडून मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या विविध तक्रारीच्या अनुषंगाने निवारण करणेकरीता खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.९ जानेवारी २०२५ रोजी दु. १२ वा. जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय परीसर धाराशिव येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीत सर्व जिल्हा व तालुकास्तरावरील सर्व संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी आपल्या समस्येची सोडवणूक करून घेण्याच्या दृष्टीने ज्या नागरिकांनी तालुकास्तरावरील जनता दरबारमध्ये समस्या मांडल्या होत्या फक्त त्यांनीच उपस्थित राहावे.

सर्व तालुक्यातील नागरीकांना त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपस्थीत राहणेबाबत अव्हान करण्यात आले आहे.

## धाराशिवात रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ परिवहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिवच्या वतीने १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये जिल्हाभर राबविण्यात येत आहे. राज्यस्तरीय रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उप.प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव येथे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी वाहनास रस्ता सुरक्षा अभियान २०२५ परवाह चे बॅनर लावून त्यास हिरवा झेंडा दाखवून रस्ता सुरक्षा अभियानास सुरुवात केली.

सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री प्रशांतराव साळी व कार्यालयातील सर्व मोटार वाहन निरीक्षक, सहायक. मोटार वाहन निरीक्षक तसेच कार्यालयीन कर्मचारी व कार्यालयात आलेले सर्व नागरीक, वाहन चालक, मालक, मोटार ड्रायव्हिंगस्कूलचे संचालक व वाहन वितरकांचे प्रतिनीधी उपस्थित होते. ब्रेकटेस्ट ट्रॅक : १ जानेवारी रोजी ब्रेकटेस्ट ट्रॅक या ठिकाणी रस्ता सुरक्षेच्या अनुषंगाने सर्व वाहनमालक व इतर नागरिकांना रस्ता सुरक्षा अभियान २०२५ परवाह चे अंतर्गत मोटार वाहन निरीक्षक दत्तात्रय पांडकर यांनी रस्त्यावर चालणाऱ्या दुचाकीधारकाने हेलमेट परिधान करावे व चारचाकी वाहनधारकांनी सिटबेल्टचा वापर करावा.

ज्या ठिकाणी अपघातास व्यक्ती बळी पडतात अशा ठिकाणी नागरीकांनी अपघातग्रस्त व्यक्तींना तात्काळ अँम्बुलंस बोलावून हॉस्पीटलला पाठविण्यासाठी मदत करावी. तसेच रस्त्यावर वाहन चालकांनी मद्यपान करुन वाहन चालवू नये, याबाबत उपस्थित असलेल्या नागरीकांना सुचना देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

## कुलस्वामिनी आश्रमशाळेत बालिका दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.५ जानेवारी -**

श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, जळकोट यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. ज्योतिका चव्हाण तर प्रमुख अतिथी प्रा. अश्विनी लबडे ह्या होत्या.

तसेच प्रा. प्रमिला कुंचगे, शांताबाई चौगुले, कल्पना लवंदया यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य संतोष चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

या बाल कलाकारांना मयुरी कांबळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कोकाटे एस.एम. यांनी केले.

## नगरविकास विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा सुरु

### जिल्ह्यातील नगरपालिकांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जानेवारी -**

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग आणि नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नगरपरिषद प्रशासनाच्यावतीने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी धाराशिव जिल्ह्याचे सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, संवर्ग अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

धाराशिव शहरातील तुळजाभवानी क्रीडा मैदानावर गुरूवार, २ ते ४ जानेवारी दरम्यान जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांच्या उपस्थितीत गुरूवारी पार पडले. यावेळी नगरपरिषद प्रशासन विभागाचे



जिल्हा सहआयुक्त अजितकुमार डोके, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, धाराशिवचे मुख्याधिकारी वसुधा फड, उमरगा नगरपरिषद व लोहारा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर, परंडा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मनीषा वडेपल्ली, भूम नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी शैला डाके, वाशी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी कांबळे, तुळजापूर आणि नळदुर्गचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार, मुरूम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन भूजबळ उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकार्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्पर्धेस प्रारंभ करण्यात आला. या तीन दिवसीय स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी हे क्रिकेट, व्हॉलीबॉल, कॅरम, बुध्दीबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस, नृत्य, गायन, नाटक, रांगोळी यांसह विविध स्पर्धांमध्ये भाग घेणार आहेत. या स्पर्धेतील विजेते विभागीय स्पर्धेसाठी निवडले जाणार आहेत. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी नगरविकास विभागातील कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# कराळी येथे भीम पार्क, विपश्यना केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय बांधकाम प्रगतीपथावर



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ जानेवारी -**

तालुक्यातील कराळी येथील बौद्ध विहार परिसरात भीम पार्क, विपश्यना केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत सुमारे १५ कोटी रुपये निधी मंजूर झाले असून यांचे काम प्रगतीपाथावर असून स्ट्रीट लाईट व सुशोभीकरणासाठी अडीच कोटींचा निधी मंजूर झाला असून त्या कामाची सुरुवात होणार आहे.

या कामासाठी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी पाठपुराव्यामुळे कराळी येथील बुद्ध विहारासाठी दि.१२ जुलै २०२३ रोजी सामाजिक न्याय विभागाने १५ कोटींचा निधी उपलब्ध करीत कामास प्रशासकीय मान्यता दिली होती.

या निधीतून येथील संपूर्ण जागेस संरक्षक भिंत बांधकाम करणे, भीम पार्कचे बांधकाम करणे (तळमजला व पहिला मजला ३३३.९० चौ.मी., धम्म कुटीरचे बांधकाम करणे (तळमजला व पहिला मजला २५५.१९ चौ.मी., विपशना केंद्र इमारतीचे बांधकाम करणे (तळमजला ११५.६६ चौ.मी.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय इमारतीचे बांधकाम करणे तळमजला, पहिला, दुसरा मजला १४४९.७८ चौ.मी., अंतर्गत रस्ते व पादचारी मार्गाचे बांधकाम करणे, सुरक्षारक्षक कक्ष, गेट व कमानीचे बांधकाम करणे, बागबगीचा व सुशोभिकरण करणे, वाहन पार्किंगची व्यवस्था करणे, विंधन विहीर, बोअरवेल व पाणीपुरवठा व्यवस्था करणे, इमारतीस पाणी पुनर्भरण योजना, सोलार एनर्जी व्यवस्था व फर्निचर करणे, इमारत व परिसरास विद्युतीकरण, पिण्याचे पाणी व सीसीटीव्ही व्यवस्था करणे, स्वच्छतागृह बांधकाम करणे आदी कामांचे बांधकाम सुरु करण्यात आली असून ४० टक्के काम पूर्ण झाले आहे. यामुळे या बौध्द विहार परिसराचा कायापालट होताना दिसत असून हे काम पूर्ण झाल्यावर जिल्ह्यातील एक प्रमुख बौध्द धम्म केंद्र म्हणून ओळख होणार आहे.

तसेच सामाजिक न्याय विभागाच्या वितीने याच परिसरात स्ट्रीट लाईट, विश्रामग्रह तसेच सुशोभीकरणसाठी वेगळे अडीच कोटींचा निधी मंजूर झाला असून त्या कामाची सुरुवात करण्यासाठी व पाहणीसाठी धाराशिव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत उपविभागाचे सहाय्यक अभियंता पी.पी. घोरपडे, कनिष्ठ अभियंता टि.एच. तांबे, तसेच ठेकेदार कंपनीचे इलीयास काझी यांनी स्थळपाहणी केली.

यावेळी लॉर्ड बुद्धा चारिटेबल ट्रस्टचे जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष कैलास शिंदे, डी. टि. कांबळे, अशोक बनसोडे आदि पदाधिकारी उपस्थित होते.

> कराळी बौद्ध विहाराचे काम प्रगतीपथावर असून काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न असून आगामी काळात महाराष्ट्रातील महत्वाचे पर्यटनच्या दृष्टीने तसेच बौद्ध अभ्यास केंद्र म्हणुन याकडे पाहिले जाणार आहे.
>
> **- कैलास शिंदे** कोषाध्यक्ष



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी कृष्णा पोतदारची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** महाराष्ट्र व्हॉलीबॉल क्लबचा उत्कृष्ट खेळाडू तथा लातूर रेल्वे दलातील तिकीट कलेक्टर कृष्णा पोतदार याची जयपूर येथे दि. ७ ते १३ जानेवारी दरम्यान होणाऱ्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

पुण्यातील चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या जयपूर येथे होणाऱ्या या स्पर्धेत लातूरच्या दोघांचा सहभाग राहणार असून, पहिल्यांदाच ही किमया झाली आहे. प्रल्हाद सोमवंशी व कृष्णा पोतदार हे लातूरच्या महाराष्ट्र क्लबचे खेळाडू एकत्रित राष्ट्रीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

मैदानावर झालेल्या निवड चाचणी स्पर्धेतून कृष्णाची महाराष्ट्र संघात युनिव्हर्सल म्हणून निवड झाली आहे. ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे महाराष्ट्र संघाचे सराव शिबिर सुरू असून, कृष्णाला एन.आय.एस. प्रशिक्षक महेश पाळणे, विजय सोनवणे, रेल्वे प्रशिक्षक अमेय कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. कृष्णाने यापूर्वी विविध वयोगटांतील नऊ राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले असून, आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. यासह सेंट्रल रेल्वेकडून खेळताना त्याने अनेकदा चमकदार खेळ केला आहे. या यशाचे कौतुक लातूर विभागाचे क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मोईज शेख, विद्यापीठ क्रीडा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. कैलास पाळणे, विभागीय सचिव दत्ताभाऊ सोमवंशी, क्रीडा अधिकारी दत्तात्रय गडपल्लेवार, रामदास नाडे, फाजील शेख, ललित जोशी, पवन पाळणे, प्रवीण तावशीकर, नंदू भोसले, विश्वजित कासले आदिंनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## हेल्मेट वापराबाबत जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने शनिवारी लातूर शहरात हेल्मेट जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीचे उद्घाटन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांच्या हस्ते झाले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत हेल्मेट जनजागृती रॅली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते प्रादेशिक परिवहन कार्यालय मार्गावर काढण्यात आली. यावेळी मोटार वाहन निरिक्षक संजय आडे, शांताराम साठे, सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक नरस गोंडे, अक्षय पाटील, अनुराज सताळे, अश्विन सोनकांबळे, स्वप्नील राजूरकर, मुख्य लिपिक अनिरुद्ध पवार, वरिष्ठ लिपिक उमेश सांगळे, गणेश एडके यांची उपस्थिती होती. रॅलीत ५४ दुचाकी चालक, ड्रायव्हिंग स्कुलचे संचालक यांच्यासह प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी दुचाकी चालकांनी हेल्मेटचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

## पर्यावरणप्रेमी महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छ, सुंदर, हरित लातूरसाठी दररोज श्रमदान व समाजसेवा करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ. भास्करराव बोरगावकर, पद्माकर बागल, राहुल माने, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक प्रवीण खटके, नागसेन कांबळे, दयाराम सुडे, प्रा. मच्छिंद्र चाटे, प्रा. मनोज पांचाळ यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. मीनाक्षी बोंडगे, आशा अयाचित, योग शिक्षिका कल्पना कुलकर्णी, लायनेस क्लबच्या सुवर्णा महाजन, डॉ. सपना डाके, मुख्याध्यापिका दीपाली राजपूत, प्रा. रक्षा डांगे, तुळसा राठोड, प्रा. संगीता घोडके यांचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. आकाश सावंत, सूत्रसंचालन आदित्य स्वामी यांनी केले. आभार डॉ. पवन लड्डा यांनी मानले. त्यानंतर एमआयडीसी परिसरातील अमृत उद्यानात सन्मानित महिलांच्या हस्ते साठ फूलझाडे लावण्यात आली.

## सावित्रीबाईंची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** शहरातील अंबाजोगाई रोड येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य लक्ष्मण पुरी होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. समन्विका रेणुका समुद्रे यांनी प्रास्ताविक केले. ललिता दरेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर ऐश्वर्या बागल यांनी आभार मानले. यावेळी शिक्षिका महानंदा नलावडे, शीतल नडगिरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी अश्विनी पवार, प्रियल गोखले, दर्शना बोराडे-पाटील, निशा पवार आफ्रीन दामटे, वैभवी हंचाटे, किरण शिरसाट, मीनाक्षी सरवदे, गीतांजली गिरी, अंजली शर्मा उपस्थित होते.

## आमदारांनी नागरीकांच्या घेतल्या भेटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** आ.अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संघटना संस्थांचे पदाधिकारी नागरिक यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या अडचणी समजून घेतल्या तसेच त्यांच्या निवेदनाचा, निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोईज शेख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, रेणा साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन अनंतराव देशमुख, धाराशिव शहर काँग्रेसचे अध्यक्ष अग्निवेश शिंदे, प्रशांत पाटील, सुनील बडूरकर, लक्ष्मीकांत कर्वा, योगेश कर्वा, डॉ. विश्रांत भारती, डॉ. शिरीष पाटील, शैलेश भोसले, प्रा.प्रवीण कांबळे, गोविंद देशमुख, तबरेज तांबोळी, पवन सोलंकर, कविता बाळापुरे, प्रभावती लखनगिरे, सरोजा जाधव, मीना झांजे, मंगल गवळी, मंगल फत्तेपुरे, सुपर्ण जगताप, हनमंत पवार, जब्बार सगरे, शिवाप्पा कोरके, गोपाळ थडकर सचिन मस्के, अनिल मडके, प्रताप माने, शंकर शिंदे, अशोक नाडागुडे, मीनाज देशमुख, अक्षय राठोड, सूर्यकांत कातळे, गोटू यादव आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

# मुलींना मोफत शिक्षणाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करा

### अभाविप देवगिरी प्रदेश अधिवेशनात ठराव




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** मुलींना मोफत शिक्षण देण्याचा चांगला निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.परंतु अनेक महाविद्यालये त्याची अंमलबजावणी करत नाहीत. राज्य सरकारने या निर्णयाची प्रभावीपणे अमलबजावणी करावी, असा ठराव लातूर येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांताच्या ५९ व्या अधिवेशनात संमत करण्यात आला.

दि. २ ते ४ जानेवारी या कालावधीत लातूर येथे अभाविप देवगिरी प्रदेशाचे ५९ वे अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनात शैक्षणिक सद्यस्थिती, सामाजिक सद्यस्थिती आणि स्वयंरोजगार व रोजगार निर्मिती तसेच उद्योजकता विकासाकडे युवकांची ओढ निर्माण करण्यासाठी सरकारने आखावा कृती आराखडा असे तीन प्रस्ताव संमत करण्यात आले.

शैक्षणिक परिसराच्या ५०० मीटर अंतरात तंबाखूजन्य पदार्थांची तसेच अमली पदार्थांची विक्री करण्याच्या घटना उघड झाल्या आहेत, त्यावर निर्बंध घालावेत. महाविद्यालयात पायाभूत सुविधा वाढवाव्यात, रिक्त जागी प्राध्यापकांची भरती करावी. औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील उपकरणांचे नूतनीकरण करावे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधावी, पेपरफुटीला आळा घालावा, वसतीगृहांची सुरक्षा वाढवावी, राज्यात एआय प्रयोगशाळा वाढवाव्यात, असे शैक्षणिक ठरावात म्हटले आहे.

सामाजिक सद्यस्थितीवरील ठराव मंजूर करताना देशविरोधी प्रवृत्तीला आळा घालावा, ही मागणी करण्यात आली. राज्यात तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्ती व संघटनांकडून समाजविघातक तसेच कट्टरपंथीय विचारसरणीला प्रोत्साहन मिळत आहे. त्यासाठी उपाय करावेत. बीड जिल्ह्यातील हत्येची घटना चिंताजनक असून परभणीतील घटनाही निंदनीय आहे. समाज विघातक प्रवृत्तीवर जरब बसवावी. महिला अत्याचाराच्या घटना वाढत असून त्या थांबवाव्यात, असे या प्रस्तावात म्हटले आहे.

तिसऱ्या प्रस्तावात रोजगार निर्मितीची मागणी करण्यात आली आहे.जालना येथील ड्रायपोर्ट लवकर सुरू करावे. खानदेशातील बेरोजगारी दूर करण्यासाठी औद्योगिक गुंतवणूक वाढवावी. एक जिल्हा एक उत्पादन यासारख्या योजना सामान्य नागरिक व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात. नवे उद्योग सुरू करण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करावी. कृषी उत्पादनावर आधारित उद्योग सुरू करावे, असेही या प्रस्तावात म्हटले आहे.

प्रस्तावाच्या मंजुरीनंतर तीन दिवस चाललेल्या या अधिवेशनाची सांगता झाली.अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर शिक्षण तज्ञ प्रा.अनिल राव यांनी मार्गदर्शन केले.नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ.मनोहर चासकर यांची या सत्रास प्रमुख उपस्थिती होती. समारोप सत्रात परिषदेची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. मराठवाडा तसेच खानदेशातील विद्यार्थी प्रतिनिधी, प्राध्यापक प्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची या अधिवेशनास उपस्थिती होती. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ...हीच खऱ्या अर्थाने सावित्रीमातेला आदरांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** भारतामध्ये मुलींसाठी पहिली शाळा चालवणारी शिक्षिका माता सावित्री यांचा संपूर्ण देश आदराने सन्मान करतो, ती स्त्री नसती तर आज देशांमध्ये स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली नसती. आज स्त्रिया ज्या पद्धतीने सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती करत आहेत या सर्वांच्या मागे माता-सावित्रीचेच कार्य आणि त्यागाची भूमिका आहे. कलापंढरी सामाजिक संस्थेने बालविवाह प्रतिबंधक कार्यक्रम चालवून मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रेरणा देण्याचे जे अभियान चालू केली आहे, खऱ्या अर्थाने हे सावित्री मातेला त्यांच्या जन्मदिनी आदरांजली आहे असे उद्गार अंनिसचे राज्य कार्यकारणी सदस्य



तथा पानगाव ग्राम बाल संरक्षण समितीचे सदस्य बाबा हलकुडे यांनी काढले.

सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी कलापंढरी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बालविवाह प्रतिबंध व उच्च शिक्षणासाठी प्रेरणा या कार्यक्रमामध्ये प्रशिक्षक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करताना गौरवोद्गार काढले.

लातूर येथे जिल्हास्तरीय बाल संरक्षण यंत्रणा प्रतिनिधी व गाव स्तरीय बाल संरक्षण यंत्रणा प्रतिनिधी यांच्या योग्य समन्वय प्रक्रियेसाठी संस्था अध्यक्ष बीपी सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या वेळी प्रशिक्षक म्हणून बाल न्याय मंडळाच्या सदस्य छायाताई मलावडे, बाल कल्याण समितीचे सदस्य प्रणील नागोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बालकांच्या हितासाठी बाल न्याय मंडळ व बालकल्याण समिती कोणत्या पद्धतीचे कार्य करते यासंबंधीची सविस्तर मांडणी करण्यात आली. याचबरोबर गाव पातळीवर समन्वय प्रक्रिया कशी सक्षम करायची याचीही माहिती देण्यात आली.

पुढे बोलताना बाबा हलकुडे म्हणाले की, बालकांच्या संरक्षण प्रक्रिया मजबूत करण्यासाठी आणि गाव स्तरावरच बालक स्वतः त्यांचे पालक व गाव स्तरीय बाल संरक्षण यंत्रणा यांनी समन्वय आणि सहकार्य योग्य केल्यास बाल न्याय मंडळ व बालकल्याण समिती यांना त्यांची कार्य भूमिका सक्षमपणे पार पडण्यासाठी मदत होईल व संपूर्ण जिल्ह्यामध्ये बाल स्नेही वातावरण निर्माण होईल असेही प्रतिपादन त्यांनी केले.

## दयानंद विज्ञानच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**


**लातूर, दि.५ जानेवारी -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय शिबिराचे आयोजन दावतपूर, ता.औसा,जि. लातूर येथे दि.६ जानेवारी ते १२ जानेवारी या कालावधीत करण्यात आलेले आहे.

'युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी ' या विशेष वार्षिक युवक शिबिराचे उद्घाटन७ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव रमेश बियाणी व प्रमुख पाहुणे म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे रासेयो संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर,दावतपूरचे सरपंच शिवदास कांबळे, उपसरपंच विठ्ठल बेडजवळगे, ग्रामसेवक चलमले आर.एम.,मुख्याध्यापक चव्हाण चापला,शाळा व्यवस्थापक समिती अध्यक्ष नितीन बिराजदार व उपाध्यक्ष शिवशंकर पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष भारतबाई बिराजदार, पोलिस पाटील दत्तात्रय कुंभार, तलाठी किरणसिंग गहिरवार, डॉ.राहुल मोरे, डॉ. गजानन बने, प्रा.मेघा आञाम आदी उपस्थित राहणार आहेत.

## गोलाईतील भाजीपाला विक्रेते गेले कुठे?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या गंजगोलाईतील सर्कल व सर्कलबाहेरील भाजीपाला विक्रेते, फळविक्रेते हातागाडीवाल्यांना अतिक्रमणाच्या नावाखाली गंजगोलाईतून काढून त्यांचे गंजगोलाईच्या परिसरातीलच नवयुग सिनेमा थिएटरच्या समोरच्या लातूर शहर महानगरपालिकेच्या दोन प्लॉटवर पुनर्वसन करण्यात आले. परंतु, गेल्या १२ दिवसांत भाजीपाला, फळ विक्रेत्यांनी पुनर्वसीत जागेवर व्यवसाय केलाच नाही. उलट पुनर्वसीत जागेवर हातगाडे ठेवुन तिथल्याही जागेवर कब्जा झाल्याचे सध्याचे चित्र आहे.



सोळा रस्त्यांनी जोडलेल्या गंजगोलाईत प्रत्येक रस्त्यावर वैशिष्ट्येपूर्ण व्यवसाय चालतात. जसे की, भूसार लाईन, कापड लाईन, सराफ लाईन. एवढेच नव्हे तर गंजगोलाईच्या सर्कलमध्ये आणि सर्कलच्या बाहेरही विविध छोटे-मोठे व्यवसाय चालतात.

त्यात भाजीपाला, फळे, क्रॉकरी, हळद-कुंकु, झाडु-फळे, चप्पल, बुट शिवणारे, कुलूपवाले, बांगडीवाले, वडापाव, समोसा, खिचडी, राईसवाले आदी अनेक व्यवसाय चालतात. गंजगोलाई मुख्य बाजारपेठ असल्यामुळे गंजगोलाईत दररोज प्रचंड गर्दी होते. दुचाकी, चारचाकी वाहने, ऑटोरिक्षांचीही मोठी वर्दळ असते. विविध सण, उत्सवाच्या काळात तर गंजगोलाईत पायी चालणेही शक्य होत नाही. एवढी गर्दी असते. गंजगोलाईतील गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने लातूर शहर महानगरपालिका व लातूर शहर पोलीस वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने गंजगोलाईतील भाजीपाला विक्रेते, फळ विक्रेत्यांसह सर्वच छोट्या व्यवसायिकांना गंजगोलाईतून काढून नवयुग सिनेमा थिएटरच्या परिसरातील दोन प्लॉटवर त्यांचे पुनर्वसन करण्यात आले.

## ठप्प झालेली सोयाबीन खरेदी पूर्ववत करा : धीरज देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** लातूरसह राज्यातील सोयाबीन खरेदीसाठी उघडण्यात आलेल्या बहुतांश खरेदी केंद्रांवर गेल्या दोन ते तीन आठवड्यांपासून बारदाण्याचा तुटवडा असल्याने सोयाबीन खरेदी पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे खरेदी केंद्रांवर दररोज चकरा मारण्याची वेळ शेतकरी बांधवांवर आली आहे. या प्रश्नात सरकारने त्वरित हस्तक्षेप करून सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना दिलासा द्यावा अशी मागणी माजी आमदार धीरज देशमुख यांनी केली.



खरेदी केंद्रांवरील सोयाबीन खरेदी ठप्प झाल्याने देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य कृषी व पणन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांना पत्र पाठवून या विषयाकडे त्यांचे लक्ष वेधले. देशमुख म्हणाले, हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी लातूर जिल्ह्यात नाफेडच्यावतीने १६ हमीभाव केंद्र सुरू करण्यात आले आहेत तर महासंघाच्या ३५ केंद्रांना परवानगी देण्यात आली. मागील दीड महिन्यांपासून हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे. मात्र, अचानक ५८० ग्रॅम ऐवजी ५३० ग्रॅम बारदाण्याचा शासनाने आग्रह केल्यामुळे बाजारात तुटवडा निर्माण झाल्याने खरेदी बंद झाली आहे. तसेच सोयाबीनसाठी शेतकऱ्यांच्या उपलब्ध बारदाना वापरण्यास मनाई करून नवीन बारदाना वापरणे आवश्यक केल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे.उपलब्ध बारदाण्याला मंजुरी देऊन तत्काळ खरेदी सुरू करावी. तसेच ऑनलाइन नोंदणीसाठी एक महिन्याचा तर खरेदीसाठी २ महिन्यांचा कालावधी वाढवून द्यावा व शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेला बारदाना वापरण्यास परवानगी देऊन सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना दिलासा द्यावा, अशी मागणी माजी आमदार धीरज देशमुख यांनी पत्राद्वारे केली आहे.

## मेथीने इतर भाज्यांचा 'बाजार' उठवला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** शहराच्या भाजी मंडईत भाजीपाला मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यात पालेभाज्याची आवक प्रचंड वाढली आहे. मेथी भाजीची आवक सर्वाधिक आहे. त्यामुळे दिवसभर १० रुपये आणि सायंकाळी चार-पाच रुपयांना मिळाणा-या मेथीने इतर भाज्यांचा बाजारच उठवला आहे.

पाच-दहा रुपयांचे मेथी भाजी, दहा रुपयांच्या हिरव्या मिरच्या, असे वीस-पंचेवीस रुपयांत भाजीचा विषय मिटत असल्याने नागरिक २० रुपये, ३० रुपये, ४० रुपये पावकिलो, असा भाव असलेल्या भाज्यांकडे ढूंकूनही बघत नसल्याने मेथी वगळता इतर भाज्याचा बाजारच उठल्याचे सध्याचे चित्र आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून उन्हाचा तडाखा वाढत असताना हिरव्या पालेभाज्यांचे उत्पादन वाढले आहे. त्यामुळे सध्या शहरातील महात्मा फुले कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात लिलावासाठी येणा-या पालेभाज्यांची आवक मोठया प्रमाणात वाढली आहे. दर्जेदार पालेभाज्या वगळता इतर पालेभाज्यांना चांगले दर मिळत नसल्यामुळे शेतापासून बाजारापर्यंत पालेभाज्या आणणेदेखील शेतकऱ्यांना परवडत नसल्याची व्यथा शेतकरी व्यक्त करीत आहेत. लातूर जिल्हाभरात पाऊस चांगला झालेला असल्यामुळे सिंचनासाठी मुबलक पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे पाण्याची आवश्यकता जास्त असलेल्या आणि कमी कालावधीत काढणीसाठी तयार होणाऱ्या पालेभाज्यांची लागवड वाढलेली आहे.

## कल्याणकारी कायद नागरिकांपर्यंत पोहोचवा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** न्यायापासून कोणतीही व्यक्ती वंचित राहू नये, यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. यासाठी महिला, दिव्यांग यासह इतरही पात्र व्यक्तींना मोफत कायदेशीर सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. अशा उपक्रमांची, तसेच शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. यासाठी विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्यासारखे उपक्रम उपयुक्त ठरतील, असा विश्वास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) खंडपीठाचे न्यायमूर्ती नीरज धोटे यांनी व्यक्त केला.

लातूर येथील लक्ष्मीप्रयाग बॅंक्वेटस येथे आयोजित विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी न्यायमूर्ती श्री. धोटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव पी. पी. केस्तीकर, महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेचे सदस्य ॲड. अण्णाराव पाटील, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. एम. इंगळे यांच्यासह न्यायिक अधिकारी, विविध शासकीय विभागांचे प्रमुख, जिल्हा वकील मंडळांचे पदाधिकारी, विधिज्ञ व नागरिक यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कायदेविषयक माहिती आणि शासनाच्या योजना तळागाळातील व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी न्यायपालिका महाशिबिराच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहे. कायद्याने नागरिकांना दिलेले हक्क आणि शासनाच्या योजनांपासून कोणीही वंचित राहू नये, असा यामागील उद्देश आहे. विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून महिलांसह इतरही पात्र व्यक्तींना मोफत कायदेविषयक सहाय्य दिले जाते. याबाबतही समाजात जनजागृती करण्यावर भर दिला जावा. यासोबतच शासनाच्या योजनांचा लाभही वंचित घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न करावेत, असे आवाहन न्यायमूर्ती श्री. धोटे यांनी केले.


## हरंगुळ व भोईसमुद्रगा येथील रस्ता दुरुस्तीचे काम सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ जानेवारी -** आ. अमित देशमुख यांची नुकतेच हरंगुळ व भोईसमुद्रगा येथील नागरिकांनी भेट देऊन कळंब रस्ता खराब झाला आहे, यामुळे ये - जा करण्यासाठी अडचण होत आहे, तरी या रस्त्याची दुरुस्ती करण्याची विनंती केली होती.

नागरिकांच्या या तक्रारीची दखल घेऊन ३१ डिसेंबर रोजी स्वतः या ठिकाणी भेट देऊन रस्त्याची पाहणी केली होती आणि संबंधित अधिकाऱ्यांना काम जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर रस्त्याची दुरुस्तीचे काम जलद गतीने सुरू झाले आहे.

याबाबत संदर्भाने बोलताना, आ. अमित देशमुख म्हणाले, नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होऊ शकत नाही. रस्त्यांची दुरुस्ती ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनासाठी अतिशय महत्त्वाची आहे. यामुळे नागरिकांना होणारी अडचण लक्षात घेऊन तात्काळ कारवाई केली आहे. लवकरच हा रस्ता पूर्णपणे दुरुस्त होईल आणि नागरिकांना सुलभ प्रवास करता



येईल असे सांगीतले आहे.

या रस्त्याच्या कामामुळे ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.

CMYK

लातूर

# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## नागरिकांला बसण्यासाठी 'बेंच' चे लोकार्पण



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.५ जानेवारी -**

तालुक्यातील पोहरेगाव येथील सामाजिक क्षेत्रात काम करणारी सेवाभावी संस्था म्हणून नावारूपाला येत आहे. या नायक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने पोहरेगाव परिसरातील गावामध्ये नागरिकांना बसण्यासाठी बेंच चे लोकार्पण करण्यात आले आहे.

दि.३१ रोजी नायक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था पोहरेगाव यांच्या मधमातून शेरा, प्राथमिक आरोग्य केंद्र, जुने बसस्थानक, हनुमान मंदिर आदी तांड्यातील प्रमुख चौकामध्ये या बेंचचे महत्व लक्षात घेता मित्र-परिवाराच्या वतीने संस्थेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत बेंचचे बसविण्यात आले आहे.

संस्थेचे अध्यक्ष शरद राठोड, संस्थेच्या सचिव तारामती राठोड, देविदास राठोड यांच्या विचारातून मित्र-परिवारा यांच्या माध्यमातून भविष्यात हीं मोठ्या सामाजिक योजना प्रभावीपने राबविण्याचे माध्यम म्हणून संस्थेचा नमोल्लेख केला जात आहे.

### संक्षिप्त वृत्त...



## चरित्रग्रंथांच्या पाचभाषीय पुस्तक प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**उदगीर, दि.५ जानेवारी -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा समिती तसेच राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या विशेष उपक्रमाच्या निमित्ताने पाच भाषांतील (इंग्रजी, उर्दू, कन्नड, हिंदी आणि मराठी) चरित्रग्रंथांचे पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रदर्शनात महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, एपीजे अब्दुल कलाम यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांवर आधारित विविध भाषांतील ग्रंथ उपलब्ध होते. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी वाचा आणि प्रेरणा घ्या हा संदेश देणाऱ्या या ग्रंथांचे वाचन करण्याचा संकल्प सोडला. ग्रंथ प्रदर्शनादरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के यांनी उपस्थितांना वाचनाच्या महत्त्वाबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथपाल डॉ. पेन्सलवार आणि त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले. वाचन संस्कृतीला चालना देणाऱ्या अशा उपक्रमांमुळे प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी भरभरून प्रतिसाद दिला.



## लालबहादूर शास्त्री विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**उदगीर, दि.५ जानेवारी -**

येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर अतिथी म्हणून डॉ. दीपिका भद्रे, डॉ. रेश्मा पाटील, अनिता संकाये, वर्षा भालके, शिल्पा वाघमारे, संस्था सभासद शारदा जाधव तसेच विद्यालयाचे उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले व सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत अर्णवी होनराव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमात इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनींनी शोभा नेत्रगावकर व प्रमोदिनी रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली नाटिकेचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा मोरे, साक्षी चिखले यांनी केले. तर आभार निलेश मांडवकर यांनी मानले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनोज भंडे, प्रीती शेंड अनिता मुळखेडे, आशा गौतम, विजया गोविंदवाड व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## वलांडी येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**उदगीर, दि.५ जानेवारी -**

देवणी तालुक्याचे ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन वलांडी येथे पंचायत समिती, शिक्षण विभाग देवणी व अनुसयादेवी सोनकवडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वलांडी यांच्या संयुक्त विद्यमाने ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन अनुसयादेवी सोनकवडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वलांडी येथे आयोजन करण्यात आले. या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार धर्माजी गिरजप्पा सोनकवडे हे होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर डायटच्या प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी यांनी केले. या कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, रसिका महाविद्यालय देवणी येथील प्रा.डॉ. वैशाली चटगे या होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन या शाळेतील सहशिक्षक गंगाधर सुर्यवंशी यांनी केले तर आभार श्रमच्छिंद्र चिद्रे यांनी मानल

# महायुती सरकारच्या काळात महाराष्ट्र पुढे जाईल : आ. संजय बनसोडे



### मी सदैव उदगीरकरांच्या पाठीशी...

मागील काळात माजी मंत्री संजय बनसोडे हे सरकारमध्ये मंत्री होते त्यांनी त्यांच्या कार्यकाळात उत्तम कार्य केले आहे. आपल्या जिल्ह्याला नेहमी न्याय देण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे. आम्ही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांच्या हितासाठी जे-जे करता येईल ते नक्की करणार असून आपली उदगीर शहर क्रीडा व शिक्षणाबरोबरच सर्व क्षेत्रात अग्रेसर आहे अगोदरपासूनच माझे उदगीरवर प्रेम असल्याने पहिला सत्कार मी उदगीरचा स्वीकारला. यावेळी मला मंत्री पदाची संधी मिळाली त्याचा उपयोग जनतेच्या हितासाठी करून उदगीर करांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.५ जानेवारी -**

परवा झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये उदगीर मतदार संघाचा भौतिक विकास केल्यानेच उदगीर मतदारसंघातील जनता आपल्याला मोठ्या मताधिक्याने निवडून दिली असून जनतेचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी मागच्यापेक्षा अधिक जोमाने काम करून मतदारसंघातील सर्व समस्या सोडवणार आहे. सर्वसामान्य नागरीकांना केंद्रबिंदू समजून आमचे महायुतीचे सरकार काम करत आहे. महायुती सरकारच्या काळातच महाराष्ट्र पुढे जाईल असा विश्वास राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे. ते उदगीर येथे आयोजीत भव्य नागरी सत्कार सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना बोलत होते.

उदगीर शहरात राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील व उदगीरचे भाग्यविधाते माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुरूवर्य गहिनीनाथ महाराज औसेकर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी आ. गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, बस्वराज बागबंदे, जिल्हाध्यक्ष अफसर शेख, व्यंकटराव बेद्रे, रामचंद्र तिरुके, उषा कांबळे, महानंदा बहेनजी, रमेश अंबरखाने, ॲड. गुलाबराव पटवारी, विधानसभा अध्यक्ष प्रा. प्रवीण भोळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, शहराध्यक्ष मनोज पुदाले, सुदर्शन मुंडे, सुधीर भोसले, बसवराज पाटील कौळखेडकर, पंडित सुर्यवंशी, रामराव बिरादार, दिलीप गायकवाड, भरत चामले, माजी नगरसेवक अनिल मुदाळे, नरसिंग शिंदे, भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, ॲड. दिपाली औटे, डॉ. भाग्यश्री घाळे, ब्रम्हाजी केंद्रे, श्याम डावळे, बाळासाहेब मरलापल्ले, उषा रोडगे, समीर शेख, शफी हाश्मी, रामराव बिरादार, धनाजी मुळे, विजय निटुरे, अभिजित औटे, ब्रम्हाजी केंद्रे, प्रदीप जोंधळे, अनिरुध्द गुरुडे, भास्कर पाटील, गिरीश उप्परबावडे, इब्राहिम शेख, पृथ्वीराज पाटील एकंबेकर, मधुमती कनशेट्टे, वैशाली कांबळे, काजल मिरजगावे, रिपाईचे सुशिलकुमार शिंदे, ॲड. प्रफुल्लकुमार उदगीरकर, मुकेश भालेराव, आदींसह पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आमदार बनसोडे यांनी, महायुती सरकारमध्ये दोन्ही टर्ममध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहिल्यांदा मला आणि आता बाबासाहेब पाटील यांना मंत्रिपदाची संधी दिली आहे. दोघांकडूनही जिल्ह्याच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी आम्ही कटिबध्द असल्याचे माजी मंत्री आ. संजय बनसोडे म्हणाले. आपले शहर हे लातूर जिल्ह्यातील सर्वात मोठे बाजारपेठ असलेले शहर असुन या शहराला एक ऐतिहासिक वारसा आहे आणि तो आपण सर्वांनी जपले पाहिजे. उदगीर हे संस्कृती जपणारे शहर असून भविष्यात उदगीरच्या विकासासाठी आपण काम करणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष बालाजी भोसले यांनी केले. सुत्रसंचालन व आभार प्रा. सिद्धेश्वर पटणे, अनिता येलमट्टे यांनी केले.

## रडायचे नसेल तर अभ्यासच करा : सौताडेकर



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.५ जानेवारी -**

विद्यार्थ्यांनो स्वप्न अशी पहा की तुम्हाला झोप येऊ देणार नाहीत. आपल्या स्वप्नाची आणि परिक्षेच्या निकाली दिवशी रडायचे नसेल तर वर्षभर अभ्यास करा, असे आवाहन प्रमुख मार्गदर्शक व लेखक विवेक सौताडेकर यांनी केले.

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात ग्रंथालय विभाग, सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत लेखक व विद्यार्थी संवाद कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. जिल्हा समन्वयक, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, लातूर व प्रमुख मार्गदर्शक लेखक विवेक सौताडेकर यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती. तर प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ. वीरेंद्र मेश्राम, प्राचार्य योगिता बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, प्राचार्य रूपाली गिरी, सुमित बोरसुरे व्यास उपस्थित होते.

प्रत्येक व्यक्तीने आपले मत चांगल्या व प्रभावी पद्धतीने सादर करावे तेव्हाच माणूस यशस्वी होतो असे मनोगत सचिव वेताळेश्वर बावगे यांनी व्यक्त केले.यावेळी प्रमुख मार्गदर्शक व लेखक विवेक सौताडेकर यांनी संवाद व सुसंवादाबद्दल सखोल, असे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्रा. माधुरी पोळकर, एनएसएस विभाग प्रमुख प्रा. मुंजाजी मुळे, प्रा. शुभम वैरागकर, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे, प्रा पवार सर, प्रा अक्षता लासुरे, प्रा. स्नेहजा भालेराव, प्रा मनकरणा कराळे, प्रा. क्षितिजा माळी, प्रा. संस्कृती शिरुरे, रोहिणी सोमवंशी, ऋतुजा कोरे आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## पुन्हा 'जलसमाधी' आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.५ जानेवारी -**



उपविभागीय अधिकारी निलंगा यांच्याकडून तिन्ही तालुक्यातील जवळपास तीन हजार जातीचे दाखले गेल्या दोन महिन्यांपासून प्रलंबित आहेत. सर्व बाबीची पूर्तता करूनही उपविभागीय अधिकारी यांच्याकडून जात प्रमाणपत्राची अडवणूक केली जात असल्याचा आरोप करुन प्रजासत्ताक दिनाला पुन्हा महादेव कोळी समाज करणार सामुयिक जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा मराठवाडा सकल आदिवासी महादेव कोळी जमातीचे नेते चंद्रहास नलमले यांनी रविवारी दि.५ रोजी दिला आहे.

निलंगा तालुक्यात मागील काळात सुलभतेने जातीचे प्रमाणपत्र मिळावे, वैद्यता मिळावी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे आधी मागण्यासाठी तेरणा नदी पात्रात महादेव कोळी समाज बांधवांचे जलसमाधी आंदोलन मोठ्या प्रमाणात झाले होते.

तसेच या जलसमाधी आंदोलनाची दखल घेवून भाजपाचे युवानेते अरविंद पाटील निलंगेकर, उपविभागीय अधिकारी शरद झाडके, तहसिलदार प्रसाद कुलकर्णी यानी सर्व आटी मान्य करून टी.सी. व निर्गम उतारा या पुराव्यावरच जात प्रमाणपत्र देऊ असे लेखी अश्वासन दिल्यानंतरच जल समाधी आंदोलन मागे घेण्यात आले होते.

परंतु निवडणूक काळात जात प्रमाणपत्र दाखल केलेल्या काही मोजक्याच लोकांना देण्यात आले.

तात्काळ जात प्रमाणपत्राचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाल्यानंतर करण्यात आली. त्यानंतर येत्या २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी पुन्हा नदीपात्रात जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा समाजाचे नेते चंद्र नलमले यांनी दिला.

## लीनेस क्लबच्या संगीत रजनित सुमधुर गाण्यांचा संगम



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.५ जानेवारी -**

नववर्षाच औचित्य साधून लीनेस क्लब तर्फे नववर्षाच्या स्वागतासाठी सुमधुर संगीत मैफिलीचा व गायकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष सुनंदा कुलकर्णी तर प्रमुख पाहुण्या म्हणून सचिव कौशल्या पवार, कोषाध्यक्ष उषा सुडे आणि गुंठे उपस्थित होत्या.

अहमदपूर मधील संगीत प्रेमी ग्रुपमधील कलाकारांनी यावेळी सुमधुर संगीताची मेजवानीच सर्वांना दिली. नववर्षाची सुरुवात अतिशय आनंददायी संगीतमय कार्यक्रमाची सुरुवात माई सावित्रीच्या पूजा व संगीताची आराध्यदेवता माता सरस्वती देवीच्या पूजनाणे झाली. उषा सुडे, रंजना गायकवाड, प्रियंका कुलकर्णी, संदेश कुलकर्णी, मुग्धा मांडणीकर व गोपीनाथ मांडणीकर, ज्ञानोबा भोसले, प्रा. उमेश चलवदे, सागर कुलकर्णी, अजित कुलकर्णी, विनोद गुंठे, विठ्ठल गवळी, मोहम्मद आरिफ, रमेश भालेराव, ओम प्रकाश तपघाले आदी गायकांनी जुन्या-नव्या हिंदी-मराठी चित्रपट गीतांना आपल्या मधुर आवाजाचा साज देतं भाव गीत,भक्ती गीताने कार्यक्रमाची ची रंगत वाढवली. कार्यक्रमात विविध विषयावर लेख लिहिणाऱ्या उषा सुडे, सुनंदा कुलकर्णी, शोभा टोम्पे, वनिता पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन प्रतिभा गोरटे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व लेनेसच्या ७२ सदस्यांनी पुढाकार घेतला.

## भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवावे : मनोज पुदाले



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.५ जानेवारी -**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून देत हे अभियान प्रभावीपणे राबवावे असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात पक्ष सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची कार्यशाळा भाजपच्या शहर कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी शहराध्यक्ष मनोज पुदाले बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे उदगीर विधानसभा प्रमुख राहुल केंद्रे होते. यावेळी माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुपे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, मनोहर भंडे,विजय निटूरे, माजी सभापती विजय पाटील, रामचंद्र मुक्कावार, सुरेंद्र आकनगिरे, शिवकुमार हाळे, बसवराज रोडगे, गोणसे मामा, गोविंद कोंबडे, शिवाजी भोळे, साईनाथ चिमेगाव, रुपेंद्र चव्हाण, अमर सुर्यवंशी, सरोजा वारकरे, रामेश्वर पवार, अमोल अनकल्ले, उषा माने, रमेश शेरिकर, आनंद बुंदे, आदी उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारकडून राबविल्या जात असलेल्या योजनांची माहिती पोहोचवत आपल्या पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवावे असे आवाहन यावेळी शहराध्यक्ष मनोज पुदाले यांनी केले. यावेळी शिवकर्णा अंधारे, रुपेंद्र चव्हाण, लखन कांबळे, रामेश्वर पवार, विजय पाटील, रेणुका डुबुकवाड, अरुणा चिमेगावे, दिलीप मजगे, डॉ. चंद्रकांत कोठारे, राजकुमार लिंबाळे, देविदास सोनटक्के, उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड. दत्ता पाटील यांनी केले.

## महिलांच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांचे मोठे योगदान : प्रा.डॉ. मारोती गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.५ जानेवारी -**



देशातील विशेषतहा महाराष्ट्रातील पुणे शहरा पासुन महिलांच्या शिक्षणासाठी सुरुवात सर्व प्रथम केली. व दिन दलित उपेक्षीत सर्व महिलांच्या शिक्षणासाठी महत्वाचे कार्य महात्मा फुले यांच्या खांदयाला खादा लावून समर्थपणे शिक्षणाचे कार्य व समाजसेवेचा वसा सावित्रीबाई फुले यांनी मरे पर्यत सुरू ठेवला असे गौरवोद्गार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त दि.३ जानेवारी रोजी येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राच्या' उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यानात प्रा.डॉ. मारुती गायकवाड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे हे होते. तर यावेळी व्यासपीठावर ग्रंथपाल डॉ.के.ए. सूर्यवंशी, प्रा.डॉ. मुठ्ठे, प्रा. किशोर कुरे, डॉ.डी.बी. जाधव, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अमोल इंगळे याची उपस्थिती होती. पुढे बोलता डॉ. गायकवाड म्हणाले कि, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या देशातील पहिली आद्य शिक्षिका होय. सावित्रीबाईंनी महात्मा फुलेच्या कार्यात सहभाग नोंदवताना शिक्षिका म्हणून कार्य करताना यावेळ मनवाद्याकडून त्यांचा छळ करण्यात आला. चिखल, शेण, दगडगोटे अंगावर झेलावे लागले. घरी मारेकरी पाठवल्या नंतरही शिक्षणाचा वसा त्यांनी सोडला नाही.

दीनदलित, शोषित-पीडित लोकांचे जीवन प्रकाशमान होण्यासाठी कार्य केले. प्रौढाना साक्षर करण्यासाठी रात्रशाळा चालू केली. सतीप्रथा व केशवपण यांच्या विरोधात न्हाव्याचा संप घडवून आणून एक नवी क्रांती केली. विधवा स्त्रीचे पुनर्विवाह घडवून आणले. विधवा महिलेकडून झालेल्या मुलांची देखभाल केली, असे यावेळी ते म्हणाले. यावेळी प्राचार्य डॉ अरुण धालगडे यांनी ही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. इंगळे यांनी केले तर वाचन संकल्प महाराष्ट्राच्या उपक्रमाबाबत ग्रंथपाल सुर्यवंशी यांनी महत्व सांगितले या कार्यक्रमाचे आभार प्रा. किशोर कुरे यांनी केले.

### पत्रकार बांधवाचा सत्कार

**लातूर, दि.५ जानेवारी -**

लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाच्या वतीने दि.६ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वा. लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयात दर्पण दीन साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजीटल सह सर्व माध्यमातील पत्रकारांना दर्पण दिनानिमित्त सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजीराव गायकवाड, उद्घाटक म्हणून अभिजीत देशमुख तर प्रमूख पाहुणे म्हणून विभागीय माहिती कार्यालयाचे सहाय्यक उपसंचालक डॉ. शाम टरके, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप हे उपस्थित राहणार आहेत.